म. ग्रं. मं. ठाणे
विषय निबंध,
सं. नं. ३८४

सभा—धुळे.

# जपानची मर्दुमकी.

शंकर श्रीकृष्ण देव
यांनीं वर्णिली.

REFBK-0000112

किंमत बारा आणे.

सत्कार्योत्तेजक सभा—धुळे.
११२

# जपानची मर्दुमकी.

REFBK-0000112

शंकर श्रीकृष्ण देव
यांनीं वर्णिली.

ऐसी काहाणी निरंतर । विवेकें ऐकती नर ॥
दास म्हणे जगदुद्धार । तेचि करिती ॥

श्री समर्थ.

चैत्र शुद्ध १ शके १८२५.

मुंबई येथें 'निर्णयसागर' छापखान्यांत छापिली.

सर्व हक्क सभेनें राखून ठेविले आहेत.

किंमत बारा आणे.

# प्रस्तावना.

सुमारें तीस चाळीस वर्षांच्या आंत जपानसारख्या चिमुकल्या देशानें आपली इतकी सुधारणा केली कीं जगांतील प्रमुख राष्ट्रांत त्याची गणना होऊं लागली असें आपण आजपर्यंत समजत आलों. परंतु मला हें खरें वाटत नसे. कोणत्याही राष्ट्राला इतक्या अल्प अवधींत एवढी थोरली योग्यता प्राप्त होणें शक्य नाहीं असें मला वाटे. माझ्या ह्या वाटण्याला कांहीं कारणें होतीं. मला वाटे एवढा आमचा हिंदुस्थानदेश कीं ज्याची तीस कोट लोकसंख्या व नव्वद कोट रुपये दर सालचें उत्पन्न, ज्याचें कल्याण करावयाचा प्रयत्न इंग्रज सरकारासारख्या बलाढ्य व दयाळु सरकाराचा कांहीं भागावर दीडशें वर्षें, कांहींवर शंभर व कांहींवर पाऊणशें वर्षें सारखा चालला आहे, त्यानें मात्र असें कोणतें पातक केलें आहे कीं प्रतिवर्षीं त्याचें पाऊल मागें मागें पडत जाऊन आज त्यानें मृत्यूच्या दारापाशीं येऊन बसावें ? हा सर्व प्रकार मला दिसत असतां, इंग्रजांसारख्यांचे देखील सारे प्रयत्न व्यर्थ जात आहेत हें कळत असतां, टीचभर जपानच्या राष्ट्रानें तीस चाळीस वर्षांत सुधारणेचें शिखर गांठलें यावर माझा विश्वास कसा बसावा ? जपानची चार कोट लोकसंख्या ती काय आणि बारा कोट उत्पन्न तें किती ? बरें, सुधारणेचें

ज्यांना जात्या बाळकडू मिळालें आहे अशा एकाद्या युरोपीय राष्ट्राचा जपानवर अंमल असता तर जपानच्या वैभवाची कांहीं तरी कल्पना करतां आली असती; परंतु तसेंही नाहीं. प्राच्य देशांतल्या राष्ट्रांनीं आपण होऊन आजपर्यंत कधीं स्वतःची सुधारणा केली आहे काय ? सारांश जपाननें अवघ्या चाळीस वर्षांत सुधारणेच्या मार्गांत इतकी मजल मारली असावी हें मला असंभवनीय वाटे.

मी असा विचार करीत असतां जपानी मनुष्यानें जपानच्या उत्कर्षाचीं कारणें ज्यांत ठरविलीं आहेत असें एक पुस्तक मिळविलें. जर्मन, स्पॅनिश, बोहेमिअन वगैरे भाषांतून सदरहु पुस्तकाचें भाषांतर झालें आहे. मूळ पुस्तक एका जपानी मनुष्यानें इंग्रजी भाषेंत लिहिलेलें आहे. तें वाचून पाहतां माझ्या शंकेचें निरसन झालें व आज असें ह्मणण्यास मला हरकत वाटत नाहीं कीं, परक्यांच्या नजरेला जपानचा मोठेपणा तीस चाळीस वर्षांत पडूं लागला हें कदाचित् खरें असेल, परंतु मोठेपणाचें बीज जपानच्या राष्ट्रांत सहा सात शतकें सारखें रुजत होतें. या संबंधानें मराठी वाचकांची खात्री व्हावी ह्मणून मुख्यतः त्याच पुस्तकाच्या आधारानें मीं पुढील भाग लिहिले आहेत. ते लिहीत असतां जपानच्या इतिहासांतील कांहीं प्रसंग मला वाचावयास सांपडले, त्यावरून मी असें ह्मणूं शकतों कीं, आपल्या महाराष्ट्राचा इतिहास जितका हृदयंगम आहे तितकाच जपानचाही आहे. जपानचा इतिहास आपणांस बोधप्रद झाल्यावांचून राहणार नाहीं. जपानचे व आपले देशाचार आणि रीतरिवाज पुष्कळ अंशांनीं जुळतात. त्यांच्यांत सृष्टिपूजा आहे तशी ती आमच्यांतही आहे. ते आपल्या पूर्वजांना देवाप्रमाणें मान देतात, आह्मीही आमच्या वाडवडिलांना पूज्य लेखतों. स्त्रियांना उपदेश

वि. ८८३

ह्मणून एका जपानी मनुष्यानें लेख लिहिला आहे, तोच उपदेश आमच्यांतील जुन्या पद्धतीप्रमाणें चालणाऱ्या मनुष्यानें इकडे केला तरी चालण्यासारखें आहे. गुणांच्या बाबतींत जसें साम्य आहे तसेंच तें दोषांच्या बाबतींतही आहे. एकाद्या कामांत थोडेंसें यश आलें कीं जपानी लोक आपल्याप्रमाणें लागलीच शेफारतात, परंतु जरा ठेंच लागली कीं हातपाय गाळतात. दोन माणसें एका कामांत एक होऊन टिकणें आपल्याकडे अशक्य झालेलें आहे; तीच स्थिति जपानांत हल्लीं नसली तरी थोड्या वर्षांमागें होती. सारांश, जपानी लोकांच्या व आमच्या गुणदोषांत बरेंच साम्य आढळून येतें. असें आहे तर मग त्यांच्या व आमच्या सांप्रतच्या स्थितींतही पुष्कळ साम्य असावयास पाहिजे होतें, परंतु एवढ्या बाबतींत मात्र ह्या दोन राष्ट्रांचा मार्ग अगदीं भिन्न आहे. असें कां झालें हें जपानचा साग्र इतिहास वाचून कळणार आहे. अशा तऱ्हेचा इतिहास लिहिण्यास लागणारीं साधनें मी मिळवीत आहें; ईश्वराच्या कृपेनें तें काम माझ्या हातून होईल तेव्हां खरें. तथापि प्रस्तुतच्या पुस्तकास मिळणाऱ्या आश्रयावरून या विषयाची आवड लोकांना कितपत आहे व तें काम करण्याची माझ्या ठिकाणीं कितपत पात्रता आहे याचा मला अंदाज होणार आहे.

ज्या सद्गृहस्थाच्या कृपेनें मला वर निर्देश केलेल्या पुस्तकाची माहिती झाली त्या सद्गृहस्थाचे व सदरहू पुस्तकाच्या विद्वान् कर्त्यांचे आभार मानून माझ्या पुढील कार्यांत त्यांची मला मदत मिळेल अशी आशा या ठिकाणीं मी प्रदर्शित करितों.

धुळें,<br>
वर्षप्रतिपदा, शके १८२५.

शंकर श्रीकृष्ण देव.

# विषयांचा अनुक्रम.


| विषय. | पृष्ठांक. |
|---|---|
| मर्दुमकी—सदाचाराचा पाया. .... .... .... | १ |
| मर्दुमकीचीं साधनें. .... .... .... .... | ११ |
| समबुद्धि अथवा न्यायप्रीति. .... .... .... | २२ |
| धैर्य अथवा साहस. .... .... .... .... | २६ |
| परोपकारबुद्धि. .... .... .... .... .... | ३० |
| शिष्टाचारसंपन्नता .... .... .... .... | ३८ |
| सत्यवक्तेपणा. .... .... .... .... .... | ४७ |
| अन्न. .... .... .... .... .... .... | ५६ |
| स्वराजनिष्ठा. .... .... .... .... .... | ६४ |
| तरुणांना शिक्षण. .... .... .... .... | ७७ |
| आत्मसंयमन. .... .... .... .... .... | ८७ |
| आत्महत्या. .... .... .... .... .... | ९४ |
| सूड. .... .... .... .... .... .... | १०२ |
| तलवार—जीव कीं प्राण. .... .... .... | १०६ |
| स्त्रियांची योग्यता. .... .... .... .... | १११ |
| शिक्षणाचा राष्ट्रावर परिणाम. .... .... .... | १२५ |
| धर्म कायम आहे. .... .... .... .... | १३० |
| पुढें काय होणार ? .... .... .... .... | १४१ |

११२

# जपानची मर्दुमकी.

## मर्दुमकी–सदाचाराचा पाया.

जपानांत 'चेरी' नांवाचीं फुलें फार आहेत. तीं फुलें आपल्या राष्ट्रीयत्वाचीं व मर्दुमकीचीं द्योतक होत असें जपानी लोक समजतात. ज्याप्रमाणें चेरी फुलें जपानांत मूळचींच आहेत, तीं परदेशांतून आणावीं लागलीं नाहींत, त्याप्रमाणेंच 'मर्दुमकी' ही जपानच्या राष्ट्राला खिळलेली आहे. 'मर्दुमकी' या शब्दापासून होतो, त्यापेक्षां जास्त अर्थबोध व्हावयास पाहिजे. सत्यप्रीति, रणधीरपणा, परोपकारबुद्धि, शालीनता, स्वाभिमान, स्वदेशाभिमान, स्वराजनिष्ठा, आत्मसंयमन, अबलांविषयीं आदरबुद्धि, दुःखितांविषयीं अनुकंपा इत्यादि पुरुषाच्या अंगीं अवश्य असणाऱ्या सर्व सद्गुणांचा बोध 'मर्दुमकी' या एका शब्दानें सामान्यपणें जरी होत नसला तरी त्या सर्व सद्गुणांच्या एकीकरणास प्रस्तुतच्या पुस्तकांत 'मर्दुमकी' ह्मटलें आहे. इंग्रजी भाषेंत 'शिव्हल्री' या शब्दानें अथवा जपानी भाषेंत 'बुशिडो' या शब्दानें जो बोध होतो तोच बोध करून देण्यासाठीं मराठींत 'मर्दुमकी' हा शब्द मी योजीत आहें. ह्या मर्दुमकीचीं उदाहरणें जपानांत पूर्वीं फार होतीं. पण अजून त्या सद्गुणास जपानचें राष्ट्र पारकें झालें नाहीं; मर्दुमकी जपानांत होती याबद्दल तेथील समाज अजून साक्ष देत

प्राचीन राष्ट्रांत व विशेषतः प्राच्य राष्ट्रांत मर्दुमकी कधींच नव्हती असें विधान डाक्टर जार्ज मिलरसारख्या विद्वानानें बेधडकपणें करावें यावरून डाक्टर साहेबांचें अज्ञान मात्र दिसून येत आहे; तथापि हें अज्ञान साहजिक आहे. जपानांत पूर्वी परराष्ट्रांतील लोकांना येऊं देत नसत, त्यामुळें त्यांना त्या राष्ट्राची माहिती नसावी यांत नवल नाहीं. डाक्टर साहेबांनीं आपले सदरील विचार इ० स० १८५३ त प्रकाशित केल्यानंतर सुमारें दहा बारा वर्षांनीं ह्मणजे जेव्हां जपानांतील मोकाशाची पद्धत अगदीं संपुष्टांत येत चालली होती, तेव्हां **कार्ले[1] मार** साहेबांनीं एकट्या जपानांत मात्र अस्तित्वांत असणाऱ्या मोकाशाच्या पद्धतीपासून जपानच्या राजकीय व सामाजिक स्थितीवर जे सुपरिणाम झाले आहेत, त्यांचा विचार करण्याविषयीं "कॅपिटल" नामक पुस्तकांत आपल्या वाचकवर्गास शिफारस केली आहे. तिचा अनुवाद करीत असतां, जपानांत हल्लीं सुद्धां मर्दुमकीपासून कसे इष्ट परिणाम घडत आहेत याचा विचार, इतिहासाचें अध्ययन करणाऱ्या व स्वदेशास ऊर्जितावस्था यावी अशी सदिच्छा बाळगणाऱ्या प्रत्येकानें करावा अशी या ठिकाणीं मी विनंती करून ठेवितों.

जपानांत ज्याप्रमाणें मोकाशाची पद्धत होती त्याप्रमाणें ती पाश्चात्य राष्ट्रांत असून मराठ्यांच्या वेळीं तशाचसारखी पद्धत आपल्या इकडेही अठराव्या शतकांत होती. ह्या सर्व पद्धतींची तुलना करून त्यांच्या बऱ्या वाईट

---

१ गरिबांचा कैवार घेऊन लिहिणारा हा एक जर्मन ग्रंथकर्ता आहे. सर्व जगांतील मजुरांनीं एकी करून आपणांस गुलामगिरींतून सोडवून घ्यावें, असें याचें मत आहे.

आहे. त्या समाजाच्या नैतिक वर्तनांत पूर्वीच्या मर्दुमकीची छटा अद्यापि स्पष्ट दिसत आहे. आपल्यांत पूर्वी मर्दुमकी होती ह्या नुसत्या विचारानें जपानी लोकांच्या अंगीं अजून अवसान चढतें. आपल्या इकडे मर्दुमकीसंबंधानें बोलतांना जसें शतक दोन शतकांच्या मागच्या काळाकडे आपल्याला पहावें लागतें तसा प्रसंग ईश्वराच्या कृपेनें अजून जपानावर आला नाहीं व ईश्वर करो आणि तो केव्हांही न येवो. जवानमर्दीचीं उदाहरणें आह्मांला विचारलीं तर श्रीछत्रपती शिवाजीमहाराज, श्रीमंत बाजीराव पेशवे अगर राणा प्रतापसिंह, महादजी शिंदे यांची आठवण आह्मांस करावी लागते; जपानची गोष्ट तशी नाहीं. त्या चिमुकल्या राष्ट्रांत मर्दुमकी अजून जागृत आहे, अजून तिच्यामुळें त्या राष्ट्राला भूषण व सत्ता हीं प्राप्त होत आहेत. जपानच्या ज्या सामाजिक स्थितींत ह्या मर्दुमकीचा प्रादुर्भाव होऊन विकास झाला ती स्थिति आज कित्येक वर्षें पालटली आहे; तथापि आकाशांत कांहीं तारे पूर्वीच्या लोकांना एकदा दिसले व ते आतां दिसेनासे झाले असूनही त्यांचा प्रकाश मात्र आपणांस मिळत आहे, ह्या ज्योतिषशास्त्रज्ञांच्या ह्मणण्याप्रमाणें जपानांतील मर्दुमकीची स्थिति झाली आहे. पूर्वी जपानांत जहागिरीची अथवा मोकाशाची पद्धत होती. त्या पद्धतीच्या अंगभूत मर्दुमकी असे. परंतु हल्लीं जपानांतील ती पद्धत जरी मोडली आहे तरी तिच्यापासून प्रादुर्भूत झालेल्या मर्दुमकीचे परिणाम कांहीं नाहींसे झाले नाहींत. जपानी लोकांना आपल्या कर्तव्याचा मार्ग ती मर्दुमकी अजून दाखवीत आहे, याबद्दल जपानी लोकांना मोठा अभिमान वाटत असतो. कां न वाटावा?

परिणामाविषयीं विवेचन करणें हा विषय जरी महत्वाचा असला तरी हल्लीं तसें करण्याचा माझा हेतु नाहीं. या पुस्तकांत फक्त **जपानांत** (१) मर्दुमकीचें बीज कसें पेरलें गेलें (२) तिचें स्वरूप कसें होतें (३) समाजावर तिचे परिणाम काय घडले आणि (४) हल्लींही तिचा पगडा जपानावर कसा आहे या चार गोष्टींचा विचार करण्याचा मीं संकल्प केला आहे. यांपैकीं पहिल्या प्रकरणाचें विवेचन थोडक्यांत करूं, नाहींपेक्षां एकंदर जपानच्या इतिहासांत आपणांस शिरावें लागेल; दुसऱ्या प्रकरणाचा विचार विस्तारानें करूं; आणि हेंच प्रकरण खरोखर महत्वाचें आहे. आपलें राष्ट्र जरी पतित झालें असलें तरी आपल्या खंडांत जीं दोन चार राष्ट्रें स्वतंत्र आहेत त्यांच्याबद्दल आपणांस अभिमान वाटतो. आह्मी जरी बुडालों असलों तरी तीं दोन चार तरी जगोत अशी आमची ईश्वराजवळ प्रार्थना आहे; आणि ह्मणूनच एक वर्षामागें चीन देशावर जेव्हां पाश्चात्य राष्ट्रांची धाड जाऊन पडली होती तेव्हां आमचा कांहीं एक संबंध नसतांही आह्मांस त्या राष्ट्राची काळजी वाटूं लागली होती. अशा ह्या दोन चार राष्ट्रांत अग्रगण्य, वैभवसंपन्न असें जें जपानचें राष्ट्र कीं ज्याचा स्नेह संपादन करण्यांत खुद्द आमच्या राजकर्त्यांना देखील भूषण वाटलें, तें आज इतक्या योग्यतेस कशामुळें चढलें अशी जिज्ञासा प्रत्येकास होणें अगदीं स्वाभाविक आहे. जपानच्या थोरवीचें कारण त्या राष्ट्रांतील मर्दुमकी होय. त्या मर्दुमकीचें स्वरूप लक्षांत येणें अगत्याचें आहे आणि ह्मणूनच या प्रकरणावरील विवेचन जरा विस्तृत रीतीनें करण्याचा माझा हेतु आहे. बाकींच्या दोन प्रकरणांचा विचार पहिल्या दोहोंच्या अंगभूत होईल.

वास्तविक पहातां 'बुशिडो' या शब्दानें जपानी भाषेंत जो अर्थबोध होतो तो बोध इंग्रजींत 'शिव्हल्री' या शब्दानें अथवा आमच्या मराठी भाषेंत 'मर्दुमकी' या शब्दानें पूर्णपणें होत नाहीं. 'बुशिडो' याचा धात्वर्थ पहातां, खऱ्या देशभक्तानें आपल्या नेहमींच्या वर्तनक्रमांत, तसेंच स्वदेशासाठीं रणांगणावर शत्रूशीं झुंजत असतां, जे नियम पाळावयाचे त्या सर्व नियमांचा समावेश 'बुशिडो' या शब्दांत होतो. इतका अर्थबोध मर्दुमकी या शब्दापासून कोठें होत आहे? तरी पण वर ह्मटल्याप्रमाणें प्रस्तुतच्या पुस्तकांत 'बुशिडो' शब्दाच्या धात्वर्थाचा समानार्थी ह्मणून मर्दुमकी हा शब्द योजला आहे. कांहीं शब्द असे असतात कीं ते आपआपल्या भाषेंत जितका खोल व गूढ अर्थ दर्शवितात तितका अर्थबोध परकी भाषेंत त्यांच्या तोडीच्या ह्मणून हुडकून काढलेल्या शब्दांपासून वाचकांना होत नाहीं. आपल्या भाषेंतील 'राम' शब्दच पहाना? ह्या लहानशा शब्दांत किती तरी अर्थ भरला आहे! कोणत्याही दुसऱ्या भाषेंतील कितीही मोठा भाषांतरकर्ता झाला तरी तो आमच्या 'रामाचें' भाषांतर काय करणार? आमच्या राम शब्दाचा समानार्थी शब्द तो कोठून आणणार? सारांश राम ह्या शब्दानें जितका अर्थ मनांत येतो तितका सर्व अर्थ व्यक्त करणारा जसा दुसऱ्या कोणत्याही भाषेंत शब्द सांपडणें दुर्घट आहे, तद्वत् 'बुशिडो' या जपानी शब्दाची स्थिति आहे. बुशिडो शब्द उच्चारतांच ज्या कल्पना जपानी मनुष्याच्या अंतःकरणांत उद्भवतील त्या कल्पना मर्दुमकी हा शब्द ऐकून मराठी वाचकांना होणार नाहींत, तथापि जोंपर्यंत दुसरा अधिक अन्वर्थक शब्द मला आ-

ढळत नाहीं तोंपर्यंत 'बुशिडो' याचा बोध करून देण्यासाठीं या पुस्तकांत मर्दुमकी याच शब्दावर मला काम भागविलें पाहिजे.[१] सारांश, मर्दुमकी ह्मणजे जे नैतिक नियम सरदार लोकांना पाळावे लागत अगर पाळण्याचा त्यांना अभ्यास होता ते. जपानांत हे नियम कोणते होते ते कोणी एका ठिकाणीं लिहून काढलेले नाहींत. ते एकापासून दुसऱ्याला दंतकथेसारखे कळत असत. एखाद्या रणशूर योद्ध्यानें अथवा पंडितानें त्यांपैकीं लिहून ठेवले आहेत असे फार थोडे. परंतु ते नियम जरी कोणीं लिहून ठेवले नव्हते अगर त्याबद्दल जरी कोणी फारशी वाच्यता करीत नसे, तरी जणूं काय लोकांच्या हृत्पटलावर कोरून ठेवल्याप्रमाणें ते लोकांकडून पाळले जात. हे नियम ह्मणजे कोणी एकाद्या कल्पक व्यक्तीनें आपल्या डोक्यांतून काढले, अथवा एकाद्या विद्वानानें आपलें एकट्याचें आयुष्य खर्च करून ते शोधून काढले अशांतला प्रकार मुळींच नाहीं. शतकांचीं शतकें ते नियम बनत होते. लढण्यामध्यें जपानी लोकांचीं कांहीं थोडीं थोडकीं शतकें गेलीं असें नाहीं. त्या सर्व शतकभर हे नियम रंगरूपास येत होते. ज्याप्रमाणें इंग्लंडच्या राज-

---

१ मर्दुमकी या शब्दापासून जो अर्थबोध व्हावा म्हणून मी ह्मणत आहें तो अर्थबोध सोळाव्या, सतराव्या आणि अठराव्या शतकांत 'मराठा' या शब्दापासून होत असे, व एकवार मला असेंही वाटलें कीं 'मराठा' शब्दाचें भाववाचक नाम बनवून त्याचा उपयोग प्रस्तुतच्या पुस्तकांत करावा; परंतु जपानी लोकांच्या मर्दुमकीला 'मराठेपणा' ह्मणणें वाचकांच्या कानाला गोड लागणार नाहीं, ह्मणून मीं तो नाद सोडला.

कीय उन्नतीस तेथील कायदेशीर चळवळी कारणीभूत झाल्या, त्याप्रमाणें जपानांतील नैतिक उन्नतीचें श्रेय ह्या नैतिक नियमांकडे आहे; परंतु इंग्लंडमध्यें कायदेशीर चळवळ करून लोकांनीं जसा "मॅग्नाचार्टा" अगर "हेबिअस कॉरपस ॲक्ट" मिळविला तशा तोडीचे जपानांत कांहीं नैतिक वर्तनाचे कायदे झाले नाहींत. नाहीं ह्मणायाला सतराव्या शतकाच्या आरंभाला एक लष्करी कायदा करण्यांत आला होता. परंतु त्यांतील तेरा कलमांपैकीं बराचसा भाग लग्न-कार्यें, किल्ले, तह वगैरे यांनींच व्यापला होता; सदाचर-णाचे नियम असे त्यांत फारच तुरळक दिले होते. ह्या एकंदर स्थितीवरून वाचकांचे लक्षांत येईल कीं जपानच्या इतिहासांत अशी एक अमुकच वेळ नव्हती कीं जेव्हांपासून हे मर्दुमकीचे नियम सुरू झाले असें ह्मणतां येईल. मो-काशाची पद्धत जपानांत जेव्हां सुरू झाली तेव्हां ह्या नि-यमांना एक प्रकारचें दृश्य स्वरूप आलें इतकेंच काय तें. परंतु ते तेव्हांपासूनच प्रथम अस्तित्वांत आले असें मात्र नाहीं. ह्या नियमांचें बीज जपानच्या भूमींत त्यापूर्वींच रुजलेलें होतें. तें केव्हां रुजलें होतें अशी नक्की वेळ सांगतां येत नाहीं. इतकी गोष्ट खरी कीं मोकाशाची अगर जहा-गिरीची पद्धत जेव्हां जपानांत अमलांत आली त्या वेळीं ह्या नियमांचें स्वरूप लोकांचे लक्षांत प्रथम आलें. जपा-नांतील मोकाशाच्या पद्धतीचें स्वरूप भानगडीचें होतें, त्यामुळें त्या पद्धतीपासून निघालेले नियमही सहज सांगतां येण्यासारखे सोपे नाहींत. इंग्लंड देशांत नॉरमन लो-कांच्या विजयापासून मोकाशाच्या पद्धतीची जसी सुर-वात झाली त्याप्रमाणें जपानांत बाराव्या शतकाच्या अखेर

अखेर **योरिटोमोच्या** वर्चस्वापासून ही पद्धत सुरू झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं; परंतु ज्याप्रमाणें इंग्लंडमध्यें त्याचप्रमाणें जपानच्या भूमींत ह्या मोकाशाच्या पद्धतीचें मूळ बीज वर सांगितलेल्या शतकाच्याही फार पूर्वींपासून रुजूं लागलें होतें.

तसेंच, यूरोप खंडांतल्या प्रमाणें जपानांतही मोकाशाच्या पद्धतीबरोबर, लढणें हाच ज्यांचा धंदा अशा लोकांचा एक वर्ग सहाजिकपणें उदयास आला. लढण्याचा धंदा करणाऱ्या ह्या लोकांस जपानी भाषेंत **'सामुराई'** ह्मणत. सामुराईचा धात्वर्थ अनुचर, हुजऱ्या असा होतो. त्यांचें दुसरें नांव **'बुशी'** असेंही होतें. **बुशी** ह्मणजे लढवय्या. ह्या लढाऊ लोकांचा मानमरातब सामान्य लोक फार ठेवीत. पुढें पुढें हे लढवय्ये सरदार जरी आचारविचारानें सुशिक्षित झाले तरी आरंभीं ते रानटीच असले पाहिजेत. लढाई करणें हाच ज्यांचा धंदा, ते सुशिक्षित कोठून असणार? आपल्या इकडील **मावळे**, **भील**, व **रामोशी** लोक व

---

१ अकराव्या आणि बाराव्या शतकांत जपानांत जीं पांच सहा घराणीं प्रसिद्धीस आलीं होतीं, त्यांपैकीं "मिनामोटो" घराण्यानें बाकींच्या सर्वांचा पाडाव करून वर्चस्व संपादन केलें होतें. "योरिटोमो" हा याच घराण्यांतील होता. तो जितका शूर होता तितकाच धोरणी आणि गुणग्राही होता. बादशहापाशीं त्याचें फार वजन असे. त्यामुळें राज्यांत न्याय, लष्कर, शेतकी, वगैरे अनेक बाबतींत त्यानें पुष्कळ सुधारणा केल्या. घोड्यावरून पडून दुखापत झाल्यामुळें आपल्या वयाच्या ५३ व्या वर्षी तो वारला. त्याच्या अमदानींत जपानचा काळ शांततेंत गेला आणि ह्मणून जपानी लोकांना योरिटोमोविषयीं अजून पुष्कळ अभिमान वाटत असतो.

जपानांतले मूळचे लढणारे रानटी बुशी लोक हे बहुधा सारखेच असावेत. परंतु त्यांच्या सुदैवानें बुशी लोक सुधारले व ते स्वदेशाला भूषणीभूत झाले; आमच्या मावळे, भील, रामोशी लोकांच्या दुर्दैवानें त्यांना शिक्षण मिळालें नाहीं व मिळत नाहीं आणि त्यामुळें त्यांच्या गुणांचा विकास न होतां ते मातीमोल झाले व होत आहेत. बुशी लोकांच्या अंगच्या गुणांची योग्य जोपासना झाल्यामुळें ते सन्माननीय झाले. त्यांना अनेक सवलती मिळाल्या आणि त्याबरोबरच आपल्यावर आपल्या राष्ट्राची मोठी जबाबदारी येऊन पडली आहे असें त्यांना वाटून त्यांनीं आपल्या वर्तनाला नियमबद्ध करण्याचा संकल्प केला. बुशी लोक एकाच जातीचे नसल्यामुळें व नेहमीं तरवारीशीं त्यांची गांठ पडत असल्यामुळें अशा नियमांची त्यांना फार जरूर होती.

धर्मयुद्ध! युद्धांत धर्म! हे शब्द आपल्याला हल्लींच्या सुधारलेल्या काळांत काल्पनिक वाटतील, रानटीपणाचे व पोरकट वाटतील, परंतु त्यांत—त्या धर्मयुद्धांत—सदाचरणाचीं सर्व मूलतत्वें सांठवलीं आहेत असें मला वाटतें. आपल्या देशांत तर धर्मयुद्धाची थोरवी पुष्कळांनीं वर्णन केलेली आहे. मनु, याज्ञवल्क्य इत्यादि ऋषिवरांनीं लढाईचे वेळीं पाळण्याचे नियम देखील विस्तारानें दिलेले आहेत, व ते सर्व नियम आपल्या देशांत पाळले जात होते अशाबद्दल पुराणांतून पुष्कळ बोधप्रद व उदात्त उदाहरणें देतां येतील. "संग्रामेष्वनिवर्तित्वं प्रजानां चैव पालनम्" या नियमांत कितीतरी थोरपणा भरलेला आहे. अनेक सद्गुणांचा हा पाया आहे. ह्या खंबीर पायाच्या जोरावर कित्येक राष्ट्रें आज वैभवाच्या शिखरावर चढलेलीं आहेत. वैभवाचें शि-

खर गांठल्यावर कांहीं राष्ट्रें संपत्ति व सत्ता यांचा मद चढल्यामुळें हा प्राथमिक धडा विसरले असतील अगर विसरूं लागले असतील; परंतु ही गोष्ट खचित कीं सदाचाराचें हें प्राथमिक तत्व पाळूं लागल्यापासूनच त्यांच्या वैभवाच्या भरतीस सुरवात झाली व ह्या तत्त्वाला ज्या दिवशीं ते झुगारून देतील त्या दिवसापासून त्यांच्या वैभवास ओहटी लागलीच ह्मणून समजावें! इंग्लंडच्या इतिहासाचें ज्याला मनःपूर्वक अध्ययन घडलें असेल त्याच्या लक्षांत आलें असेल कीं इंग्लंडच्या हल्लींच्या अवाढव्य सत्तेच्या मुळांशीं हेंच लहानसें पण महत्वाचें तत्व आहे. जपानच्या अलीकडील मोठेपणाचें कारण तरी हेंच होय. लढाई—मग ती स्वतःचे प्राणाहून प्रिय असें स्वातंत्र राखण्यासाठीं किंवा मिळविण्यासाठीं असो अथवा दुसऱ्याचें घेण्यासाठीं असो—लढाई ह्मटली ह्मणजे तींत अन्याय, रानटीपणा हा आलाच, हें अलीकडील शिकून नरम झालेल्या लोकांचें मत जरी खरें मानलें तरी पण त्या लढाईंतच मनुष्याला मनुष्यपणा आणणारे सर्व सद्गुण वास करीत असतात, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. ट्रान्सव्हालांत डीवेट, डिलारे, किंवा आपले किचनेर साहेब काय करीत होते? शत्रूंची डोकेफोड, दुसरें काय? परंतु असें असूनही त्याच डिवेटचा अथवा डिलारेचा, त्याच आमच्या लॉर्ड किचनेर साहेबांचा, त्यांचा निश्चय, त्यांची स्वदेशभक्ति, त्यांचें शौर्य पाहून कोणीं गौरव केला नाहीं? दुसऱ्यानें आपल्याला भ्याड, देशद्रोही, रानटी इत्यादि शेलकीं विशेषणें लावून आपला उपहास केलेला पाहून ज्याला चीड येणार नाहीं तो पशु! दुसऱ्याचे रद्दे खाऊन त्याचाच भार

आनंदानें वाहण्याचा धंदा करणारे प्राणी, ईश्वरानें तरी गाढवावांचून दुसरे कोणी निर्माण केले नाहींत! अशा तऱ्हेच्या विचारांचें बाळकडू जपानांत लहान लहान मुलांना मिळत असे व अजूनही मिळत आहे. मोठेपणीं तेच विचार विकास पावावयाचे! फरक इतकाच कीं जसजसा मनुष्य मोठा होत जातो किंवा त्याचा व्यवहार वाढतो, तसतसा लहनपणीं जे विचार केवळ आईबापांनीं शिकविले ह्मणून तो मान्य करीत असतो त्याच विचारांना कांहीं आधार आहे कीं काय, ते बरोबर आहेत किंवा कसें, ते ईश्वराचे घरीं रुजू आहेत किंवा नाहींत, याची तो मीमांसा करूं लागतो. आपण जें कृत्य करीत आहोंत त्यास ईश्वराज्ञा आहे, त्यास ईश्वराचें सहाय्य आहे अशी कल्पना करून जर जवानमर्द स्वदेशासाठीं आपलें शीर देण्यास तयार न होतील तर मग त्या मर्दुमकींत काय अर्थ उरला? युरोप खंडांत देखील मर्दुमकीला धर्माचें पाठबळ असे. मर्दुमकीला कमीपणा न येईल असाच येशू ख्रिस्ताच्या आज्ञांचा अर्थ लोक करीत असत. लमारटाईननें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं ज्याचे ठिकाणीं धर्म, युद्ध, आणि यश हीं वास करितात तोच खरा ख्रिस्ती सरदार होय. जपानांत एवढ्या तीनच गोष्टी पुरेशा होत नसत. जपानांत जीं अनेक

## मर्दुमकीचीं साधनें

होतीं, त्यांपैकीं पहिलें आणि मुख्य साधन **बुद्धधर्म** होय. जपानच्या मोठेपणास त्यांचा धर्म कसा कारणीभूत झाला याचा आपण विचार करूं. बुद्धधर्मापासून मनाला शांति वाटूं लागली. जें जें ह्मणून होईल तें तें कर्मानुसार घड-

णार आहे त्याबद्दल आपण चिंता वाहणें व्यर्थ आहे, जें ईश्वरानें नियमित केलेलें आहे तें अपरिहार्य आहे, त्यास आपण शरण गेलेंच पाहिजे, एकादें संकट अथवा अरिष्ट डोळ्यांपुढें दिसत असूनही आपण आपली वृत्ति अढळ राखली पाहिजे, मरण ही प्रकृति आहे, विकृति अगर विचित्रपणा जगण्यांत आहे अशी खात्री वाटून स्वदेशरक्षणासाठीं जीवाची पर्वा न करतां आपण मरण्याला तयार असलें पाहिजे, अशा प्रकारच्या उदात्त व यथार्थ कल्पना बुद्ध धर्मापासून जपानांत प्रचलित झाल्या. आपल्या कलेंत आपला विद्यार्थी आपल्याही पेक्षां तरबेज झालेला पाहून एका तलवारबहादुर शिक्षकानें त्याला सांगितलें कीं, बाबारे माझी विद्या येथें संपली, यापुढें तूं 'झेन' कसें करावें तें शीक. 'झेन' हा जपानी भाषेंतील शब्द आपल्या इकडील 'ध्यान' शब्दाचा समानार्थी आहे. "शब्दानें व्यक्त करण्यासारखें नाहीं असें जें कांहीं (ब्रह्म) तें चिंतनानें प्राप्त करून घेण्यासाठीं करावा लागणारा जो प्रयत्न" त्याचें नांव 'झेन' अथवा ध्यान[१]. निदिध्यास ही ध्यानाची किल्ली आहे आणि हें जें कांहीं सर्व दिसतें आहे तें व्यापून उरणारें जें तत्त्व त्याचें ज्ञान करून घेणें, ब्रह्म काय आहे हें जाणणें व शक्य असेल तर त्यांत लय पावणें, हा माझ्या समजुतीप्रमाणें ध्यानाचा हेतु आहे. हें ध्यान कसें करावें याचें शिक्षण बुद्धधर्मापासून जपानी लोकांना मिळूं लागलें. ज्याला हें ध्यान साधतें

१ पातंजल योगदर्शनांत तरी ध्यानाची व्याख्या जवळ जवळ अशाच प्रकारची केली आहे. "तत्र प्रत्यैकतानता ध्यानम्"। ज्या एका वस्तूवर चित्ताची धारणा केली असेल तेथेंच चित्ताची एकतानता अथवा एकाग्रता होऊन त्यास दुसरीकडे न जाऊं देणें याचें नांव ध्यान.

त्याला हें जग व त्यांतील सर्व ऐहिक वस्तु तुच्छ वाटूं लागतात आणि ट्यूफेल्सड्रोकप्रमाणें त्याला "नवीन स्वर्ग आणि नवीन पृथ्वी" हीं दिसूं लागतात.

बुद्ध धर्मापासून जपानी लोकांना वर दिलेलें शिक्षण मिळूं लागलें. जें बुद्धधर्मात कमी पडलें तें शिंटो यानें भरून काढलें. दुसऱ्या कोणत्याही धर्मानें, समाजानें अगर पंथानें शिकविलीं नाहींत अशा प्रकारची स्वराजनिष्ठा, पूर्वजांविषयीं आदरबुद्धि, आणि वडिलांचा सन्मान ठेवण्याची सदिच्छा, हीं शिंटो यानें जपानी लोकांना शिकविलीं.[1] शिंटो यानें दिलेलें हें शिक्षण जपानच्या उत्कर्षास इतकें कारणीभूत झालें कीं तेणेंकरून जे लढवय्ये जवानमर्द एरव्हीं आडदांड असावयाचे ते देखील आज्ञाधारक बनले. शिंटोनें जो नवीन पंथ उपस्थित केला त्यांत पापपुण्यें हीं कर्मानुसार घडत असतात अशा मतास कोठेंही आधार नाहीं; उलट शिंटोच्या मतानें मनुष्य हा जात्या पापभीरु प्राणी आहे आणि त्याचा आत्मा देवालयाच्या गाभाऱ्याप्रमाणें मूळचा पवित्र आहे. शिंटोनें ज्या मूर्ति स्थापन केल्या आहेत त्यांच्या ठिकाणीं पाहणाराच्या सहज लक्षांत येण्यासारखा जो विशेष असतो तो हाच कीं, त्या ठिकाणीं पूजेचीं उपकरणीं दुसरीं कांहीं नसतात, एक फक्त साधा आरसा काय तो त्या पवित्र ठिकाणीं टांगलेला असतो. हा आरसा टांगण्याचें मर्म जाणणें कठीण नाहीं. मनुष्याचें अंतःकरण त्या आरशाप्रमाणें आहे, हें तो आरसा दाखवितो. आरसा स्वच्छ असला ह्मणजे त्यांत जशी देवाची

---

१ शिंटोनें जपानांत जें काम केलें तेंच काम श्रीसमर्थ रामदास स्वामी यांनीं 'महाराष्ट्रधर्म' शिकवून महाराष्ट्रांत केलें !

मूर्ति बरोबर प्रतिबिंबित होते त्याचप्रमाणें मनुष्याच्या अंतःकरणाचें आहे. आपण मूर्तीपुढें पूजेला उभे राहिलों ह्मणजे आपलें सर्व शरीर त्या आरशामध्यें दिसतें. तें आपल्याला सुचवितें कीं "बाबारे, तूं स्वतःचें ज्ञान करून घे." स्वतःचें ज्ञान ह्मणजे स्वतःच्या शरीराचें ज्ञान नव्हे. शरीराचें ज्ञान—तें वैद्याला पाहिजे. स्वतःचें ज्ञान ह्मणजे या ठिकाणीं अंतर्ज्ञान होय. **ग्रीक** आणि **रोमन** लोकांची परस्पर तुलना करितांना **मामसेननें** ह्मटलें कीं ग्रीक लोक पूजा करितांना आपले डोळे वर आकाशाकडे लावतात, तेच रोमन लोक पूजा करितांना झांकून घेतात. याचा अर्थ असा कीं ग्रीक लोक हे बाह्योपचाराकडे लक्ष देतात व रोमन लोकांचीं इंद्रियें पूजा करितांना अंतर्मुख होतात. रोमन लोकांप्रमाणेंच जपानी लोकांची तऱ्हा आहे. देवाची पूजा करितांना जपानी मनुष्याच्या डोक्यांत प्राधान्येंकरून जे विचार येतात ते आपण हें नश्वर जग सोडून ईश्वराकडे कशी धांव घ्यावी एवढ्याच पुरते नसतात तर आपण राष्ट्राचे घटक आहोंत अशी कल्पना त्याच्या डोक्यांत जास्त प्रबळ असते. **शिंटोनें** जी सृष्टिपूजा सांगितली आहे तेणें-करून जपानी मनुष्याला त्याचा देश प्रिय वाटूं लागतो. झाडाची पूजा, दगडाची पूजा, नदीची पूजा, डोंगराची पूजा, वगैरे सृष्टीच्या पूजेचे जे प्रकार आहेत तेणेंकरून त्या पूज्य वस्तूविषयीं प्रेम उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे. जपानी मनुष्याच्या अंतःकरणांत स्वदेशप्रीति उत्पन्न करण्याला ही सृष्टिपूजा कारण होते. तसेंच श्राद्धद्वारा जपानी लोक जी आपल्या वाडवडिलांची पूजा करितात तेणें-करून त्यांच्या अंतःकरणांत पूर्वजांविषयीं अभिमान उद्भवतो

व आपला राजा देवाप्रमाणें वंदनीय आहे असें त्यांना वाटूं लागतें. ही सृष्टिपूजा व हीं श्राद्धें आमच्यामध्येंही आहेत. आह्मी देखील सृष्टींतील यच्चावत् सर्व पदार्थांना पूजनीय मानतों. दुर्वांपासून तों अश्वत्थवृक्षापर्यंत व आह्मांवर अपकार करणाऱ्या नागापासून तों आह्मांवर उपकार करणाऱ्या गाईपर्यंत आह्मी सर्वांची पूजा करितों. आह्मीही नद्यांना पवित्र मानतों आणि सूर्याला अर्घ्यें देतों. तसेंच आमच्यांतील श्राद्धामुळें तर परकीयांच्या व आमच्यांतील सुधारकांच्या आह्मी किती तरी निंदेला पात्र झालों आहोंत. परंतु जपानांत सृष्टिपूजा स्वदेशाभिमान व श्राद्धें पूर्वजाभिमान उत्पन्न करितात आणि आमच्या इकडे मात्र हे विषय थट्टेला कारण होतात. याचें कारण आमच्या अज्ञानावांचून दुसरें कांहीं असेल असें मला वाटत नाहीं. स्वदेश ह्मणजे पृथ्वीच्या ज्या भागांत आपल्याला सोन्यारुप्याच्या खाणी खणतां येतात व ज्यांत धान्य पिकवितां येतें तो भाग अशी जपानी मनुष्याची कल्पना नसते. स्वदेश ह्मणजे जेथें देव आणि देवतुल्य माणसें नांदलीं तो प्रदेश, स्वदेश ह्मणजे जेथें आपले वंदनीय वाडवडील वाढले तो मुलूख. ज्याला मी ईश्वराचा अवतार समजतों, तो राम आणि त्याचा दास हे येथें जन्मले, येथें खेळले, त्यांनीं या वनांत वास केला, त्या पंचवटींत वस्ती केली, असे विचार मनांत येऊन तीं तीं स्थानें मला प्रिय झालींच पाहिजेत, त्या त्या स्थलांचें विचित्र रूपांतर झालेलें पाहून मला वाईट वाटलें पाहिजे; जेथें ते खेळले तेथें गिधाडें खेळतांना पाहून माझ्या डोळ्याला पाणी आलें पाहिजे, तरच माझी रामावर आणि रामदासावर भक्ति आहे असें ह्मणतां येईल.

अशी स्थिति आपल्या इकडे नसली तरी ती जपानांत आहे. जपानी लोकांना त्यांचा राजा ह्मणजे भूदेव वाटतो कारण त्याचे ठायीं सत्ता आणि दया हीं सारखीं वास करितात.

जपानी मनुष्याचे आंगचे विशिष्ट असे जे दोन राष्ट्रीय गुण स्वदेशाभिमान आणि स्वराजनिष्ठा, त्यांना पोषक अशींच शिंटो पंथाचीं मतें होतीं. हिब्रु भाषेंत देव आणि स्वराज्य यांचा बोध पुष्कळ वेळां एकाच शब्दानें होतो असें जें आरथर मे नॅपनें ह्मटलें आहे तें खरें आहे. त्यामुळें वक्त्याच्या मनांत परमेश्वराविषयीं बोलावयाचें आहे का राजाविषयीं आहे हें समजण्यास कठीण पडतें. अशासारखाच कांहींसा घोटाळा जपानी भाषेंतही होतो. घोटाळा ह्मणण्याचें कारण असें कीं जपानी लोक आपल्या राजाला देवाप्रमाणें जरी मानीत असले तरी आमच्या इकडील विद्वान् शाब्दिक तार्किकांना हा घोटाळाच वाटणार आहे. तसा घोटाळा जपानी मनुष्याला वाटणार नाहीं; कारण त्याच्या अंतःकरणांत त्याच्या देशाविषयीं, स्वातंत्र्याविषयीं व स्वकीय राजाविषयीं या शिंटो पंथानें इतकी प्रीति उत्पन्न केली आहे कीं देव आणि राजा यांच्यांत त्यास फरकच वाटत नाहीं. शिंटोनें जो पंथ स्थापन केला होता, तो आमच्या इकडे जे नवीन औट घटका टिकणारे अनेक पंथ निर्माण झाले व होत आहेत तशांसारखा नव्हता. आमच्या इकडील आधुनिक पंथांत जो विशेष असावयाचा तो हा कीं त्या पंथांतील लोकांना आमचे पौराणिक आचारविचार तुच्छ वाटावयाचे, आणि तेणेंकरून असल्या आचारविचारानें वागणारे लोक त्यांना प्रिय होण्याऐवजीं अप्रिय वाटूं लागतात.

शिंटो पंथानें अशी एकदम विचारक्रांति करण्याचा प्रयत्न केला नव्हता; उलट जे विचार जपानी मनुष्याला मूळचेच प्रिय होते त्या विचारांना शिंटो पंथानें एक प्रकारचें व्यवस्थित रूप दिलें. शिंटो पंथांत शिंटोनें आपलीं मतें दिलीं नव्हतीं तर लोकांचेच उत्कट विचार त्यानें त्या पंथांत एकत्र गोवले होते.

राजकीय दृष्ट्या जपानच्या राष्ट्राला शिंटो पंथापासून जसा फायदा झाला तसा नैतिक दृष्ट्या कनफ्युशीअस याचे उपदेशापासून झाला. कनफ्युशीअस हा चीन देशांतील राहणारा होता. त्यानें केलेल्या उपदेशाची मजल जपानांत जाण्यापूर्वी बीजरूपानें तो तेथें होताच. त्याच्या मतापासून त्या बीजाला कोम फुटले. राजा आणि प्रजा, पिता आणि पुत्र, पति आणि पत्नी, ज्येष्ठ आणि कनिष्ठ, मित्र आणि अमित्र यांच्यांतील परस्परांच्या कर्तव्यांविषयीं ज्या उदात्त कल्पना मूळच्या जपानांत होत्या त्यांचा कनफ्युशीअसच्या शिक्षणापासून जास्त विकास झाला. राजकीय आणि नैतिक विषयांच्या एकीकरणापासून कनफ्युशीअसच्या शिक्षणाला जें शांत, सात्विक आणि प्रिय असें स्वरूप प्राप्त झालें होतें तें तर जपानांतील जवानमर्द लढवय्यांना विशेषच अनुकरणीय वाटलें. ह्या लढाऊ राजकार्यधुरंधरांना जें पाहिजे होतें तें त्यांना कनफ्युशीअसच्या शिक्षणापासून मिळालें. आपल्या हातीं अधिकार असावा व आपण आपल्या भाग्यशाली पूर्वजांना शोभूं अशी आपल्या ठिकाणीं पुराणप्रियता असावी ही जी जपानी मनुष्याची इच्छा तिला कनफ्युशीअसच्या शिक्षणानें पुष्टीकरण आणिलें. जपानांतील जवानमर्दांच्या मनावर कनफ्युशीअसच्या खालोखाल मेनशीअसचा पगडा बसला होता. प्रजापक्षाचा कैवार घेऊन

लिहिलेले मेनशीअसचे जोरदार लेख, त्याच्या सारखीच ज्यांच्या विचारांची दिशा होती अशा जपानी लोकांना फारच प्रिय झाले होते. मेनशीअसचे कडक परंतु मार्मिक लेख समाजाला विघातक आहेत, असें वाटल्यावरून कित्येक वर्षेपर्यंत त्याच्या लेखांसंबंधानें अधिकाऱ्यांची करडी नजर होती; तरी पण अंत:करण पिळवटून निघालेले त्या देशभक्ताचे स्वदेशाभिमानानें ओथंबलेले विचार जपानांतील जवानमर्दांच्या हृत्पटलावर जे एकदां बिंबले ते तेथून ढळले नाहींत !

आपल्या इकडे शाळांतून जशीं क्रमिक पुस्तकें असतात तशीं तीं जपानांतही आहेत. पण आपल्या इकडे 'उत्तम नागरिक' पैदा होण्यासाठीं मराठी पांचव्या पुस्तकांतील श्री छत्रपती शिवाजीमहाराजांचा धडा गाळावा लागला तशी स्थिति मात्र जपानची नाहीं. जपानांत उलट कनफ्युशीअस आणि मेनशीअस यांचे ग्रन्थ विद्यार्थ्यांना वाचावयास देतात. तसेंच तरुण किंवा वृद्ध यांच्यामध्यें वादविवादाचे वेळीं या देशभक्तांचे ग्रन्थ प्रमाणभूत मानितात. परंतु या दोघां साधु पुरुषांच्या ग्रन्थांची नुसती माहिती असली ह्मणजे तेवढ्यावरून कोणालाही विशेष महत्व येत नसे. ज्यांच्या वर्तनांतही त्या सर्वमान्य ग्रन्थांतील विचार उतरले असतील अशांनाच लोकांकडून मान मिळत असे. नुसतें शब्दज्ञान पुष्कळ असून त्यापैकीं आचारविचारांत कांहींच दिसून आलें नाहीं तर असा मनुष्य सर्वत्र थट्टेचा विषय बनतो. पुस्तकी विद्या पुष्कळ झाली पण मन जसेंच्या तसेंच राहिलें तर त्या विद्येचा काय उपयोग? जो नुसता पुष्कळ शिकलेला आहे त्याला आपण विद्वान् समजतों, ही आपली

चूक आहे. त्याचें मन सुसंस्कृत झालें आहे का नाहीं हें पाहिलें पाहिजे. कायदे कौन्सिलमध्यें बसून वाटेल तसें पांडित्य करणें सोपें आहे; तें लवचिक जिभेच्या कोणाही मनुष्याला साधेल, परंतु सत्यासाठीं शारीरिक व मानसिक हाल सोसण्यास कोण तयार होतो, हें पाहिलें पाहिजे. हल्लीं आमच्या देशांत "स्वदेश आणि स्वधर्म" यांचा अभिमान जिव्हाग्रीं येऊन बसला आहे. जो जास्त वल्गना करील, जो देशभक्तीचा जास्त आव घालील अशास आपण देशभक्त समजतों, हें बरोबर नाहीं. जिव्हा ही देशभक्ति जोखण्याची खरी कसोटी नव्हे. ती जर देशभक्तीची खरी कसोटी असती तर आज आमचा देश किती तरी वर आला असता, मग आज जपानच्या उन्नतीचीं कारणें शोधण्याचें प्रयोजनच उरलें नसतें; कारण नुसत्या तोंडानें वल्गना करणाऱ्या देशभक्तांचा आमच्या देशांत आज अठरा वर्षें एक मोठा मेळा भरत आला आहे. पण त्यापासून देशाचें यत्किंचितही हित झालें नाहीं व होण्याची आशा नाहीं! ह्या मेळ्यापासून आगंतुक फायदे कांहीं झाले असतील परंतु जे फायदे व्हावे ह्मणून ही नवीन यात्रा सुरू केली त्या मूळ उद्देशांपैकीं कांहींच साधलें नाहीं! हीच स्थिति स्वधर्माची! धार्मिक उन्नतीला राजकीय उन्नतीचें सहाय लागतें. तें नसल्यामुळें धर्मग्लानी सारखी वाढत आहे. परंतु ह्याही बाबतींत वल्गना करणाऱ्यांची वाण नाहीं. महाभारत, रामायण, वेद, उपनिषदें व स्मृति हीं आज पुष्कळांच्या घरीं पाणी भरीत आहेत; परंतु शब्दज्ञानापलीकडे ज्यांची मजल गेली आहे अशा विभूति विरळा. भगवद्गीतेच्या

अभ्यासाला तर ऊत आला आहे. भगवद्गीतेची आह्मी ही थट्टा करीत नाहीं काय? तो पवित्र ग्रन्थ आह्मीं काय वाचावा? तो अर्जुनानें वाचावा, तो प्रतापसिंहानें वाचावा, तो श्रीशिवाजी महाराजांनीं वाचावा! तो ग्रंथ वाचण्याची आमची काय योग्यता आहे? शब्दज्ञानापलीकडे आमच्या आचरणांत त्यापैकीं काय उतरावयाचें आहे? रामायण, महाभारत आह्मीही वाचतों पण हे ग्रन्थ एकट्या श्रीशिवाजी महाराजांनींच वाचले असें कां ह्मणावयाचें? त्यांतील सार त्यांच्या कृतींत आढळतें ह्मणून. ज्ञान आणि आचार यांचा जेथें मेळ नाहीं तें कसलें ज्ञान! चीन देशांतील तत्व-वेत्ता **वान यंग मिंग** यानें किती तरी वेळां ह्मटलें आहे कीं, 'ज्ञान आणि आचार हीं एकच आहेत, भिन्न नव्हत.' ज्याला नुसतें ज्ञान मात्र झालें आहे परंतु ज्याच्या आचा-रांत कोणताही फरक पडला नाहीं तें एक यंत्रच ह्मणावयाचें. कविता पाहिजे? द्या त्या यंत्राला किल्ली आणि घ्या कविता! कायदेकौन्सिलांत बजेटावर खूप खरमरीत टीका करावयाची आहे? किल्लीला दोन वेढे जास्त द्या ह्मणजे झाला कार्यभाग! हें नव्हे ज्ञान! ह्याला जर ज्ञान ह्मणाव-याचें तर मग आमच्या देशांत अज्ञानाला थारा कोठें उरला? जपानांतील जवानमर्द अशा पुस्तकी मनुष्याची कांहींच किंमत करीत नसे. मद्यप्याच्या तोंडाला जसी मद्याची घाण येते तशी असल्या मनुष्याच्या तोंडाला पुस्तकाची नुसती घाण मात्र येत असते, ज्ञानाचा संचार त्यांत झालेला नसतो. जसें कुचर धान्य पुष्कळ वेळां शिजविलें तरी जसेंच्या तसेंच राहतें, तशांतले हे पुस्तकी लोक होत.

त्यांचा उपयोग राष्ट्राला होण्यापूर्वी त्यांना पुष्कळ वेळां ताव दिल्यावांचून गत्यंतर नसतें. सारांश खरें ज्ञान ह्मणजे तेंच कीं जें विद्यार्थ्यांच्या मनांत बिंबतें व वर्तनांत उतरतें.

**वान यंग मिंग** या चीन देशांतील तत्ववेत्त्याचा वर उल्लेख आलाच आहे. त्या सत्पुरुषाच्या उपदेशाचा परिणाम जपानांतील जवानमर्दांच्या मनावर कांहीं थोडाथोडका झाला होता असें नाहीं. '**मिवा सिसाई**' ह्मणून '**वान यंग मिंग**' याचा एक जपानी शिष्य होता. त्यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं "स्वर्ग आणि पृथ्वी यांचा कर्ता, सर्व प्राणिमात्रांचा कर्ता जो परमात्मा हा मनुष्याच्या अंतःकरणानें मर्यादित झाला ह्मणजेच त्यास आपण मन ह्मणतों; सबब मन हें चित् आणि अक्षय प्रकाशमान आहे." तसेंच दुसऱ्या एका ठिकाणीं तो ह्मणतो, "प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत जो चिद्रूप प्रकाश आहे तो निर्मल आहे; मनुष्याच्या संकल्पाची त्यास बाधा होत नाहीं. त्या प्रकाशाच्या योगानेंच हें चांगलें आणि तें वाईट याचें ज्ञान मनुष्याला होतें, त्याला सदसद्विवेकबुद्धि ह्मणतात. ही बुद्धि प्रत्येकाला ईश्वरानेंच दिलेली असते." हे विचार व अशासारखे दुसरे विचार यांची आमच्या धर्मपुस्तकांतील विचारांशीं किती तरी साम्यता दिसून येते! जपानांतील शिंटो पंथानें आपलीं ह्मणून जीं मतें प्रसिद्ध केलीं आहेत तीं पुष्कळ अंशांनीं चीनदेशांतील **यंग मिंग**च्या मतांचीं अनुवादक आहेत असें दोहोंची तुलना करणारास दिसून येईल. दोहोंमध्यें फरक इतकाच कीं मनुष्याची सदसद्विवेकबुद्धि प्रमादातीत

आहे हें जें शिंटो पंथाचें मत त्याची यंग मिंगनें पराकाष्ठा केली आहे. त्याच्या मतानें ह्या विवेकबुद्धीच्या योगानें मनुष्यास सत् आणि असत् कळतें, इतकेंच नव्हे, तर अध्यात्मिक आणि स्थूल पदार्थ यांचेंही ज्ञान होतें. सारांश, बर्क्ले आणि फिच् यांच्या मताप्रमाणेंच यंग मिंगचें मत होतें. त्याच्या मतानें मनुष्याच्या बुद्धीला अग्राह्य अशी कोणतीच वस्तु नाहीं. त्याचीं सर्वच मतें तर्कशास्त्राला कदाचित् धरून नसतील, परंतु ही गोष्ट कोणासही नाकारतां यावयाची नाहीं कीं, त्याची स्वतःची आपल्या मतांच्या सत्यतेविषयीं पूर्ण खात्री असल्यामुळें लोकांवर त्याच्या मतांचा अपूर्व परिणाम झाला. जपानी लोकांच्या स्वभावाला हल्लीं जें एक प्रकारचें विशिष्ट स्वरूप प्राप्त झालें आहे व त्यांच्या वृत्तींत जी एक प्रकारची समता दिसून येत आहे त्याचें बरेंचसें श्रेय यंग मिंगला देणें वाजवी आहे.

सारांश आपण हल्लीं जपानचा जो लौकिक ऐकत आहों, त्यास बुद्धधर्म, शिंटो पंथ, आणि कनफ्युशीअस, मेनिअस आणि वान यंग मिंग यांचें शिक्षण हीं कारणीभूत झालेलीं आहेत. या सत्पुरुषांच्या शिक्षणापासून जपानी लोकांच्या मनावर जे परिणाम घडले ते थोडक्यांत सांगतां येण्यासारखे आहेत. त्यांचा आपण आतां विचार करूं. जपानी जवानमर्दांच्या धर्मशास्त्रांतील मुख्य कलम त्याची

**समबुद्धी** अथवा **न्यायप्रीति**

हें होय. त्याच्या वर्तनांत लपंडाव मुळींच नसावयाचा. कृष्ण कारस्थानांचा त्याला अति तिटकारा असे. अमुक एक गोष्ट

करीन ह्मटलें ह्मणजे ती करावयाची, त्यांत मागें एक व पुढें एक असा प्रकार नसावयाचा. समबुद्धीची ही व्याख्या कदाचित् चुकली असेल! उदार शिक्षण मिळाल्यामुळें ज्यांचे विचार उदात्त झाले आहेत अशा आह्मां विद्वानांना ही व्याख्या आकुंचित वाटेल, परंतु जपानी जवानमर्दाला आपल्या आचारांत आणि विचारांत मेळ ठेवण्यांतच भूषण वाटत असे! अमुक एक गोष्ट करणें वाजवी आहे, ईश्वराच्या घरीं ती गोष्ट रुजू आहे असा एकदां निश्चय ठरला ह्मणजे मग न डगमगतां ती गोष्ट करण्यांत जपानी जवानमर्दानें केव्हांही माघार घेतल्याचें उदाहरण नाहीं; मग त्यापायीं मरण आलें तरी त्यास त्याची पर्वा नसे. अमुक एका गोष्टीपासून स्वदेशाचें हित आहे असें स्पष्ट दिसत असूनही ज्याला ती गोष्ट करण्याचें धैर्य होत नाहीं तो कसला जवानमर्द? एका नामांकित जवानमर्दानें ह्मटलें आहे कीं "समबुद्धि ही दृढनिश्चय आणि निष्ठा यांची जननी आहे. समबुद्धि ही मनुष्याच्या शरीरांतील हाडासारखी आहे. हाडावांचून ज्याप्रमाणें हातपाय लुले पडतील त्याप्रमाणें मनुष्याच्या ठिकाणीं समबुद्धि नसली तर त्याची नुसती विद्वत्ता कांहीं उपयोगी नाहीं. एक समबुद्धि नसली तर इतर अनेक गुण मातीमोल होत." मोकाशाची पद्धत संपुष्टांत आल्यामुळें ज्या वेळीं ऐदवय्ये लोकांना निर्धास्त मजा मारण्यापलीकडे फारसा उद्योग उरला नव्हता अशा कालीं सुद्धां पुस्तकें पढून विद्वान् बनलेल्या पेक्षां अडाणी परंतु सरळ वर्तनाचा मनुष्य जपानी लोकांना जास्त सन्माननीय वाटत असे. जिवावर बेतली तरी देखील ज्यांनीं आपल्या वाणीला वट्टा लावला नाहीं

अशा "सत्तेचाळीस लढवय्यांची" कथा जपानांत तर आबालवृद्धांस माहीत आहे.

ज्या कालीं 'लवाडी' लष्करी गुणांत मोडत होती व धादांत खोटें बोलणें ह्मणजे मुत्सद्दीपणा वाटत होता अशा कालीं देखील समबुद्धीच्या मनुष्याची लोकांत फार चहा होत असे. समबुद्धि आणि शौर्य या दोन सद्गुणांची जोडी आहे. जवानमर्दाच्या ठिकाणीं त्यांपैकीं एक असला ह्मणजे दुसरा बहुधा असतोच. परंतु शौर्यासंबंधानें विवेचन करण्यापूर्वी क्षणभर दुसऱ्या एका सद्गुणाचा उल्लेख केला पाहिजे. तो सद्गुण ह्मणजे सद्विवेक हा होय. सद्विवेक आणि समबुद्धि ह्या अर्थांचे जपानी भाषेंत जे शब्द आहेत ते एकाच धातूपासून निघालेले आहेत, परंतु त्यांच्या अर्थांत मात्र पुष्कळ फरक होत गेला आहे. सद्विवेक या अर्थी जपानी शब्द 'गिरी' आहे. ह्या 'गिरी'चा धात्वर्थ सद्विवेक असा आहे, परंतु प्रचारांत त्याचा कर्तव्य असा अर्थ झालेला आहे. मुलांचें आईबापांशीं कर्तव्य, वरिष्ठाशीं कर्तव्य, कनिष्ठाशीं कर्तव्य, समाजाशीं कर्तव्य इत्यादि जीं मनुष्याचीं कर्तव्यें आहेत त्याबद्दल जपानी भाषेंत गिरी शब्दाची योजना होते. सद्विवेकानें जी गोष्ट सयुक्तिक दिसते त्याचेंच नाव कर्तव्य. प्रत्येक मनुष्यानें जी गोष्ट करावयाची असेल ती प्रेमपुरस्सर केली पाहिजे. ज्याच्या ठायीं असलें प्रेम नसेल त्यानें तें सद्विवेकानें उत्पन्न केलें

---

१ यांना जपानी भाषेंत रोनिन ह्मणत. परकी लोकांच्या सुळसुळाटापासून जपानाला मुक्त करण्यासाठीं यांचे प्रयत्न चालले होते. अर्थात् परकी ग्रन्थकार यांना निंदाव्यंजक विशेषणें लावतात परंतु जपानी लोक त्यांचे पोवाडे गातात.

पाहिजे. देशहिताचीं अथवा शौर्याचीं कामें करण्याचें प्रेम नसेल तर विचार करून तें प्रेम उत्पन्न केलें पाहिजे. पुष्कळ वेळां असें होतें कीं एकादी गोष्ट करणें आपल्याला अगदीं जरूर असते. परंतु तें कर्तव्य जर अवघड असलें तर आपण टाळाटाळी करूं लागतों. अशा वेळीं सद्विवेक पुढें होऊन आपल्याला आपल्या कर्तव्यापासून पराङ्मुख होऊं देत नाहीं. अशा रीतीनें विचार केला ह्मणजे गिरीचा अर्थ सद्विवेक असला अथवा निवळ कर्तव्य असला तरी कांहीं बिघडत नाहीं. परंतु जपानांतील समाजरचना सर्वस्वीं निर्दोष नसल्यामुळें व त्या रचनेंत कृत्रिमपणा विशेष येत चालल्यामुळें, गिरीचा अर्थ देखील बदलत चालला. जें रास्त दिसेल तें करणें असाच कालांतरानें गिरीचा अर्थ झाला, मग ती गोष्ट सद्विवेकाला मंजुर असो अगर नसो. गिरीचा मूळचा अर्थ सद्विवेक, तोच पुढें कर्तव्य असा झाला; व पुढें पुढें तर लोकापवादाच्या भीतीलाही गिरी ह्मणण्यांत येऊं लागलें. गिरी या शब्दाच्या अर्थांत पुढें पुढें सद्विवेकाचा फारसा संबंध उरला नाहीं. लोकापवादाचें भय मनुष्याला असणें वाजवी आहे. अनेक पापांपासून लोकापवादाचें भय मनुष्याला मागें सारतें. परंतु हरएक प्रसंगीं मी लोकापवादाला संभाळून वागेन हें ह्मणणें बरोबर नाहीं. समाज अवनत झालेला असला ह्मणजे पुष्कळ चांगल्या गोष्टींबद्दलही लोकापवाद येण्याची भीति असते. आपल्या महाराष्ट्र समाजाचाच विचार केला तरी अशा पुष्कळ गोष्टी आहेत कीं, ज्यांबद्दल सतराव्या अगर अठराव्या शतकांत वाहवा झाली असती, त्याच हल्लींच्या सुधारलेल्या शतकांत जननिंदेला पात्र होतात!

असें होण्याचें कारण केवळ समाजाची निकृष्ट स्थिति होय. समाजाच्या तीन चार पिढ्या निकृष्ट स्थितींत गेल्या ह्मणजे मनुष्याच्या विचारांत फारशी प्रगल्भता रहात नाहीं. जेथें समाजाची निकृष्ट स्थिति झाली आहे तेथें लोकापवादांत सद्विवेकाचा भाग तो कितीसा असणार? सद्विवेकाची कसोटी लावून लोकांकडून जे अपवाद येतील त्यांबद्दल प्रत्येकानें भीति जरूर बाळगली पाहिजे; परंतु सद्विवेकाचे ऐवजीं नेभळेपणा अथवा भ्याडवृत्ति यांच्या दृष्टीनें जेथें अपवाद येण्याचा संभव पुष्कळ तेथें अशा अपवादाबद्दल फिकीर ती काय बाळगावयाची? निकृष्ट स्थितींतील समाजाच्या अपवादाची फारशी पर्वा करणें नको असें मी ह्मणतों, याचा अर्थ हल्लींच्या आमच्या अर्ध्या हळकुंडानें पिंवळ्या झालेल्या सुधारकांप्रमाणें उच्छृंखल वर्तन करण्यास मी मुभा देतों असा मात्र न्हे. देशहिताची जी गोष्ट करण्यास आपली सदसद्विवेकबुद्धि आपल्यास सांगेल ती हल्लींच्या स्थितींत प्रत्येकानें केली पाहिजे, व अशा वेळीं नीच स्थितींत कित्येक वर्षें काढल्यामुळें समाजाकडून जे अपवाद येतील त्यांबद्दल विचार करणें नको. अशा स्थितींत लोकापवादाची पर्वा करणें ह्मणजे स्वतः नीच व ढोंगी बनण्यासारखें आहे. लोकापवादाच्या ढोंगाखालीं पाहिजे असल्यास भ्याड लोकांनीं आपला बचाव करावा ! जपानांत असा प्रकार झाला असता, परंतु तेथील जवानमर्दांना

## धैर्य अथवा साहस

या सद्गुणांची चांगली ओळख होती. सत्पक्षाची कड घेऊन दाखविलेलें जें धैर्य तेंच खरें धैर्य होय. कोणत्याही गोष्टीची व्याख्या निषेधात्मक रीतीनें करण्याची कनफ्युशिअसची

तऱ्हा असे; त्याप्रमाणें त्यानें धैर्याची व्याख्या केली आहे कीं "चांगली गोष्ट कोणती हें कळत असूनही ती न करणें हें धैर्य नव्हे." हेंच विधेयात्मक भाषेंत बोलावयाचें ह्मणजे "जें रास्त दिसेल तें करणें, याचें नांव धैर्य." धैर्यासंबंधानें आपली कल्पना पुष्कळ वेळां चुकीची असते. 'सत्य, न्याय प्रामाणिकपणा' वगैरे सद्गुणांसाठीं मरणाला न भितां आपलें कार्य करण्यांत खरें धैर्य आहे. केवळ संकटाला न डगमगणें, कशाही दुर्धर प्रसंगीं न कचरणें, स्वतःला विनाकारण मृत्यूच्या दाढेंत देणें यांस आपण कार्याचा विचार न करतां धैर्य ह्मणतों ही आपली चूक आहे. जपानांतील जवानांची कल्पना अशी नव्हती. सत्य, देश आणि धर्म यांच्या पायीं मरण आलें तरी हरकत नाहीं, परंतु एकाद्या शुष्क नादीं लागून विनाकारण मृत्यूला बळी पडणें ह्मणजे हें "कुत्र्याच्या मरणासारखें" झालें. लढाईंत यश येण्याची आशा नाहीं असें पाहून विनाकारण, किंबहुना आपण मरावें या हेतूनें गर्दींत मिसळणें व स्वतःच्या प्राणास मुकणें हें फारसें कठीण काम नाहीं, तें एकादा सामान्य मनुष्य करूं शकेल; परंतु मरणें जरूर आहे अशाच प्रसंगीं मात्र मरणाला न भिणें, एरव्हीं विनाकारण जिवावर उदार न होणें हेंच खरें धैर्य होय. मानसिक आणि शारीरिक असे जे धैर्याचे दोन प्रकार आपल्या इकडे आहेत, तेच जपानांतही रूढ आहेत.

शौर्य, धैर्य, पराक्रम, निभर्डिपणा मर्दुमकी वगैरे मर्दानी गुणांचें तरुणांना विशेष कौतुक वाटतें. अभ्यासानें व संगतीनें हे गुण मनुष्याला स्वतःचे ठिकाणीं आणतां येण्यासारखे आहेत. जपानांतील तरुण विद्यार्थी ह्या गुणांचे व गुणी जनांचे फार अभिमानपूर्वक पोवाडे गात व

अशा रणवीरांचें आपण अनुकरण करावें अशी त्यांना ईर्षा वाटे. मूल आपल्या आईच्या अंगावरचें तुटतें न तुटतें तोंच पराक्रमी पूर्वजांच्या पराक्रमाच्या काहण्या त्याला वारंवार सांगण्यांत येत. थोडेसें कुठें कांहीं दुखत असल्यामुळें जर मूल रडूं लागलें तर लागलींच 'यःकश्चित् दुखण्यासाठीं रडतोस? लढाईत हात तुटला किंवा पाय मोडला तर मग काय करणार? शत्रूचा सूड कसा उगविणार? साधूंचें रक्षण व्हावें ह्मणून दुष्टांचा संहार कसा करशील? आपल्या पूर्वजांचा लौकिक असाच काय तूं संभाळणार?' इत्यादि रीतीनें आई त्याची खरडपट्टी काढी. 'आई मला भूक लागली' असें ह्मणण्यांत देखील जपानांतील मुलाला कमीपणा वाटे. पराक्रमी पूर्वजांच्या कथा, एकनिष्ठ देशभक्तांचीं उदाहरणें, स्वातंत्र्य राखण्यासाठीं करावे लागलेले रणप्रसंग, इत्यादि आख्यायिका बाळपणींच प्रत्येक विद्यार्थ्याला जपानांत ठाऊक होत. असल्या उपायांनींच केवळ अंगीं धैर्य येतें, असा अर्थ नाहीं. तेथें जातीचेच पाहिजे असतात; परंतु मुळांत धैर्य असलें ह्मणजे असल्या उपायांनीं त्याचा विकास होऊं लागतो. भीति हा शब्द आपल्या मुलाला ठाऊक नसावा अशाबद्दल जपानांतील आईबाप फार काळजी घेत. आपल्या मुलाचे ठिकाणीं धैर्याचा प्रादुर्भाव व्हावा ह्मणून कित्येक वेळां आईबाप आपल्या मुलांना इतक्या कांहीं कडक रीतीनें वागवीत कीं, आपण तें पाहिलें असतें तर हीं मुलांचीं आईबापेंच आहेत कीं काय अशी आपल्याला शंका आली असती. "अस्वलें आपल्या पोरांला खिंडीच्या खालीं फेंकून देतात" असें ते नेहमीं ह्मणत. "माझ्या छाव्याला खडे बोंचतील, कांटा

मोडेल, ऊन्ह लागेल, थंडी वाजेल" अशी सिंहिणीनें कधीं काळजी केली आहे काय? "अन्न आहे तर आहे, अंगावर कपडा असला काय आणि नसला काय, छत्री असलीच पाहिजे असें नाहीं," अशा रीतीनें वागवून आपलीं मुलें काटक निघावीं, श्रम करण्यास त्यांनीं केव्हांही माघार घेऊं नये, देशहितासाठीं केव्हां काय करण्याचा प्रसंग येईल याचा नेम नाहीं असें जपानांतील आईबापांना वाटे. अगदीं तिऱ्हाईत माणसांना निरोप जाऊन सांगणें, सूर्योदयापूर्वी निजून उठणें, न्याहारीपूर्वीच आपल्या उद्योगाला लागणें, थंडीवाऱ्यांत उघडेंच बाहेर पडणें, उन्हांत अनवाणी व छत्रीवांचून जाणें, रात्रच्या रात्र एकादे वेळीं झोपेवांचून काढणें इत्यादि प्रकारचें शिक्षण लहानपणीं जपानी मुलांना मिळत असे. जेथें फांशीं देतात त्या ठिकाणीं जाणें, स्मशानांत अमावास्येच्या रात्रीं बारा वाजतां जाऊन बसणें, भूतपिशाच यांनीं भारलेल्या ठिकाणीं बुद्ध्या जाणें, अपवित्र ठिकाणांचें दर्शन घेणें वगैरे खेळ त्यांना फार आवडत. सार्वजनिक अशा ठिकाणीं जेव्हां एकाद्या अपराध्याला फांशीं द्यावयाचें असेल तेव्हां तेथें तो भयंकर देखावा पाहण्यास लहान लहान मुलांना पाठविण्यांत येत असे, इतकेंच नव्हे, तर काळोख्या रात्रीं एकट्यानें तेथें जाऊन फांशीं दिलेल्या मनुष्याच्या प्रेताला कांहीं तरी खूण करून येण्यास जपानी लोक मुलांना सांगत. सारांश जपानांतील मुलांना मिळणारें हें बाळकडू कोणीकडे आणि आमच्या इकडील 'एक होती ऊ आणि तिला झाली टू' चें शिक्षण कोणीकडे! बागुलबुवा, काळोख, शिपाई, भिकारी आणि त्यांतल्या त्यांत आंधळा अगर पांगळा भिकारी, भूत, चुडेल वगैरेंची

काल्पनिक भीति आमच्या मुलांच्या अंतःकरणांत लहानपणापासून बिंबावी ह्मणून आमच्या इकडे किती तरी दक्षता बाळगण्यांत येते! या शिक्षणाचा काय परिणाम होईल याचा विचार देखील पुष्कळ वेळां आईबापांना शिवत नाहीं. मूल न निजतां रडूं लागलें कीं आलाच बागुलबुवा, पण त्या बिचाऱ्या आईला कोठें ठाऊक असतें कीं हा बागुलबुवा मोठेपणीं देखील आपल्या मुलाला सोडीनासा होतो. वरांतल्या घरांत पण मागल्या चौकांत रात्रीच्या वेळीं आंचवण्यास जातांना सोबत लागली नाहीं अशीं आपल्यांत किती मुलें सांपडतील? जपानांतील मुलांना अंगीं धैर्य येण्यासाठीं लहानपणीं जें शिक्षण मिळतें ह्मणून वर सांगितलें, त्यावर कित्येक कदाचित् अशी शंका घेतील कीं, असल्या शिक्षणपद्धतीपासून मुलांच्या कोमल बुद्धीवर कांहीं विलक्षण परिणाम घडून त्यांचीं मनें निष्ठुर बनण्याचा संभव फार आहे. ही शंका बरोबर आहे. परंतु वर जेवढें सांगण्यांत आलें आहे तेवढ्यानेंच जपानी मुलांचें शिक्षण पुरें होत नसे. त्यांना आणखी इतर पुष्कळ धडे मिळत असत.

## परोपकारबुद्धि,

अनुकंपा, प्रीति, औदार्य, प्राणिमात्रावर प्रेम, दया वगैरे सद्गुणांची जपानांत नेहमीं चहा होत असे, व मनुष्याचे ठिकाणीं जे गुण असावयास पाहिजेत अशा गुणांत वरील गुण श्रेष्ठ मानले जात असत. दया हा राजगुण आहे असें जपानी लोक समजतात. एक तर सर्व गुणांत दया श्रेष्ठ ह्मणून तीस राजगुण ह्मणत व दुसरें, तो गुणच असा आहे कीं तो राजांच्या ठिकाणीं विशेष शोभतो. "दया हा गुण राजाला त्याच्या मुकुटापेक्षां जास्त शोभा आणतो व

राजदंडापेक्षां दयेची योग्यता अधिक आहे.[१]" हें कळण्यास निदान जपानी लोकांना शेक्सपिअर कवीची जरूरी वाटली नाहीं. मोकाशाची पद्धत कोणत्याही देशांत सुरू असली ह्मणजे तिचें पर्यवसान बहुधा दंग्याधोप्यांत व्हावयाचें असा सार्वत्रिक अनुभव असतां जपानला मात्र तो अनुभव आला नाहीं. 'जुल्म, मारामारी, दंगाधोपा' यापासून जपानचा बचाव झाला याचें कारण जपानी लोकांच्या ठिकाणीं दया, परोपकारबुद्धि वगैरे सद्गुण वास करीत होते हें होय. सम-बुद्धि आणि न्यायप्रीति हे गुण ज्याप्रमाणें पुरुषाचे ठिकाणीं जास्त आढळतात त्याप्रमाणें दया हा गुण स्त्रीजातीच्या ठिकाणीं जास्त प्रमाणांत असतो! आणि ह्मणूनच धर्म करणें तो वाटेल त्यास करूं नये, धर्म करितांना देखील कांहीं सारासारविचार पहावा लागतो, अशा प्रकारची इषारत बायकांना वारंवार देण्याचा पुरुषाला प्रसंग येतो. तसेंच पुरुषांनीं हेंही लक्षांत बाळगिलें पाहिजे कीं, निवळ न्यायप्रीतिही उपयोगाची नाहीं. फाजील न्यायप्रीति ह्मणजे निष्ठुरताच ह्मणावयाची.

दया हा गुण जितका चांगला आहे तितकाच त्याचा जपानांत सुदैवानें प्रसार झाला होता. वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि । लोकोत्तराणां चेतांसि को नु विज्ञातु-मर्हति ॥ अशा प्रकारचे लोकोत्तर पुरुष जपानांतही होऊन गेले. शूर पुरुषाच्या ठिकाणीं तर दया हा गुण फारच खुलतो. फारच खुलतो ह्मणण्याचें कारण शूराचे ठिकाणची दया आणि इतरांस वाटणारी दया निरनिराळ्या प्रकारची असते असें नव्हे. दया ही सर्वत्र सारखीच असते. फरक

---

१ शेक्सपिअर कवीचें 'मरचंट आफ् व्हेनिस' नांवाचें नाटक पहा.

इतक्याच कीं, निर्बलाला एकाद्याची दया आली तरी तिचा कांहीं उपयोग होत नाहीं, परंतु बलवानाला कोणाची दया आल्यास त्यास संकटांत मदत करण्याचें सामर्थ्य त्याचे ठिकाणीं असतें.

परोपकारानें सगळें जग आपलेंसें करून घेतां येईल हें जें मेनसिअसचें ह्मणणें तें सत्ताधारी जपानी जवानमर्दांला फार पटलें. मेनसिअसनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं; "पाण्यानें ज्याप्रमाणें विस्तव विझवितां येतो त्याप्रमाणें परोपकारानें सर्व अडचणी दूर करतां येतात, मात्र पेलाभर पाण्यानें सर्व घराला लागलेली आग विझवितां येणार नाहीं. कार्य जितकें मोठें अगर महत्त्वाचें असेल त्या मानानें त्याचें कारणही असलें पाहिजे." तसेंच त्याच्या मताप्रमाणें "सहानुभूति ही परोपकाराचा पाया आहे" आणि ह्मणूनच परोपकारशील मनुष्य दुसऱ्याला संकटांत पाहून स्वतः कष्टी होतो. ॲडॅम स्मिथनें सहानुभूतीच्या पायावर सदाचरणाचीं सर्व मूलतत्त्वें रचलीं आहेत; परंतु त्याच्या किती तरी पूर्वी हें तत्त्व मेनसिअसनें ओळखलें होतें. शूर पुरुषाच्या ठिकाणीं कोणते गुण असावे याविषयीं एका देशांतील तत्त्ववेत्त्याचे विचार दुसऱ्या देशांतील तत्त्ववेत्त्याच्या विचारांशीं जुळलेले पाहून कौतुक वाटणें साहजिक आहे; अथवा प्राच्य राष्ट्रांतील नीती-विषयीं ज्यांच्या भलत्याच समजुती झाल्या आहेत अशा पाश्चात्य राष्ट्रांना जर आपण दाखवूं शकलों कीं बा-बांनो, तुह्मी जीं सदाचरणाचीं मूलतत्त्वें ह्मणून मिरवितां तीं फार पूर्वीपासून आह्मांस व आमच्या पूर्वजांस अवगत होतीं तर किती तरी मौज होणार आहे. अशा तऱ्हेचीं

साम्यता दाखविणारीं वचनें पुष्कळ आहेत कीं तीं पाहून पाश्चात्यांनीं हे विचार इकडून चोरून नेले असावे अशी आपणांस शंका यावी; परंतु विस्तारभयास्तव व अप्रासंगिक ह्मणून तें काम मी येथेंच सोडून देतों.

दुर्बल, शरणागत अथवा जित यांवर दया करणें हें प्रत्येक जवानमर्दाचें कर्तव्य होय असें जपानांत मानीत. जपानांतील चित्रकलेची ज्यास माहिती आहे त्यानें एका प्रसिद्ध संन्याशाचें चित्र पाहिलेंच असेल. तो संन्यासी मूळचा एक रणशूर योद्धा होता. त्याचा दरारा इतका असे कीं त्याचें नांव ऐकतांच शत्रूपक्षाकडील लोक भीतीनें गांगरून जात. जपानच्या इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या सुमानोराच्या लढाईत (सन ११८४) त्यानें शत्रुपक्षाकडील एका इसमास गांठून त्याशीं दोन हात करून त्याला पकडलें. अशा वेळीं पकडलेला मनुष्य आपल्या बरोबरीचा असल्यावांचून त्याला ठार करणें हें लढाईच्या नियमाविरुद्ध होतें. आमच्या रणशूर योद्ध्यानें त्या जित मनुष्यास आपलें नांव विचारिलें. तोही शूराचाच बच्चा होता. त्यानें नांव सांगण्याचें नाकारिलें. त्यावरून त्याचें शिरस्त्राण उडवून पाहतां एका तरुण, ओठाच्या वरचा जारही ज्याचा वाळला नव्हता अशा सुंदर पोराचा चेहरा पाहून आमचा योद्धा कचरला व किंचित् मागें वळून त्या पोराला ह्मणाला "बाळा, जा, तूं आपल्या आईकडे जा, कुमागेच्या (हें त्या रणशूर योद्ध्याचें नांव होतें) तलवारीला तुझ्या रक्ताचा विटाळ होणें नको. तूं त्वरा कर, माझे लोक येऊन तुला गांठण्याच्या पूर्वींच तूं जा, आणि आपले प्राण वांचीव." तो बाळ ढळला नाहीं व त्यानें उलट कुमागेची प्रार्थना केली कीं आ-

पण मला ठार करावें ह्मणजे त्यांतच दोघांचीही अब्रू राहील. कुमागेनें आपली तलवार वर उचलली; परंतु पूर्वी अनेक वेळां अनेकांची डोकीं वरच्यावर त्या तलवारीनें उडविलीं असूनही ह्या वेळीं ती तलवार पुढें सरेना! कुमागेचा हात कांपूं लागला! त्याला आपल्या लाडक्या मुलाची आठवण झाली. त्याचा मुलगा त्याच दिवशीं आपली नवीन तलवार गाजविण्यासाठीं लढाईचें शिंग ऐकतांच बाहेर पडला होता! कुमागेनें त्या मुलाला अजून तरी जा ह्मणून विनविलें परंतु व्यर्थ. लढाईतून परत जाऊन आपलें काळें तोंड वरीं आईबापांना दाखविण्याचें त्या वीरतनयाच्या मनांत सुद्धां आलें नाहीं. अखेरीस आपल्या सोबत्यांच्या घोड्यांच्या टापा ऐकूं येऊं लागल्यावरून कुमागे त्याला ह्मणाला "तुला जर त्यांनीं पकडलें तर तुला माझ्यापेक्षां हलक्या दर्जाच्या माणसाचे हातून मृत्यु येईल, त्यापेक्षां हे परमेश्वरा, तूं आतां ह्या बाळाला आपल्या चरणाजवळ जागा दे," असें ह्मणून कुमागेनें तलवारीचा एक हात फिरविला व ती तलवार त्या तरुणाच्या रक्तानें लाल झाली. गोष्ट लहान परंतु बोधप्रद आहे. शरणागतास जीवदान देण्याची एकाची परोपकारबुद्धि आणि मरण आलें तरी बेहेत्तर परंतु लढाईतून माघार घेतल्याची काळोखी नको अशी दुसऱ्याची निष्ठा यांतून कशाची तारीफ विशेष करावी हें या लेखकास समजत नाहीं. लढाई संपल्यावर कुमागे जय मिळवून परत आला, परंतु त्याला आतां मान अथवा कीर्ति यांपैकीं कशाचीच काळजी उरली नव्हती. त्यानें आपल्या तलवारीला अखेरचा रामराम ठोकला, संन्याशाची दीक्षा धारण केली

च भगवीं वस्त्रें परिधान करून आपलें अवशिष्ट आयुष्य पवित्र स्थलांचें दर्शन घेण्यांत घालविलें !

वरील गोष्टींतील तरुण मुलानें विनाकारण आपला नाश करून घेतला व कुमागेनें त्याला मारावयाचें नव्हतें असें कित्येकांना वाटण्याचा संभव आहे. तें कसेंही असलें तरी इतकी गोष्ट निर्विवाद आहे कीं, जपानांतील प्राचीन जवानमर्दोच्या ठिकाणीं अति बिकट प्रसंगीं सुद्धां भूतदया, प्रेम, अब्रूची चाड इत्यादि उदात्त व प्रशंसनीय मनोविकार जागृत असत. वीरश्रीबद्दल प्रख्यात असलेल्या सातसुमा जिल्ह्यांत तरुणांनीं वाद्यविद्या शिकावी अशी एकवार चाल होती. वाद्यविद्या ह्मणजे रक्तस्राव सुचविणारीं रणवाद्यें वाजविण्याची विद्या नव्हे; तर प्रेमळ, सुस्वर अशा प्रकारची सतार, बीन, वगैरे सारखीं वाद्यें वाजविण्याची कला होय. अशा प्रकारच्या मंजुळ वाद्यांचे स्वर कानीं पडतांच मनुष्याचें अंतःकरण कितीही प्रक्षुब्ध झालेलें असलें तरी तें शांत होतें आणि त्याचे विचार रणमैदानापासून निघून विलासाकडे वळतात. ह्या चालीचा हेतु मनुष्याच्या अंतःकरणांतून वीरश्री समूळ नाहींशी करावी असा खचित नसावा. स्वदेशसंरक्षणाचे वेळीं प्रत्येकाला जरूर त्वेष चढला पाहिजे व मनुष्यांच्या अंगांतील सर्व मर्दानी गुण नाहींसे करून त्यांना भागुबाई अथवा स्वरक्षणासाठीं परावलंबी करण्याचा जपानांत केव्हांही प्रयत्न झाल्याबद्दल शंका सुद्धां घेणें नको ! मनुष्याच्या ठिकाणीं स्वदेशरक्षणाविषयींची लालसा जरूर असली पाहिजे, वीर्याचा त्याच्या ठिकाणीं संचार झाला पाहिजे, परंतु अशा प्रसंगीं सुद्धां क्रूरतेचीं कामें त्याच्या हातून होऊं नयेत, त्यानें निर्दय बनूं नये, एवढाच

सद्धेतु वरील चालीचा असावा असें मला वाटतें. शौर्य ह्मणजे क्रौर्य नव्हे. पोलिबसनें आरकेडियाच्या राज्यव्यवस्थेसंबंधीं जें पुस्तक लिहिलें आहे त्यावरून इतकें दिसतें कीं, तेथील लोक प्रथम फार निर्दय होते; परंतु तीस वर्षांच्या आंतील सर्व तरुणांनीं गायनकला अवश्य शिकली पाहिजे असा तेथें कायदा झाल्यापासून आरकेडियाच्या डोंगराळ भागांतील लोकांच्या हातून क्रूरपणाचीं कृत्यें बहुतकरून झालीं नाहींत! अशा प्रकारें वीरश्री आणि भूतदया यांचें योग्य संमेलन करण्याचा प्रयत्न जपानांतील फक्त सातसुमा प्रांतांतच झाला असें नाहीं. शिरकावाच्या राजपुत्रानें आपल्या डोक्यांत जसे विचार आले तसे ते लिहून ठेवले आहेत; त्यांत विचाराचे पुढील दोन तरंग आहेत. “रात्रींच्या प्रहरीं जिकडे तिकडे सामसूम होऊन तूं आपल्या बिछान्यावर स्वस्थ पडला असतां फुलांचा घमघमाट, घंटांचा दुरून ऐकूं येणारा नाद, आणि क्षुद्र किड्यांचें गुणगुणणें, हीं तूं मोठ्या प्रेमानें सहन केलीं पाहिजेस.” तसेंच, “तुझीं फुलें अस्ताव्यस्त करणारी वाऱ्याची झुळुक, चंद्राला लोपविणारा ढग, आणि कांहीं तरी कुरापत उकरून काढून तुझ्याशीं भांडण करणारा मनुष्य ह्या तिघांपासून तुझ्या मनाला कितीही त्रास होत असला तरी त्यांना तूं क्षमा केली पाहिजेस.” सदरहु विचार बोलून चालून जसे त्या राजपुत्राला सुचले तसे त्यानें लिहिलेले आहेत तेव्हां त्यांत संगत ती कोठून असणार? परंतु रणशूराच्या ठिकाणीं सहनशीलता उत्पन्न व्हावी असाच त्या विचारांचा झोंक स्पष्ट दिसत आहे.

कवित्वाला जपानांत जें उत्तेजन मिळत असे तें तरी

याच कारणामुळें असे. कवितेमध्यें प्रेमळ मनोविकार व्यक्त केलेले असतात, इतकेंच नव्हे, तर तशा तऱ्हेची कविता करणाऱ्या मनुष्याच्या अंतःकरणांत त्यांचें बीजारोपण होत असतें. आपल्या इकडील मराठी काव्यांतून जसा प्राधान्येंकरून भक्तिरस आहे तसा जपानी कवितेंत करुण रसाचा सारखा ओघ दिसून येतो याचें तरी कारण हेंच होय. एका आडदांड जपानी जवानमर्दाबद्दल जी दंतकथा सांगण्यांत येत असते ती ह्या ठिकाणीं सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. "तूं कविता करण्याला शिक" असा त्या आडदांड शिपायाला त्याच्या वरिष्ठानें हुकूम केला. कशावर कविता करूं असा त्यानें उलट प्रश्न केला; तेव्हां "कोकिलाचें गाणें" यावर कविता कर असें त्याला उत्तर मिळालें. किती झालें तरी आडदांड गडी तो. तलवारीशीं नेहमीं ज्याचा प्रसंग त्याच्या हातांत लेखणी पडली तर ती त्याला थोडीच सहन होणार आहे! त्यानें खालील आशयाची कांहीं तरी कविता चिरखडून आपल्या वरिष्ठाकडे फेंकून दिली.

## दिंडी—अर्ध.

श्रवण करितीं जे गान कोकिलाचें
शूर वीरा ते कर्ण काय कामा ?॥

त्या शिपायाची ही धोपट कविता पाहून त्याच्या वरिष्ठानें आपला नाद सोडला नाहीं. कविता करण्याविषयीं पुनः पुन्हा तो त्याला उत्तेजन देतच राहिला. अखेरीस एके दिवशीं रानांत कोकिलपक्षाचें गाणें खरोखरींच कानीं पडतां त्या शूराचें चित्त त्यानें वेधलें व त्याची कवितादेवी जागृत होऊन त्याच्या हातून स्वाभाविकपणें पुढील कविता निर्माण झाली:—

## चामरार्ध.

वृक्षवाटिकेंत मंजुकूजित ध्वनी घुमे ।
धीर वीर तो तयास शांत आयके, रमे ! ॥

अशा तऱ्हेच्या शिक्षणाचा जपानांत फार विलक्षण परिणाम घडून आला. प्रत्येक शिपाई कवि बनला. उघड आहे कीं प्रत्येकाच्या हातूनच उत्कृष्ट कविता निर्माण होऊं लागली असें नाहीं, परंतु प्रत्येकाला तो नाद लागला होता. कोरनर हा आपल्या वयाच्या लहानपणींच जखमी होऊन रणांगणावर पडला असतां देखील त्यानें आपल्या "आयुष्यास अखेरचा रामराम" ह्मणून जी कविता केली ती जपानी लोक मोठ्या प्रेमानें व अभिमानानें गातात! जपानांत जे अनेक युद्धप्रसंग होऊन गेले त्यांतून अशा प्रकारच्या गोष्टी अनेक घडल्या आहेत. कित्येक वेळां असें व्हावें कीं शत्रूवर चाल करून जात असतां एखाद्या जवानमर्दाला एखादी कविता सुचावी, आपल्या पोतडींतून कागद लेखणी काढून त्यानें ती टिपून ठेवावी व अखेरीस तो धारातीर्थी पडल्यावर तें कागदाचें चिटोरें त्याच्या खिशांत सांपडावें !

वादन, गायन व कवित्व यांच्या योगानें जपानी जवानमर्दांचें वीर्य कायम राहून त्यांच्या ठिकाणीं दयेचा प्रादुर्भाव झाला. दुसऱ्याचें दुःख पाहून ते दुःखी होत. दुसऱ्याला न दुखविण्याविषयीं ते काळजी वाहूं लागले. त्यांचा आडदांडपणा जाऊन त्यांच्या ठिकाणीं माणुसकी वास करूं लागली. ते मर्यादशील बनले आणि मर्यादेपासून त्यांच्या ठिकाणीं

## शिष्टाचारसंपन्नता

आणि सौजन्य यांचा उद्भव झाला. जपान देश पाहण्यासाठीं

जे जे ह्मणून जाऊन आले आहेत त्यांच्या नजरेस जपानी लोकांचा सभ्यपणा व विनयशीलपणा हे आल्यावांचून राहिले नाहींत. मनुष्यानें शिष्टाचार पाळले पाहिजेत, परंतु ते न पाळल्यास आपणास शिष्टाचार अवगत नाहींत असा लोकांचा समज होईल अशी भीति वाटून शिष्टाचाराला जपण्यांत फारशी मातब्बरी नाहीं. आपल्या वर्तनानें दुसऱ्याचें मन दुखावलें जाऊं नये ह्मणून शिष्टाचार पाळण्यांत भूषण आहे. प्रत्येक समाजांत कांहीं शिष्टाचार ठरलेले असतात. निरनिराळ्या समाजांतील शिष्टाचार एकमेकांशीं जुळणें संभवत नाहीं, परंतु तेवढ्यावरून एका समाजांतील लोकांनीं दुसऱ्यांच्या शिष्टाचाराबद्दल तिरस्कार प्रदर्शित करणें हा मूर्खपणा होय. हिंदु लोकांच्या रीतरिवाजाबद्दल—किंबहुना प्राच्य राष्ट्रांच्या चालीरीतीबद्दल—नाकें मुरडण्याची संवय अनेक युरोपियन लेखकांना जडलेली आढळते, पण ही त्यांची चूक आहे हें थोडा विचार केल्यास समजण्यासारखें आहे. आपल्या वर्तनानें दुसऱ्याचें मन दुखूं नये अशी बुद्धि होणें हें थोर कुलशीलाचें लक्षण होय. आपल्या मुलांना शिष्टसंप्रदाय समजून त्यांनीं सभ्यपणानें वागावें अशाबद्दल जपानांतील आईबाप फार काळजी घेतात. आपल्या इकडे दुर्दैवानें याच्या उलट प्रकार घडत आहे हें नमूद करण्यास अति दुःख वाटतें. विद्वान् वडील जेथें आपल्या वर्तनानें सर्व समाजाला दुखविण्यांत मानसिक धैर्य आहे असें समजतात तेथें ते चिरंजीवांना कोठून चांगलें वळण लावणार? फार क्षुल्लक गोष्टीवरून समाजाला कशा प्रकारचें वळण लागत आहे हें एकादे वेळेस ताडतां येतें. सुधारणेच्या मार्गापासून किंचित् आडरस्त्याला असलेल्या कोणत्याही शहराच्या

आजच्या व सुमारें १५।२० वर्षांमागच्या स्थितींत पुष्कळ फरक पडल्याचें पाहणारांस दिसून येईल. सुमारें पंधरा वर्षांमागें अशा शहरीं रस्त्यानें जातांना विडी ओढणारा मनुष्य फार क्वचित् आढळत असे. विडी ओढणारे त्या वेळीं कोणी नव्हते असा अर्थ नाहीं. परंतु आपणास विडी ओढतांना गांवांतील थोर, संभावित व वयोवृद्ध माणसांनीं पाहिल्यास त्यांचें मन दुखावेल, ते आपणांस नांवें ठेवतील अशी त्या वेळीं भीति वाटत असे. शिष्टाचाराच्या विरुद्ध वागण्याविषयीं त्या वेळीं इतकें भय वाटे. परंतु हल्लीं आपल्या उच्छृंखल वर्तनानें वृद्ध नागरिकांना जितकें आपण दुखवूं, जुन्या चालीरीतींना पायाखालीं तुडवून आपल्या बेफाम मनाला जितकें आपण स्वैर संचार करूं देऊं तितके आपण अधिक विद्वान्, अधिक धैर्यवान्, अधिक सुधारणा-प्रिय असा समज रूढ होऊं पाहत आहे. हें थोडेंसें विषयांतर झालें पण आपल्या समाजांतील सर्व लोकांनीं—विशेषतः सुशिक्षितांनीं—शिष्टचाराबद्दल इतकें बेफिकीर राहून आपल्या शहरांतील मुलाबाळांना वाईट उदाहरण घालून देऊं नये असें सुचविण्यासाठीं तें करावें लागलें.

तरुण जवानमर्दांच्या ठिकाणीं शिष्टाचारसंपन्नता असणें हा फार मोठा गुण होय असें जपानांत मानीत. शिष्टाचार-संपन्नतेपासून स्वदेशबांधवांबद्दल प्रेम उत्पन्न होतें. मनुष्याचे ठिकाणीं सौजन्य असलें ह्मणजे तो दुसऱ्याच्या कल्याणा-साठीं स्वतः त्रास सोसण्यास तयार होतो, दुसऱ्याचें दुःख पाहून तो विव्हल होतो, दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून त्याला मत्सर तर वाटत नाहींच, पण उलट आनंद होतो, स्वतःच्या सुस्थितींत तो गर्वानें फुगत नाहीं, त्याच्या वर्तनांत सौम्य-

पणा राहतो, त्याच्या ठिकाणीं परोपकारबुद्धि जागृत होते, दुसऱ्याच्या कल्याणासाठीं स्वार्थत्याग करावा असें त्याला वाटूं लागतें, त्याचें मन गंभीर बनतें, सारांश अंगीं सौजन्य असलें ह्मणजे त्याच्या मागोमाग दुसरे कितीतरी सद्गुण त्या सज्जनाचा आश्रय करूं पाहतात! यावरून प्रोफेसर **डीन** साहेबांनीं अंगीं माणुसकी येण्यास ज्या सहा गुणांची आवश्यकता आहे ह्मणून ह्मटलें आहे त्यांत सौजन्याला बऱ्याच वरच्या पायरीवर ठेवलें आहे यांत कांहीं विशेष नवल नाहीं हें वाचकांस दिसून येणार आहे.

सौजन्याची मी इतकी तारीफ करितों यावरून सर्व गुणांत सौजन्य श्रेष्ठ आहे असें मी समजतों असा मात्र कोणीं बोध करून घेऊं नये. सौजन्याची आपण मीमांसा केली तर आपणांस असें आढळून येईल कीं दुसऱ्या अनेक गुणांशीं त्याचा अन्योन्य संबंध आहे. आणि हेंही खरेंच आहे. असा कोणता गुण आहे कीं ज्याची प्रशंसा होण्यास दुसऱ्या कोणत्याही गुणांची अपेक्षा नसते? पुष्कळ सद्गुण परस्परावलंबी असतात.

निरनिराळ्या देशांतील आणि समाजांतील शिष्टाचार निरनिराळे असण्याचा संभव आहे, परंतु तेवढ्यावरून एकानें दुसऱ्याला हंसण्याचा अधिकार आपणाकडे घेणें हें योग्य नव्हे, हें वर सांगितलेंच आहे. तथापि जपानांत शिष्टाचाराचें एवढें स्तोम माजविलेलें पाहून ज्यांनीं आपल्या लेखणीच्या द्वारें तिरस्कार व्यक्त केला आहे असे युरोपीय ग्रंथकार कांहीं थोडे थोडके नाहींत. दुसऱ्याशीं बोलण्यापूर्वी त्याला आपली आदरबुद्धि कशी दाखवावी, चालावें कसें, बसावें कसें, जेवावें कसें, ह्या क्षुल्लक गोष्टी आहेत खऱ्या,

पण त्या देखील जनरूढीप्रमाणें शिस्तवार करण्यांत एक प्रकारचें राष्ट्रीय शिक्षण आहे. लोकांच्या वर्तनांवर इतकी बारीक नजर ठेवण्यांत व त्यांचें वर्तन इतकें नियमबद्ध करण्यांत कालाचा अपव्यय होतो असें कित्येकांचें मत आहे. तसेंच समाजानें घालून दिलेले असले क्षुद्र नियम पाळणें हा मूर्खपणा होय असें कांहीं युरोपीय लोकांना वाटतें. हीं मतें कदाचित् सर्वांशीं चुकीचीं नसतील, पण घटकोघटकीं पोषाक करण्याच्या पद्धति ज्यांच्यांत बदलत आहेत व त्या बदलत जाणाऱ्या पद्धतीप्रमाणें फेरबदल करण्यांत ज्यांना मोठेपणा वाटत आहे त्यांनीं जपानचे लोक क्षुद्र गोष्टींत फार मन घालतात, ह्मणून नाकें मुरडावीं हें अंमळ विलक्षण दिसतें.

जपानच्या करण्यांत कांहीं वावगेपणा आहे असें मला वाटत नाहीं. जी जी ह्मणून गोष्ट करावयाची असेल ती ती यथापद्धत करणें हेंच श्रेयस्कर होय. त्यांत कालाचा अपव्यय होण्याऐवजीं योग्य व्यय होतो असेंच विचारांतीं प्रत्येकास आढळून येईल; शिवाय प्रत्येक गोष्ट शिस्तवार करण्यांत जी एक प्रकारची व्यवहाराला शोभा येते ती निराळीच. आपल्या समाजांत आणि त्याचप्रमाणें जपानांतही अशा गोष्टींना जें धार्मिक स्वरूप आलेलें आहे त्याचा विचार करण्याचें हें स्थल नव्हे, तथापि इतकी गोष्ट खरी कीं असले लहानसहान सामाजिक नियम पाळण्यांत सुद्धां नैतिक शिक्षण मिळत असतें. नवख्या मनुष्याला असल्या बारीकसारीक गोष्टींत शिस्त ठेवण्याचा कंटाळा वाटेल पण एकदा त्यास संवय झाली ह्मणजे त्यास तसें वाटणार नाहीं. परकी समाजाचे असले बारीकसारीक आचारविचार पाहून आ-

पण जेव्हां त्यांना हांसतों तेव्हां आपण स्वतःचं आचार-विचार विसरत असतों; परंतु माझी समजूत अशी आहे कीं प्रत्येक समाजांत असले आचार आणि विचार हे असाव-याचेच, मग एकाद्या समाजांत ते पोषाकाबद्दल असले तर दुसऱ्यांत ते भोजनविधीबद्दल असूं शकतील. सारांश अशा बाबतींत कोणीं कोणांस हसूं नये हेंच खरें.

जपानांत चहा पिण्याचें बंड फार आहे. चहा पिण्याचें तिकडे एक शास्त्रच बनलें आहे. आपल्या इकडे नित्याच्या भोजनाला ज्याप्रमाणें एक प्रकारचें विशिष्ट धर्मस्वरूप प्राप्त झालें आहे त्याप्रमाणें जपानांत चहा पिण्याला पारमार्थिक स्वरूप आलें आहे. चहा ज्या ठिकाणीं घ्यावयाचा ती जागा निवांत आणि स्वच्छ असावी लागते. चहा पितांना मन स्थिर होतें, आणि चर्या गंभीर बनते. स्थिर मन व गांभीर्य या गोष्टी पारमार्थिक चिंतनाला आवश्यक आहेत. अशा प्रकारच्या विचारसरणीवरून जपानांत चहा पिण्याचें एक शास्त्र बनविण्यांत आलें आहे; परंतु आपल्या इकडे चहाला नाहीं तरी भोजनाला तसलेंच महत्व प्राप्त झालें असल्या-मुळें त्यांच्या चहाविधींत आपल्याला कांहीं नवीन शिकण्या-सारखें नाहीं आणि ह्मणून त्याचा जास्त विस्तार करणें नको.

सौजन्याच्या योगानें मनुष्याचें वर्तन बाळबोध दिसूं लागलें तरी देखील त्यापासून पुष्कळ फायदा झाला असें ह्मणतां येईल; परंतु सौजन्यापासून याहीपेक्षां जास्त काम-गिरी होत असते. परोपकारबुद्धि, विनय आणि दुसऱ्याचें मन न दुखविण्याची इच्छा यांच्यापासून सौजन्याचा उद्भव असल्यामुळें, त्याच्या योगानें दुसऱ्याबद्दल आपणाला व आपल्याविषयीं दुसऱ्याला स्वाभाविकपणें सहानुभूति वाटू

लागते. अशी सहानुभूति वाटूं लागण्यास दुसऱ्याचें जें सुखदुःख तेंच आपलें सुखदुःख अशी आपण कल्पना केली पाहिजे. एकंदर राष्ट्राचें जें सुखदुःख तेंच आपलें सुखदुःख अशी उदात्त कल्पना होणें सामान्य नव्हे. तशी कल्पना ईश्वराची कृपा असल्यावांचून एकदम कोणालाही होत नाहीं. राष्ट्राचें दुःख पाहून ज्याचें अंतःकरण तिळतिळ तुटतें, राष्ट्राची विपन्नावस्था पाहून ज्याला अन्नपाणी गोड लागत नाहीं व बिछान्यावर स्वस्थ झोंप येत नाहीं अशीं माणसें एकदम निर्माण होत नसतात. किंवा तीं स्वर्गांतून उतरत नाहींत. आरंभीं लहानसहान प्रसंगीं असल्या प्रकारचें तादात्म्य उत्पन्न होण्याचे धडे घेतले पाहिजेत. असले धडे मिळ-ण्याला कांहीं प्रसंग शोधावे लागत नाहींत. दुष्काळ आणि रोग यांनीं पीडित राष्ट्रांत तर असले प्रसंग हरदम मनु-ष्याला येतात. कित्येक प्रसंग तर इतके क्षुल्लक असतात कीं ते कोणाच्या लक्षांत देखील येत नाहींत. चैत्र महि-न्याच्या भर दोन प्रहरीं छत्री घेऊन एकजण बाहेर पडतो व बिनछत्रीचा त्याला दुसरा भेटतो. ते परस्परांशीं बो-लण्यासाठीं थांबतात. तो दुसरा मनुष्य विशेष परिचयां-तला असला तर पहिला त्याला आपल्या छत्रींत घेतो, परंतु तितक्या घरोब्याचा नसल्यास आपली छत्री मिटून दोघेही उन्हांत उभे राहतात! आणि हें सर्व कृत्य त्या दोघां-च्याही लक्षांत येत नसतें, मग तिऱ्हाइताच्या कोठून येणार! किती क्षुद्र प्रसंग हा! तो कोणाच्या तरी लक्षांत येतो काय! पण अशा वेळीं देखील आपल्यास न कळत आपण जो धडा शिकत असतों तो हाच कीं आपल्या बांधवांचें जें सुखदुःख तेंच आपलें सुखदुःख होय! सौजन्यदर्शक अशी

जपानांत आणखी एक तऱ्हा आहे व ती आपल्या इकडच्या तऱ्हेशीं जुळते ह्मणून ती नमूद करणें अगत्याचें वाटतें. ही दुसरी तऱ्हा देखील मोठी महत्वाची आहे असें नाहीं. ती इतकी क्षुल्लक आहे कीं पाश्चात्य लेखकांना तिच्यांतलें रहस्य देखील कळत नाहीं. निरनिराळ्या देशांत एकच गोष्ट व्यक्त करण्याचे निरनिराळे प्रकार आहेत, असें ह्मणून पाश्चात्य लेखक त्या तऱ्हेचा जास्त विचार देखील करीत नाहींत. ती तऱ्हा अशी आहे. पाश्चात्य राष्ट्रांत कोणी कोणाला नजराणा करावयाचा असला तर तो नजराणा करणारा गृहस्थ आपल्या नजराण्याची तारीफ करितो. "ही वस्तू कांहीं सामान्य नाहीं, ती फार सुंदर व मौल्यवान् आहे. ती तशीच आहे ह्मणून मी ती आपणास नजर करीत आहें, एकादी हलकी वस्तु मी आपणांस कशी नजर करीन" ? वगैरे शब्दांनीं नजराणा देणारा गृहस्थ त्या पदार्थाची थोरवी गात सुटतो. जपानांत किंवा आपल्या देशांत सुद्धां याच्या अगदीं उलट प्रकार आहे. जी वस्तु नजर करावयाची तिची आपण तारीफ करण्याऐवजीं तिचा कमीपणा दाखवून ज्याला आपण ती प्रेमपुरस्सर देणगीदाखल देतों त्याची योग्यता आपण गात असतों. "आपली योग्यता फार मोठी आहे, मी गरीब मनुष्य, आपली संभावना ती काय करणार ? मी जी देणगी ह्मणून आपणांस देऊं पाहत आहें ती यःकश्चित् असली तरी ती मी मोठ्या प्रेमानें आपणांस अर्पण करीत आहें, तेव्हां तिचा आपण स्वीकार करून गरीबाला आपला ऋणी करून ठेवावें." अशा रीतीनें आपण देणगीचें महत्व मुळींच लक्षांत न घेतां ज्याला देणगी द्यावयाची त्याची योग्यता फार मोठी

आहे असें दाखवितों. दोन्ही तऱ्हा वास्तविक एकाच अर्थाच्या आहेत. पण त्यांत विचार करणारांस मोठा फरक दिसणार आहे. पाश्चात्य व प्राच्य लोकांच्या मनोवृत्तींची यावरून कांहींशी परीक्षा होण्यासारखी आहे. एक त्या देणगीच्या बाह्य स्वरूपाकडे लक्ष देतो व दुसरा तिच्या अंतःस्वरूपाकडे—ती देण्यांत जें प्रेम सांठविलें असतें त्या प्रेमाकडे—पहात असतो !

सारांश, शिष्टाचाराचे अशा प्रकारचे अनेक नियम प्रत्येक समाजांत असतात व तसे ते जपानांतही आहेत. ते नियम न मोडण्याबद्दल जपानांत फार काळजी घेण्यांत येते आणि तेणेंकरून जपानी जवानमर्दांना उत्कृष्ट वळण लागलें व लागत आहे. विद्यार्थी अलीकडे आपल्या शिक्षकांचा मान ठेवीनातसे झाले आहेत अशा तऱ्हेची तक्रार जपानांत ऐकूं येण्याचें कारण नाहीं. अशा तऱ्हेची तक्रार करणारांचा हेतु विद्यार्थ्यांना नांवें ठेवण्याचा असतो; परंतु माझ्या अल्प समजुतीला असें वाटतें कीं ज्या समाजांत अशी तक्रार करण्यास जागा असते, तेथील विद्यार्थ्यांकडे याचा दोष न येतां तो सर्वस्वी त्यांच्या गुरूंकडेच जातो. गुरुजींनीं वाटेल तसे चाळे करावे, सामाजिक नियमांना झुगारून देऊन एकंदर समाजाला दुखविण्याचें घोर पातक करावें, स्वधर्माची, शिष्टाचाराची, थोर वाडवडिलांची थट्टा करावी आणि फिरून दुसऱ्यांनीं आपला मान राखावा अशी इच्छा करावी या परस्परविरुद्ध गोष्टी कोणत्याही समाजांत होणें शक्य नाहींत, मग तो समाज इंग्लंडांतल्या सारखा सुधारलेला असो अथवा महाराष्ट्रांतल्या सारखा अडाणी असो. शिष्टाचार पाळल्यानें मनुष्य स्वतः सन्मान-

नीय होतो, त्याच्या ठिकाणीं गांभीर्य येतें, आणि मग त्याचा अपमान करण्याचें धाडस सहसा दुसऱ्याचे हातून होत नाहीं. रानटी गॉल लोक रोमवर चाल करून जात असतां रोमच्या सेनेट सभेंत घुसून तेथील वृद्ध व वंदनीय सभासदांना त्यांनीं दाढीमिशा धरून बाहेर काढलें असें इतिहासांत लिहिलें आहे. यांत मला वाटतें त्या वृद्धांचाच दोष आहे. अनेक पिढ्यांच्या दुर्वर्तनानें त्यांच्या स्वतःच्या ठिकाणीं सौजन्य उरलें नव्हतें आणि ह्मणून त्यांच्यावर असा अपमान सहन करण्याचा प्रसंग आला! शिष्टाचारासंबंधानें जपानांतील ओगसवारा या गृहस्थांनीं फार उत्कृष्ट लेख लिहिले आहेत. त्यांत त्यांनीं आपल्या एकंदर मतांचें सार ह्मणून दिलें आहे तें असें—"शिष्टाचारानुरूप वर्तन करण्याचा मुख्य हेतु असा आहे कीं तेणेंकरून मनुष्याच्या ठिकाणीं इतकें गांभीर्य यावें आणि त्याचें मन इतकें प्रगल्भ व्हावें कीं तो नुसता स्वस्थ बसला असतांना देखील दुसरा कितीही आडदांड मनुष्य आला तरी त्याला त्याचा अपमान करण्याची छाती होऊं नये!" शिष्टाचारसंपन्नतेचें

## सत्यवक्तेपणा

हें भूषण आहे. एकादा मनुष्य कितीही शिष्टाचारसंपन्न असला आणि त्याच्या ठिकाणीं इमान नसलें तर ती शिष्टाचारसंपन्नता ह्मणजे नुसतें थोतांड होय! 'मासामुने' यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं "योग्य मर्यादेच्या पलीकडे शिष्टाचारसंपन्नता गेल्यास खोटें बोलण्याचें पातक पदरीं पडण्याचा संभव फार असतो." एका प्राचीन कवीनें तर 'पोलोनिअस'वर ताण केली आहे. तो ह्मणतो "हे

मनुष्या, तुझें मन बेइमानी होऊं देऊं नकोस! बेइमान होण्यांत तूं स्वतःचें नुकसान करीत असतोस, सत्यापासून तुझें आचरण तर कधीं ढळूं देऊं नकोसच परंतु असत्याचरणाची कल्पना नुसती मनांत देखील आणूं नकोस! तूं असें केलेंस ह्मणजे ईश्वर तुझ्याजवळ आहे, त्याची प्राप्ती करून घेण्याला तुला निराळ्या खटपटी करण्याची जरूरी नाहीं." सत्याची इतकी महती त्यानें वर्णिली आहे?

खोटें बोलणें अथवा दुटप्पी भाषण करणें हें भित्रेपणाचें लक्षण होय. व्यापारी अगर शेतकरी यानें दुटप्पी भाषण केल्यास किंवा खोटें बोलल्यास एक वेळ क्षम्य होईल. परंतु ज्यानें आपणास जवानमर्द ह्मणवावें त्यानें असला भागुबाईपणा दाखविणें कधींही रास्त होणार नाहीं, अशी जपानांतील सर्व जवानांची कल्पना होती. जवानमर्दांच्या शब्दाला जपानांत किंमतही तशीच येत होती. जवानमर्दाचें भाषण ह्मणजे तें खरें असावयाचें, असा सार्वत्रिक समज होता. जपानांत जवानामर्दाशीं देवघेवीचा जो व्यवहार होत असे तो सर्व कागदपत्रावांचून होई. त्याच्या नुसत्या शब्दावर लोकांचा भरंवसा बसत असे. मी तुझा देणेदार आहें असें एकदां त्यानें कबूल केलें ह्मणजे मग कालत्रयीं तो खोटें बोलावयाचा नाहीं. एकाद्या व्यवहाराबद्दल कागदपत्र करून देणें त्याला कमीपणाचें वाटे. दुटप्पी वर्तन करणारा जवानमर्द फार करून नसावयाचाच. पण कोणी तसा निघालाच तर त्याला मरणाचें प्रायश्चित्त मिळत असे! एकादी गोष्ट खरी आहे अशी दुसऱ्याची खात्री करण्यासाठीं शपथ घेण्याचा प्रसंग आला तर जपानी जवानमर्दाला मरणप्राय दुःख होई. ते शपथ केव्हांच वाहत नसत असें नाहीं.

आपल्या तलवारीची शपथ अथवा देवादिकांची शपथ ते केव्हां केव्हां घेत, परंतु पदोपदीं शपथ वाहणें, कारण नसतां शपथ वाहणें, सहज भाषणांत देखील "देवाच्यान, आईच्यान, बापाच्यान" ह्मणून शपथा वाहणें हें दुबळे-पणाचें लक्षण आहे असें ते मानीत. शपथ वहावी कोणीं? जो खोटें बोलतो त्यानें, कारण एरव्हीं त्याच्या-वर कोणी विश्वासच ठेवणार नाहीं. परंतु सत्यवक्तेपणा-बद्दल ज्यांची ख्याति असे, किंबहुना असत्य भाषणा-बद्दल ज्यांच्यांत देहांत शासन मिळाल्याचे दाखले आहेत त्या जवानमर्दांना शपथेचें काय प्रयोजन? फार काय सांगावें, परंतु प्रसंग पडल्यास आपले प्राण देण्यास जपानी जवानमर्द तयार होत, परंतु ते आपल्या शब्दाला कधींही बट्टा लावून घेत नसत! अशा प्रकारच्या उदाहरणांबद्दल वाचकांनीं 'गेटी' साहेबांचें 'फास्ट' नामक पुस्तक वाचून आपली खात्री करून घ्यावी.

एकादे वेळेस मोठी पंचाईत येऊन पडते. खरें बोलावें तर थोडक्यासाठीं दुसऱ्याचें मन दुखवावें लागतें, आणि खोटें बोलावें तर बोलून चालून खोटें बोलण्याचें पातक लागतें. "बरें आहे, येतों, मीं आपला फार वेळ घेतला" असें एकानें ह्मटल्याबरोबर दुसरा लागलींच "छे छे, वेळ कसचा" असें उत्तर करतो; परंतु खरोखर त्याचा वेळ जात असतो, किंबहुना हा आतां जाणार तरी केव्हां असेंही त्याच्या मनांत येऊन जातें. "कसें काय, ठीक आहेना?" कीं लागलीच "ठीक आहे" ह्मणून सहज शब्द तोंडावाटे निघतात, मग त्या वेळीं एकीकडे पोट कां दुखत असेना! बरें, असें न करावें तर तिकडूनही मोठी पंचाईत पडते.

"हो आपण माझा फार वेळ घेतला, आपण विनाकारण माझा वेळ घेत आहां हें आपणांस समजावयास पाहिजे होतें." असें उत्तर सत्याला धरून असलें तरी तें देणें योग्य होईल काय ? शिष्टाचाराच्या विरुद्ध हें वर्तन व्हावयाचें नाहीं काय ? "कसें काय आहे" विचारतांच, " पायांत कांटा बोंचला आहे तो थोडासा ठणकतो अगर आज सकाळींच काकडी खाल्ली ह्मणून किंचित् पोट दुखत आहे" हें सांगितलें काय आणि न सांगितलें काय, सारखेंच नव्हे काय ? असले प्रसंग क्षुल्लक होत. यांत खोटें बोलण्यासारखें होत नाहीं; तें भाषण कदाचित् खरें नसेल, पण तें खोटेंही नसतें. एकीकडे आपला थोडासा वेळ जरी जात असला तरी पण आपणास आपल्या मित्राच्या भेटीचा जो लाभ होत असतो, त्यामुळें थोडासा वेळ गेला तरी हरकत नसते, व पोट दुखणें अगर कांटा खुपणें यांनीं प्रकृतींत कांहीं विशेष फरक पडत नाहीं. तेव्हां ह्या व असल्या प्रसंगीं जे शिष्टसांप्रदाय असतील तदनुरूप वर्तन करणें हेंच इष्ट होय. परंतु शिष्टसांप्रदायाप्रमाणें वर्तन करीत असतां आपण दुसऱ्यास गोड बोलून फसवीत नाहींना, एवढी खबरदारी मात्र प्रत्येकानें अवश्य घेतली पाहिजे. सत्यवक्तेपणाबद्दल वर जें विवेचन झालें त्यावरून जपानांत खोटें बोलणें कोणासच माहीत नसे कीं काय, अशी वाचकांस शंका येणें साहजिक आहे. वर जें विवेचन झालें तें जपानांतील फक्त जवानमर्दांपुरतें होतें आणि खोटें बोलणें त्यांना खरोखरच माहीत नसे. परंतु जपानांतील व्यापारी वर्गाबद्दल मात्र असें ह्मणतां यावयाचें नाहीं, हें मोठ्या दिलगिरीनें कबूल करावें लागतें. ही गोष्ट पाश्चात्य प्रवा-

शांच्याही लक्षांत येऊन चुकली आहे व त्यांनीं त्याबद्दल बरेंच लेखनसुख घेतल्याचें दिसून येतें. हा प्रकार जपानला खालीं पहावयास लावण्यासारखा आहे यांत शंका नाहीं; परंतु तेवढ्यावरून सर्व राष्ट्राला दोष देण्यापूर्वी असें कां झालें याचा आपण थोडासा शांतपणें विचार करूं ह्मणजे त्यांत सुधारणा करण्यास अजून मार्ग आहे असें आपणांस दिसून येईल.

मनुष्याला जितके ह्मणून धंदे करितां येण्यासारखे आहेत त्यांत लढण्याचा धंदा आणि व्यापार यांच्यांत जितका विरोध दिसून येतो तितका दुसऱ्या कोणत्याही दोन धंद्यांत दिसत नाहीं. आपल्या इकडे ज्याप्रमाणें उत्तम शेती, मध्यम व्यापार, आणि कनिष्ठ नोकरी असें एकवार आपण समजत होतों, त्याप्रमाणें जपानांत, शिपाईगिरी, शेतकी, शिल्पकला आणि व्यापार अशी धंद्यांची पायरी लावली होती; ह्मणजे उत्तम शिपाईगिरी आणि कनिष्ठ व्यापार मानला जात असे. एकाद्या जवानमर्दाची शिपाईगिरी सुटली तर तो फार तर शेतकी करून आपलें पोट भरी, पण त्यानें व्यापार कधींही करूं नये. तराजूचा त्याला मनापासून तिटकारा वाटे. ज्यानें एक वेळ हातांत तलवार नाचविली त्यानें दुर्दैव ओढवल्यास नांगर हातीं घ्यावा परंतु तागडीला शिवूं नये असा जपानांतील जवानमर्दांचा समज होता. वणिग्वृत्तीला ते इतकें कनिष्ठ लेखीत. झाला हा प्रकार फार उत्तम होता. तेणेंकरून जपानांतील कांहीं धंद्यांच्या लोकांत तरी अजून सत्यप्रीति जाज्वल्य वास करीत आहे. आरंभीं हातीं तराजू धरून नंतर तलवार धरण्याचा जर कां त्यांच्यावर प्रसंग येता तर आज त्या राष्ट्रांत सत्याची चाड फार थोड्यांना

उरली असती. तसें झालें नाहीं हेंच ठीक; नाहीं तर प्रसंग पडला म्हणजे गोगलगाय व प्रसंग निघून गेला म्हणजे फिरून वाघोबा ते वाघोबा अशी त्यांना नीच खोड लागली असती. आणि मग ती झांकून ठेवून आपली छाप राखण्यासाठीं मुत्सद्देगिरी, वजन, राजनीति, असल्यासारखे जाडे शब्द योजण्याचा त्यांच्यावर प्रसंग आला असता. चणे, डाळ, मुरमुरे जोखण्याचे तराजू अनेक पिढ्या हातांत वागविल्यानंतर न्याय जोखण्याचे तराजू त्याच हातांत पडल्यास त्याचा कांटा किंचित् स्वतःच्या फायद्याकडे वळला तर तो दोष त्या हाताचा नसून बापजाद्यापासून लागलेल्या संवयीचा होय! 'मान्टेक' याचेंही मत अशाच सारखें आहे. जवानमर्दांनीं, थोर लोकांनीं अथवा सरदारांनीं व्यापार करण्यापासून तोटा असा होतो कीं जे बळवान् असतात तेच धनवान् बनतात आणि मग त्या द्रव्याचा उपयोग राष्ट्राला होईनासा होतो. उलट पक्षीं जे बळवान् असतात त्यांच्या हातीं पैसा नसला म्हणजे तो पैसा राष्ट्रांत खेळता राहून त्याचा उपयोग सर्व राष्ट्राला होत असतो. प्रोफेसर 'डिल' यानें रोमचें राष्ट्र लयाला गेल्याबद्दल जो ग्रंथ लिहिला आहे त्यांत रोमच्या ऱ्हासाचें एक कारण असें दिलें आहे कीं, रोममध्यें सरदार लोकांना व्यापार करण्याची मुभा देण्यांत आल्याकारणानें राष्ट्रांतील सत्ता व पैसा ते बळकावून बसले.

सारांश, जपानांत ज्या कालीं मोकाशाची पद्धत सुरू होती त्या वेळीं व्यापार करणें कमी दर्जाचें मानण्यांत येत असे. त्याचा परिणाम मात्र असा झाला कीं कुलशीलवान् लोक व्यापारांत पडत नसत. अब्रूची अथवा मोठेपणाची ज्यांना फारशी चाड नव्हती असेच लोक व्यापारांत पडत.

"आपला धंदा बोलून चालून कमी दर्जाचा, मग कां कमी करा" असें तर्कशास्त्र व्यापारी लोक लढवूं लागले आणि तेंही स्वाभाविकच होतें. "तूं मूर्ख आहेस, गाढव आहेस," असें वारंवार आपण मुलाला ह्मणूं लागलों तर खरोखरच त्यालाही तसें वाटूं लागतें आणि तो मूळचा गाढव नसला तरी मग वडिलांच्या आग्रहासाठीं तसा बनतो. एकाद्याला गांवांतल्या लोकांनीं विनाकारण भामटा ठरविलें ह्मणजे त्याला तशी भावना होऊन तो खरोखरीच भामटेगिरी करूं लागतो. जपानच्या व्यापारी लोकांची कांहींशी अशा प्रकारची स्थिति झाली. कांहीं केल्या अब्रूदार लोक व्यापारांत मन घालीनात. परकी लोकांना जपानांत व्यापार करण्याची परवानगी देण्यांत आली त्या वेळींही हीच स्थिति कायम होती. बहुधा कमी दर्जाचे लोक पुढें सरसावले. त्यांच्यांत नेकी मुळींच नव्हती असें नाहीं. कारण तसें असतें तर त्यांचा व्यापार कधींच वाढला नसता. आपआपसांत तेही सचोटीनें वागत, परंतु आपल्या धंद्याच्या बाहेरच्या मनुष्याशीं गांठ पडली ह्मणजे त्यांनीं आपली करामत चालविल्यावांचून कधीं राहूं नये. परंतु ही स्थिति फार वेळ टिकण्यासारखी नव्हती आणि ती टिकलीही नाहीं.

जपानच्या इतिहासाचा ज्यांना परिचय आहे त्यांना ही गोष्ट ठाऊक आहे कीं, परकी लोकांना जपानच्या बंदरावर व्यापार करण्याची मोकळीक झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं मोकाशाची पद्धत बंद करण्यांत येऊन जपानांतील सरदारांचे मोकाशे खालसा करण्यांत आले. त्याऐवजीं त्यांना कांहीं थोडासा मोबदला देऊन व्यापार करण्याची परवानगी देण्यांत आली होती. आतां कित्येक असा प्रश्न

करतील कीं ह्या जवानमर्दांना व्यापाराची मोकळीक मिळाल्यानंतर त्यांनीं आपला सत्वशीलपणा आपल्याबरोबर व्यापारांत आणावयाचा होता किंवा नाहीं ? प्रश्न बरोबर आहे, पण त्याचें उत्तर इतकेंच आहे कीं व्यापार हा त्यांना अपरिचित होता, तशांत व्यापारांत प्रसंग पडला हलक्या लोकांशीं; ह्या हलक्या लोकांचा व्यापारी कावा सरळ मार्गानें जाणाऱ्या जवानमर्दांच्या लक्षांत येईना, आणि ह्या सर्वांचा परिणाम मात्र असा झाला कीं जवानमर्द व थोर सरदार लोक व्यापार करूं लागल्यापासून व्यापाऱ्यांची नीतिमत्ता तर सुधारली नाहींच पण हे सरदार लोक मात्र हळू हळू भिकेस मिळूं लागले, ते मात्र व्यापारांत सफाई बुडाले. थोर कुळांतले लोक व्यापारांत पडल्यास व्यापारांत पुढें सरसावलेल्या अमेरिकेसारख्या देशांत सुद्धां जर शेंकडा ८० जणांचें दिवाळें निघतें तर व्यापार कसा करावा याचा आतांशीं कोठें ओनामाचा धडा ज्या जपानचा चालला आहे त्यांतील धोपट मार्गानें जाणाऱ्या सरदार लोकांपैकीं शेंकडा एकाला देखील व्यापारांत यश येऊं नये याचें नवल वाटावयास नको. व्यापाराला लागणारी नीतिमत्ता या सरदार लोकांजवळ नव्हती. व्यापाराचीं नैतिक तत्वें पडलीं स्वार्थपरायण. ज्या करण्यापासून आपला स्वार्थ साधेल तें करणें व्यापारांत नीतीचें मानलें जाई. जपानी जवानमर्दांच्या सदाचरणाचीं मूलतत्वें असल्या स्वार्थबुद्धीवर रचलीं गेलीं नव्हतीं. पैसा मिळविण्याचे मार्ग आणि अब्रू मिळविण्याचे मार्ग एक नाहींत, वेगळाले आहेत.

याचें आपण एकच उदाहरण घेऊं. मनुष्य खरें बोलण्याला कां प्रवृत्त होतो याची 'लेकी' साहेबानें तीन कारणें

दिलीं आहेत; एक, खरें बोलण्यापासूनच व्यापारांत अखेरीस फायदा होतो; दुसरें, राजकीय बाबतींत सुद्धां सत्याच्या पायावरच उभारलेलीं राज्यें चिरकाल टिकतात; आणि तिसरें, खरें बोलणें हें ईश्वराच्या घरीं रुजू असतें. यांपैकीं पहिलें कारण सर्वथैव स्वार्थपर आहे हें स्पष्ट आहे. असली स्वार्थदृष्टि जपानी जवानमर्दांची केव्हांही नव्हती. दुसऱ्या कारणाचें जपानांत प्रयोजनच नव्हतें. ज्यांना दुसऱ्यांचीं राज्यें बळकावयाचीं असतील त्यांना हें कारण लागू पडेल. आपण दुसऱ्याचें राज्य बळकावतों तें आपण कायद्यानें मिळविलें असें आपणच आपल्या तोंडानें जरी ह्मणूं लागलों तरी खरोखरच तें तसें आहे, का सत्य, न्याय, सुधारणा, धर्मप्रकाश यांच्या नांवाखालीं हा निवळ दरोडा आहे याचा विचार करण्याचा जपानी जवानमर्दांना केव्हांच प्रसंग आला नाहीं. मनुष्यानें खरें कां बोलावें याचें जें तिसरें पण महत्वाचें दैविक कारण आहे त्याच कारणामुळें खरोखर हे जवानमर्द इतके सत्यप्रिय बनले. जपानी लोकांना सत्याची जी इतकी चाड आहे त्याचें कारण सत्य हें ईश्वराचें स्वरूप आहे ह्मणून होय! उलट पक्षीं इंग्रज व्यापाऱ्यांना सत्याची कांहीं कमी चाड आहे असें नाहीं. पण ते कां खरें बोलतात, ते आपला व्यापार इतका सचोटीनें कां करितात याच्या कारणाचा कोणीं विचार केला आहे? तेही ह्मणत असतात कीं व्यापार सचोटीनें करावा, पण कां? कारण, "Honesty is the best policy" "सचोटी हाच उत्तम मार्ग होय." कशाचा उत्तम मार्ग? तुंबडी भरण्याचा! सचोटीनें वागलांत तरच व्यापारांत अखेरीस पैसा मिळतो! खरें कां बोलावें तर खोटें बोलण्यापेक्षां खरें बोलण्यापासून जास्त पैसा

मिळतो ह्मणून! असलीं स्वार्थपरायण तत्वें जपानांतील जवानमर्दांना अग्राह्य वाटलीं यांत काय नवल आहे?

परंतु जपानांतील जवानमर्दांना जरी तीं तत्वें नापसंत होतीं तरी स्वार्थसाधु व्यापारी लोकांनीं तीं पटकन् उचललीं. लेकीचें ह्मणणें कांहीं खोटें नाहीं. खरें बोलणें देवाला आवडतें एवढ्याचसाठीं जर खरें बोलावयाचें असतें तर जगांमध्यें आज जितकें सत्याचरण दिसून येत आहे, तितकें खचीत दिसून आलें नसतें. कोणीं देव पाहिला आहे? पैसा दिसतो तसा कांहीं देव दिसत नाहीं. देवाला भिऊन वागणारीं जपानी जवानमर्दासारखीं माणसें पृथ्वीच्या पाठीवर किती असणार? सारांश, सत्याचा जो आज जगांत एवढा जयघोष चालला आहे त्याचें कारण हें असें आहे. जगांत जसजसा व्यापार वाढत जाईल तसातसा सचोटीचाही पण उत्कर्ष होत जाणार आहे! कुशाग्रबुद्धीच्या जपानी व्यापाऱ्यांच्या ही गोष्ट लक्षांत येऊं लागली आहे.

खोटें बोलणारा देवाच्या घरीं जसें पाप करितो, तसेंच तो समाजांतही आपली किंमत कमी करून घेत असतो. सत्याची चाड आणि

## अब्रू

यांचा इतका निकट संबंध आहे कीं जपानांतील जवानमर्दांना आपली इजत जाऊं नये याची जी काळजी वाटत असते त्याबद्दल ह्या ठिकाणीं थोडासा विचार करणें जरूर आहे.

सरदारांच्या मुलांना अवश्य अशा सद्गुणांचें लहानपणापासून ज्यांना बाळकडू मिळत असे, असे जवानमर्द ज-

पानी गडी आपला मान राखण्यासाठीं जीवापलीकडे जपत हें अगदी स्वाभाविक होतें. सत्कीर्ति, नांवलौकिक, इभ्रत ह्या गोष्टी त्यांना जीव कीं प्राण वाटत. त्यामुळें जेणेंकरून आपल्या नांवास कमीपणा येईल अशी गोष्ट जीव गेला तरी त्यांच्या हातून होत नसे. अगदीं बाळपणापासून जपानी तरुणांना असलें शिक्षण मिळत असे. मुलाला सन्मार्गावर आणण्याचे इतर उपाय खुंटले ह्मणजे शेवटचा रामबाण उपाय हा होता. "लोक तुला हांसतील" "यांत तुझी अपकीर्ति होईल," "तुला याची लाज वाटली पाहिजे," असल्या शब्दताडनानें जें काम होई तें इतर शिक्षेनें होत नसे. जपानी मुलांना सत्कीर्तीची इतकी चाड असे. "धिक्कार असो तुझ्या नांवाला" असें जपानांतील तरुणांना ह्मणतांच त्यांच्या अंतःकरणाला घरे पडत. आपलें दुसरें केवढेंही नुकसान झालें तरी हरकत नाहीं परंतु आपल्या नांवाला बट्टा न लागो अशी सर्व जपानी जवानमर्दांची बुद्धि होती. नांवाला एकवार बट्टा लागला ह्मणजे मग तो किती जरी लहान असला तरी निघत नाहीं, इतकेंच नव्हे, तर तो कालाच्या गतीबरोबर वाढत जातो. एकाद्या झाडाचा कुऱ्हाडीनें टवका काढावा ह्मणजे जसजसें तें झाड वाढत जातें तसतशी ती खूण न बुजतां विस्तार पावते! दुष्कीर्तीचीही गोष्ट तशीच आहे. मनुष्याला जनाची आणि मनाची लाज असली ह्मणजे त्याच्या हातून पापाचरण कसें होत नाहीं हें 'कारलाईल'नें आतां अलीकडे लिहिलें आहे, पण त्याच्या किती तरी पूर्वीं हें तत्व मेनिशिअसनें ओळखलें होतें. मेनि-

शिअसनें ह्मटलें आहे कीं "लाज ही सर्व सद्गुणांची, सदाचाराची, आणि सद्विचाराची, जननी होय."

आतां ही गोष्ट खरी आहे कीं, ह्या अपकीर्तीच्या चिडीपासून तरुणांच्या हातून कित्येक वेळां अत्याचार झाल्याचीं उदाहरणें आहेत ! तथापि मला वाटतें असला अतिरेक झालेला पुरवेल, परंतु कितीही अपमान होवो, कोणीही आपला पैसा नेवो, आपल्या देशाचा विध्वंस करो, आपल्या धर्माचा कितीही छळ होवो, अंतःकरणांत ह्मणून खळबळ कशी ती होतच नाहीं, असला निगरगट्टपणा नको. साधूंच्या ठिकाणीं मानापमानाची पर्वा नसणें ठीक आहे ! पण असला प्रेतवत् समाज मानापमानाविषयीं जेव्हां इतका बेफिकीर बनतो तेव्हां तें साधुत्वाचें लक्षण नसतें, एवढीच काय ती दुःखाची गोष्ट आहे ! धड योगी नाहीं, आणि पशुही नाहीं, असल्या हीन स्थितीपेक्षां जपानी जवानमर्दांच्या ठिकाणीं कित्येक वेळां जें फाजील तेज दिसून येतें तें क्षम्य होय. थोडासा कोठें अपमान झाल्यास, अथवा आपला अपमान झाला अशी विनाकारण मनाची कल्पना करून प्राणहानीपर्यंत निकरावर गोष्टी गेल्याचीं कांहीं उदाहरणें आहेत. पण हीं सर्वच विश्वसनीय नसतात. कांहीं कांहीं गोष्टी तर इतक्या चमत्कारिक सांगण्यांत येतात कीं त्यांवर विश्वास ठेवणें कठीण आहे. एक गोष्ट अशी सांगण्यांत येते कीं, एक तरुण जपानी जवानमर्द रस्त्यानें जात असतां त्याच्या पाठीवर गोमाशी बसलेली दुसऱ्या एका इसमाला दिसली. न जाणों ही कानांत वगैरे जाईल अशा भीतीनें, निदान त्याचा कोणत्याही प्रकारें अपमान करण्याचा मनांत बिलकुल हेतु न धरून आपल्या पाठीवर

गोमाशी आहे असें त्या इसमानें त्या तरुणाला सुचविलें मात्र, तोंच त्या जवानमर्दाला राग येऊन आपल्यावर उपकार करूं पाहणाऱ्या त्या निरुपद्रवी इसमाचें गर्दन त्यानें आपल्या तलवारीनें छाटलें! आणि याचें कारण काय ह्मणाल तर गोमाशा कोठें जवानमर्दांच्या का पाठीवर बसतात. जनावरांच्या अंगावर गोमाशा असतात आणि आपल्या अंगावर गोमाशी आहे असें सुचविण्यांत आपल्याला पशु ह्मणण्याचा याचा हेतु असावा, अशी विलक्षण कल्पना त्या जवानमर्दाच्या डोक्यांत शिरून तिनें विनाकारण एका निरुपद्रवी मनुष्याचा बळी घेतला! ही अगर असल्या तऱ्हेच्या दुसऱ्या गोष्टी खऱ्या असतील, असें मला वाटत नाहीं, पण त्या खऱ्या नसल्या तरी प्रचलित आहेत एवढें खरें! एक तर सामान्य लोकांना जवानमर्दांचा दरारा वाटावा, ह्मणून ते असल्या खोट्या गोष्टींचा समाजांत फैलाव करीत असतील, किंवा क्वचित् प्रसंगीं चढून जाऊन असला अतिरेकही कित्येकांच्या हातून झाला असावा. परंतु असलीं अपवादात्मक उदाहरणें घेऊन तेवढ्यावरून एकंदर जपानी जवानमर्दांना अथवा त्यांच्या नीतिमत्तेला नांवें ठेवणें योग्य होणार नाहीं.

सत्कीर्तीची यथार्थ चाड असणें कोण वाईट ह्मणेल? मात्र तिच्या पायीं वर लिहिल्यासारखे अत्याचार होऊं नयेत. अशा तऱ्हेचे अत्याचार जपानांत फार करून होतही पण नव्हते; कारण जपानी जवानमर्दांना जशी लौकिकाची चाड असे तसेंच त्यांच्या ठिकाणीं औदार्य आणि शांति हेही गुण वास करीत असत. क्षुल्लक कारणावरून चिरडीस जाणाऱ्या जवानमर्दाचा कोणी मान ठेवीत नसत. "सहन करण्याला

अतिशय कठिण अशी गोष्ट सहन करणें याचें नांव शांति" अशा अर्थाची जपानांत एक ह्मण आहे. 'इयेयासु' ह्मणून एक नामांकित तत्ववेत्ता जपानांत होऊन गेला. त्याच्या उदात्त विचारांचे दोन तीन मासले देतों. "पादचारी मनुष्य यात्रेला निघाला ह्मणजे त्याच्या पाठीवर जसें सामानाचें ओझें असतें, तद्वत् या संसारयात्रेंत मनुष्याच्या पाठीवर अनेक ओझीं असतात, तीं त्यानें निमूटपणें सहन केलीं पाहिजेत." "दुसऱ्याला नांवें ठेवण्यांत तात्पर्य नाहीं. तें काम सोपें आहे. दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ आपल्याला दिसतें, पण स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळ सुद्धां दिसत नाहीं. मनुष्याचें खरें कर्तव्य ह्मणजे त्यानें आत्मविचार करून आपल्यांतील सर्व दोष काढून टाकण्याविषयीं नेहमीं तत्पर असलें पाहिजे." तसेंच "क्षमा हें वीराचें भूषण होय. क्षमाशील मनुष्याची संसारयात्रा सुखावह होते" इत्यादि. 'इयेयासु' ज्याप्रमाणें बोले त्याप्रमाणें स्वतः चाले आणि ह्मणूनच लोक त्याचीं पाउलें वंदीत! एका चतुर लेखकानें जपानच्या इतिहासांतील तिघां पुरुषांच्या स्वभावाचें निदर्शन फार थोडक्यांत पण मार्मिकपणानें केलें आहे, तें असें:—कोकिलपक्षाचें गाणें ऐकण्याची '**नोबनगा**,' '**हिडेयोशी**,' आणि '**इयेयासु**' या तिघांना इच्छा झाली असती तर 'मी ह्मणेन त्या वेळेला कोकिलपक्षी गायन जर न करील तर मी त्यास मारून टाकीन' असें **नोबनगानें** ह्मटलें असतें, 'मी त्याला गावयाला लावीन' असें **हिडेयोशीनें** ह्मटलें असतें व 'तो गावयाला सुरवात करीपर्यंत मी त्याची वाट पाहीन' असें **इयेयासूनें** ह्मटलें असतें. ह्मणजे तात्पर्य काय कीं पहिल्याचा स्वभाव फार उतावीळ होता, दुसऱ्याचा

विश्वास आपल्या सामर्थ्यावर अधिक होता आणि तिसरा शांत स्वभावाचा होता!

शांति आणि सहनशीलता या गुणांची 'मेनशिअस'नें फार तारीफ केली आहे. एके ठिकाणीं तो ह्मणतो, "कांहीं कारण नसतां मला जर तूं शिव्या दिल्यास तर मला त्यांचें काय होय! त्यांत तुला मात्र कमीपणा येणार आहे! तूं किती जरी शिव्या दिल्यास तरी त्या योगानें माझ्या अंगाला अथवा आत्म्याला थोडेच घरे पडणार आहेत." शिव्या देण्याची ज्यांना खोड लागलेली असते त्यांनीं मेनशिअसचें हें ह्मणणें व भर्तृहरीचा पुढील श्लोक ध्यानांत ठेवावा:—

ददतु ददतु गालीर्गालिमन्तो भवन्तो
वयमपि तदभावाद्गालिदानेऽसमर्थाः
जगति विदितमेतद्दीयते विद्यमानं
नहि शशकविषाणं कोपि कस्मै ददाति।

क्षुल्लक कारणावरून अकांडतांडव करणें हें शहाण्या मनुष्यास शोभत नाहीं. आपल्या राष्ट्राचा दुसरीकडे किती अपमान चालला असतो याचें बिचाऱ्याला कांहींच वाटत नसतें आणि स्वतःचा मात्र कोठें थोडासा चुकून मान ठेवण्यांत आला नाहीं तर जणूं काय याचें सर्व राज्य जातें! राष्ट्रीय अगर सामाजिक मानहानीबद्दल योग्य राग येणें हें खरें स्वाभिमानाचें लक्षण होय.

सारांश, सत्कीर्तीच्या चाडीपासून कित्येक वेळां अत्याचार होण्याचा जो संभव असतो तो जपानांत मेनशिअस वगैरे साधूंच्या शिक्षणापासून बराच टळला होता. सत्कीर्तीची चाड असूनही जवानमर्दांच्या ठिकाणीं शांति यावी अशासारखा उपदेश पुष्कळांनीं केलेला आहे. ओ-

गावानें ह्मटलें आहे कीं "दुसऱ्यानें तुझी कितीही निंदा केली तरी तिचा प्रतिकार उलट निंदा करून तूं करूं नकोस, किंबहुना, दुसऱ्यांनीं जे तुझ्यांत दोष काढिले असतील त्यांत कांहीं खरे असल्यास ते आपल्यांतून काढून टाकण्याचा प्रयत्न करून तूं आपल्या कर्तव्यास जागावें हेंच तुला योग्य होय." तसेंच कुमाजवाचें सांगणें आहे कीं "दुसऱ्यानें तुला नांवें ठेविलीं तर तूं उलट त्याला नांवें ठेवूं नकोस. दुसरा तुजवर रागावला तर तूं त्याजवर रागावूं नकोस. क्रोध आणि लोभ यांना जिंकणें हीच आनंदमय स्थिति होय." आणखी एका साधु पुरुषाचें वचन द्यावेंसें वाटतें. सायगोचा उपदेश असा आहे: "जगाचीं सूत्रें चालविणारा ईश्वर आहे. संसारांतील सुखदुःखें पाहून आपण कचरतां कामा नये. आपण आपलें कर्तव्य करीत असावें. आपल्यावर केवढाही मोठा दुःखाचा डोंगर कोसळला तरी ईश्वरावर रागावणें हें मानसिक दौर्बल्याचें लक्षण आहे. ईश्वराच्या घरीं न्याय आहे. जगांत जे जे ह्मणून व्यवहार होत आहेत ते ते त्याच्या इच्छेनें होत आहेत. ईश्वराची सर्वांवर सारखी प्रीति असते, आणि ह्मणून जशी तूं आपल्यावर प्रीति करितोस तशीच भूतमात्रावर कर. सर्व प्राणी ईश्वराचे आहेत, तेव्हां दुसऱ्या कोणाचाही तिरस्कार करणें हें तुला योग्य नव्हे." वरचीं उदाहरणें वाचून आपल्या इकडील साधुसंतांच्या किती तरी उदात्त कल्पनांची आठवण होते. ती या ठिकाणीं देऊन विस्तार करीत नाहीं, पण वाईट मात्र इतकेंच वाटतें, कीं वरच्या सारख्या उपदेशाचा जपानी जवानमर्दांच्या मनावर परिणाम होऊन, त्यांच्या ठिकाणीं

अनेक सद्गुणांचा विकास व्हावा व त्यांनीं आपल्या राष्ट्रास ललामभूत व्हावें आणि आमच्या इकडे—अतिशयोक्ति नव्हे-वरच्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक उदात्त, अधिक गंभीर, अधिक प्रेमळ, अधिक अनुभवसिद्ध असा आमच्या धर्मग्रंथांतील आणि साधुसंतांच्या पुस्तकांतील उपदेश जसाच्या तसाच पडून रहावा! दुर्दैव, दुसरें काय! एका भूमींत जो उपदेश रुजावा तोच दुसरीकडे कोमेजून जावा हा त्या त्या भूमीचा गुणदोष का कालमहात्म्याचा, हें कांहीं समजत नाहीं.

ज्या समाजांतील तरुणांना सत्कीर्तीची जितकी किंमत वाटते तितकी द्रव्याची, किंबहुना ज्ञानाची वाटत नाहीं, तो समाज धन्य होय. ज्या शिक्षणापासून वाडवडिलांविषयीं अभिमान, प्रेम, आणि आदर हीं उत्पन्न होत नाहींत, असल्या शिक्षणाचा काय उपयोग! ज्या शिक्षणापासून उत्पन्न होणाऱ्या स्वदेशाभिमानाची मजल नुसत्या बडबडीपलीकडे कधींच जाऊं शकत नाहीं त्या शिक्षणाची खरोखर काय किंमत आहे! आपल्या वंदनीय, सन्माननीय, थोर पूर्वजांना चोर, लुटारू, दरोडेखोर ह्मटलेलें वाचून किंवा ऐकून ज्याला कौतुक वाटतें त्याला ज्ञानी कोणीं ह्मणावें! जपानी तरुणांची गोष्ट कशाला पाहिजे! त्यांच्यांत अशीं कित्येक उदाहरणें आहेत कीं, सामान्य पोर घर सोडून बाहेर पडतांना आपल्या आईजवळ प्रतिज्ञा करितें कीं "आई, मी बाहेर जाऊन लौकिक संपादन करून वडिलांचें नांव राखीन, तरच या उंबरठ्यांत परत पाऊल टाकीन.—" आणि अशा आयाही पण जपानांत होऊन गेल्या कीं दुष्कीर्तीनें ज्यांचीं तोंडें काळीं पडलीं आहेत अशा आपल्या

मुलांचें त्यांनीं पुन्हा मुखावलोकन केलें नाहीं. आपल्या कर्तव्याचे ऐहिक आणि पारमार्थिक असे दोन भाग केले तर मी देशकार्य करीत असतां कामास आलों तरी हरकत नाहीं; पण माझ्या आचारानें, विचारानें अथवा भाषणानें देशाला कमीपणा कधींही आणणें नको, अशी कल्पना नेहमीं मनांत बाळगणें यापेक्षां जास्त उदात्त अशी ऐहिक कर्तव्याची दुसरी दिशा ती कोणती असणार! पदरीं नीचपणा आणणारीं कृत्यें करून आज व्हा मोकळे, पुढें वाचालता करून होणारें नुकसान भरून काढूं असा विचार जपानी जवानमर्दांना केव्हांच शिवला नाहीं. दुष्कीर्तीचा बट्टा आपणांस लागूं नये ह्मणून वाटेल ते शारीरिक व मानसिक हाल सोसण्यास ते तयार होत. प्राण गेला तर जावो, पण मान न जावो असें त्यांना वाटे. आपलें मानधन राखण्यासाठीं ज्यांनीं प्रसंगीं आपल्या माना दिल्या अशीं उदाहरणें जपानच्या इतिहासांत पुष्कळ आहेत. नांव राखण्यासाठीं ज्याप्रमाणें जपानी जवानमर्द आपले प्राण खर्ची घालण्यास तयार होते त्याचप्रमाणें

## स्वराजनिष्ठा

ह्याही गुणास ते फार चहात असत. जपानांत राजाला देवाप्रमाणें पूज्य मानतात ही गोष्ट जगत्प्रसिद्ध आहे. राजाच्या शब्दाला जपानी लोक वेदतुल्य मानितात. जपानी लोकांत पक्ष नाहींत असें नाहीं, परंतु ते पक्ष एकमेकांशीं कितीही लठ्ठालठ्ठी करीत असले तरी त्यांच्या राजानें अमुक गोष्ट आह्मांस मंजूर आहे असें ह्मणतांक्षणींच दोन्ही पक्ष एक होऊन राजाज्ञेप्रमाणें वागण्यास एकदिलानें तयार होतात. लॉर्ड कर्झन साहेब ह्मणतात कीं "जपान खेरीज करून प्राच्य

राष्ट्रांना स्वदेशाभिमान ह्मणजे कशाला ह्मणतात याची कल्पना सुद्धां नाहीं. स्वदेशाभिमानाची पराकाष्ठा एकट्या जपानांत मात्र झाल्याची दिसून येते. राजा हा स्वदेशाभिमानाचा मूर्तिमंत अवतार आहे असें जपानी लोक समजतात.[1]" स्वदेशाभिमान आणि आपल्या राजाबद्दल एकनिष्ठ प्रेम ह्या गोष्टी भिन्न नाहींत अशी त्यांची समजूत आहे. जपानी लोकांमध्यें स्वराजनिष्ठा इतकी जाज्वल्य असण्याचें कारण त्यांची मोकाशाची पद्धति होय. दहाजण एका ठिकाणीं आले ह्मणजे त्यांत कोणीतरी एक श्रेष्ठ असतो आणि इतर त्याच्या अनुरोधानें वागतात. चोरांचा देखील राजा अथवा नायक असतो व त्यावर त्याच्या साथीदारांचें प्रेम असतें. मोकाशाच्या पद्धतीपासून आपल्या पुढाऱ्यावर प्रेम कसें करावें हें जपानी लोक शिकले. ही मोकाशाची पद्धति संपुष्टांत आल्यावंर लोक आपल्या राजावर प्रेम करूं लागले, तें इतकें कीं त्यांच्या अंतःकरणांत स्वराजाबद्दल जें एक प्रकारचें विलक्षण प्रेम दिसून येतें त्याच्या तोडीची राजनिष्ठा इतर देशांतून आढळून येत नाहीं.

एकंदर समाजावर प्रेम करण्याचें टाकून एकाच व्यक्तीवर प्रेम करणें वाजवी नव्हे, अशी एकीकडे **हेजेल** साहेब टीका करितात तों दुसरीकडे त्यांचा जातभाई व्यक्तीवर प्रेम करण्यांत भूषण मानतो. हा जातभाई कांहीं सामान्य मनुष्य नव्हता. एकाच व्यक्तीवर राजा ह्मणून निष्ठा ठेवण्यांत खुद्द **बिस्मार्क** साहेबांना कौतुक व अभिमान वाटे. ज्या देशांत मोकाशाची पद्धति फार वेळ टिकली अशा देशांत

१ लार्ड कर्झन साहेबांचें "Problems of the Far East" पान ३४.

स्वराजनिष्ठेचें बीजारोपण फार खोल गेल्याचें दिसून येतें. याच्या उलट उदाहरण ह्मणजे अमेरिकेचें होय. अमेरिकेंत सर्व मनुष्यें सारख्याच योग्यतेचीं होत! अशा देशांतील लोकांना जपानी लोकांची विलक्षण तऱ्हेची स्वराजनिष्ठा मान्य होऊं नये, यांत कांहीं नवल नाहीं. निरनिराळ्या देशांतील सर्वच विचार जुळणें शक्य नाहीं. एखाद्या डोंगराच्या एका बाजूच्या लोकांना जी गोष्ट न्यायाची वाटते, तीच गोष्ट दुसऱ्या बाजूच्या लोकांना अन्यायाची वाटावी, असें कां व्हावें याचें **मान्टेक** याला मोठें गूढ पडलें होतें. फ्रान्स आणि स्पेन यांच्यांत काय तो फक्त पिरिनीस डोंगर आहे; पण त्या डोंगरानें त्या दोन राष्ट्रांच्या आचारविचारांत किती विलक्षण फरक पाडला आहे. परवांच्या ड्रेफस प्रकरणाचे वेळीं याचा अनुभव तर चांगलाच आला. यःकश्चित् डोंगरांत जेव्हां इतकें सामर्थ्य दिसून येतें तेव्हां असलें सामर्थ्य मोठमोठ्या सागरांत कितीतरी पटीनें अधिक असण्याचा संभव आहे. सारांश राजनिष्ठेची जपानी लोकांची कल्पना अन्य देशांतून पसंत न झाली तर त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं. फार लांब कशाला, वास्तविक विचार केला तर असें दिसून येईल कीं ज्या तत्ववेत्त्याच्या शिक्षणापासून जपानचा फायदा झाला तेंच शिक्षण चीनदेशाच्या पथ्यावर पडल्याचें दिसून येत नाहीं. एकाच **कनफ्युशिअसच्या** उपदेशापासून आईबापांवर प्रेम करणें हें मनुष्याचें आद्य कर्तव्य होय असा धडा चीन देशानें घेतला व राजावरील प्रेमास जपानांत अग्रस्थान मिळालें. जपानी लोक आपल्या राजावर किती प्रेम करितात याची बरोबर कल्पना हल्लींच्या कालीं आपल्या लोकांना होणार

नाहीं, परंतु आपल्यांपैकीं जे धर्मशील लोक आहेत त्यांना इतकें सांगितलें ह्मणजे कांहींसा बोध होईल कीं आपण देवावर जितकी भक्ति करितों तितकी भक्ति जपानी लोकांची त्यांच्या राजावर असते. एकाद्या सुधारक वाचकाच्या हातीं माझ्या सुदैवानें हें पुस्तक पडल्यास त्याची खात्री करून देण्यास मजजवळ दृष्टान्त नाहीं याबद्दल मला वाईट वाटतें. तथापि स्वामिनिष्टेबद्दल जपानच्या इतिहासांत जे अनेक हृदयंगम प्रसंग आले आहेत त्यांपैकीं एका प्रसंगावरून जपानी लोकांची आपल्या राजावर किती निष्ठा असते हें कळण्यासारखें आहे ह्मणून त्या प्रसंगाची हकिकत थोडक्यांत देतों.

**मिचिझेन** या नांवाचा जपानच्या इतिहासांत एक प्रख्यात पुरुष होऊन गेला. त्याच्यावर लोकांचें फार प्रेम होतें. परंतु लोकप्रिय माणसांचा उत्कर्ष सहन न होऊन त्यांच्या नाशासाठीं मात्सर्यानें ग्रासलेले लोक आपल्या समाजांत जसा नीच प्रयत्न करितांना आपण कित्येक वेळां पाहतों तशासारखें **मिचिझेनचा** हेवा करणारे कांहीं शत्रु त्याला होते. त्यांनीं आपल्या प्रयत्नाची शिकस्त करून **मिचिझेनला** हद्दपार करविलें ! परंतु एवढ्यानें त्या नरपशूंचें समाधान झालें नाहीं. **मिचिझेनच्या** एकंदर कुळाचा नायनाट करण्याचा त्याच्या शत्रूंनीं घाट घातला. **मिचिझेनचे** नातलग कोण कोण आहेत त्यांचा बारीक तपास सुरू झाला. तपासाअंतीं असा शोध लागला कीं **मिचिझेनला** एक लहान मुलगा असून त्याला 'गेन्झो' नांवाच्या त्याच्या एका विश्वासू नोकरानें एका खेडेगांवांतील शाळेंत लपवून ठेविलें आहे. त्या मुलाला अमुक दिवशीं अमुक वाजतां शाळेंत हजर ठेवण्याविषयीं **गेन्झोला**

सरकारी अधिकाऱ्यांचा हुकूम जाऊन थडकला. गेन्झो हा शाळेंतील पंतोजी असून मिचिझेनवर त्याची फार भक्ति होती. या निरुपद्रवी बाळाचा प्राण कसा वांचवावा हा त्याला प्रश्न पडला. दिसण्यांत त्याच्याच सारखा असा दुसरा कोणता मुलगा पुढें करावा असा विचार तो करूं लागला. वर्गांतील सर्व मुलांवरून त्यानें आपली नजर फिरविली; परंतु मिचिझेनच्या मुलाइतकें तेजस्वी मूल त्याला दुसरें कोणी आढळलें नाहीं. काय करावें या विचारानें त्याचें स्वामिनिष्ठ मन गोंधळून गेलें. मिचिझेनच्याच मुलाला हजर करून आपण मोकळें व्हावें अशी भयंकर कल्पना एकदां सुद्धां त्याच्या मनांत आली नाहीं. प्रसंग पडल्यास आपण आपले स्वतःचे प्राण देऊं पण आपल्या स्वामीच्या मुलाच्या एका केंसास सुद्धां धक्का लागूं देणार नाहीं असा त्याचा पूर्ण निर्धार होता. कोणत्याही सद्गुणाची ज्या पुरुषाचे ठिकाणीं अगदीं पराकाष्ठा होते तेथें ईश्वराचें स्वरूप आहे असें समजावें. भक्ताची काळजी ईश्वराला असते. त्या पंतोजीच्या मनांत विचारांचें अगदीं काहूर माजून गेलें होतें, इतक्यांत चमत्कार काय पहा, हुबेहुब मिचिझेनच्या मुलाप्रमाणें ज्याची अंगकाठी आहे, ज्याचें तेज व वय हीं त्याच्याचसारखीं आहेत अशा एका नवीन मुलाला त्याच दिवशीं शाळेंत घालण्यासाठीं त्याची आई घेऊन आली! ही बाई थोर घराण्यांतील दिसते मग ही स्वतःच आपल्या मुलाला शाळेंत घालण्यासाठीं कां बरें आली असावी असा विचार करण्याला त्या पंतोजीला वेळ नव्हता! त्या मुलाला पाहून पंतोजीला आनंद झाला. ईश्वराला आपली करुणा आली असें त्याला वाटलें. ठरलें, पुढची गोष्ट कांहीं फार

मोठी नाहीं. **मिचिझेन**च्या मुलाला ओळखून काढण्यासाठीं नेमलेल्या वेळीं सरकारी अधिकारी शाळेंत येऊन दाखल झाले. **गेन्झो**ची छाती धडधड उडूं लागली. **मिचिझेन**चा मुलगा ह्मणून त्यानें त्या नवीन मुलाला एका हातानें पुढें केलें आणि दुसरा हात आपल्या तलवारीच्या मुठीवर ठेवला! आपला डाव न साधून आपलें कपट बाहेर फुटलें तर तेथल्या तेथें एकतर त्या अधिकाऱ्याचा प्राण घ्यावा अगर स्वतःचा द्यावा असा त्याचा विचार होता! परंतु **गेन्झो**ला काय माहीत कीं **मिचिझेन**वर आपल्याप्रमाणेंच प्रेम करणारे आणखी दुसरे लोक होते! त्या अधिकाऱ्यानें—आणि वाचक हो, तो अधिकारी दुसरा कोणी नव्हता, तो त्याच नवीन मुलाचा बाप होता—त्या सरकारी अधिकाऱ्यानें त्या मुलाच्या प्रत्येक अवयवाकडे न्याहाळून पाहून, अगदीं शांतपणें, 'होय, हाच **मिचिझेन**चा मुलगा—' असें आपलें मत दिलें! पुढें त्या मुलाचें काय झालें हें सांगावयास नको. इतकें मात्र सांगावयाचें राहिलें कीं त्या मुलाचा आजा **मिचिझेन**चा परम दोस्त होता, परंतु त्याच्या बापानें मात्र या वेळीं **मिचिझेन**च्या शत्रूकडे नोकरी पत्करिली होती. शाळेंत मुलाला पोंचवून आल्यावर त्याची आई घरीं वाट पहात बसली होती. पण कशाची वाट? आपला मुलगा परत येण्याची नव्हे, तर आपल्या कारस्थानाचा उपयोग होऊन **मिचिझेन**च्या मुलाचे प्राण वांचले गेले या आनंददायक बातमीची वाट ती मोठ्या आतुरतेनें पाहत होती! **मिचिझेन**च्या घराण्याशीं पूर्वापार संबंध असल्यावरून **मिचिझेन**च्या मुलाला ओळखण्याचें काम तिच्या नवऱ्याकडे आलें होतें. झालें, आपल्या बापाच्या स्वामिकार्यासाठीं

आपल्या पोटच्या पोराचा बळी देऊन तो अधिकारी परतला. घरांत पाऊल टाकतांच त्यानें आपल्या बायकोला आनंदाची बातमी कळविली कीं, "आपला हेतु तडीस गेला, आपल्या लाडक्या मुलानें आपली स्वामिनिष्ठा गाजविली."

"किती भयंकर ही गोष्ट!" असे उद्गार आमचे वाचक काढितील. "आईबापांनीं जाणून बुजून दुसऱ्याच्या पोराचे प्राण वांचविण्यासाठीं आपल्या पोटच्या पोराचा बळी द्यावा." ही किती घोर कल्पना! पण वाचकहो, तुह्मांला आणखी कोठें ठाऊक आहे कीं तें बळी पडलेलें पोर ह्या सर्व कृत्याला अनुकूल होतें! याचें नांव स्वामिनिष्ठा! असलीं उदाहरणें वाचलीं ह्मणजे असें वाटतें कीं हे सर्व लोक ईश्वराच्या विभूती होते कीं काय कोण जाणे! अवरंगजेब बादशहाच्या अटकेंतून निसटून जाण्यास श्रीशिवाजी महाराजांस जिवावर उदार होऊन मदत करणारा हिरोजी फर्जंद अथवा श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा वध होण्यापूर्वीं स्वामिकार्यासाठीं प्राण अर्पण करणारा चापाजी वगैरे आपल्या देशांतील उदाहरणें जपानच्या इतिहासांतील उदाहरणांच्या तोडीचीं आहेत. असो.

आईबापांनीं संगनमत करून आपल्या स्वामीच्या मुलाचे प्राण वांचविण्यासाठीं स्वतःच्या पोराचा बळी द्यावा अशा प्रकारच्या उत्कट स्वामिनिष्ठेचीं उदाहरणें पाश्चात्य राष्ट्रांत सांपडणें दुर्लभ आहे. त्या देशांतील कौटुम्बिक रचनाच वेगळी आहे. बाप आणि मुलगा, फार काय, नवरा आणि बायको हीं परस्परांपासून त्या देशांत स्वतंत्र असतात. जपानची किंबहुना सर्व प्राच्य राष्ट्रांची स्थिति याहून भिन्न आहे. कुटुंबांतील सर्व माणसांचें हिताहित प्राच्य राष्ट्रांत एकच असतें. त्यामुळें अशा कुटुंबांतील सर्व माणसांत एक

प्रकारचें स्वाभाविक प्रेम उत्पन्न झालेलें असून एकमेकां- साठीं स्वतःचे प्राण देऊन आपलें प्रेम व्यक्त केल्याचीं उदाहरणें प्राच्य राष्ट्रांतून पुष्कळ देतां येण्यासारखीं आहेत.

जपानांतील मुलें आईबापांवर जितकें प्रेम करितात त्या- पेक्षां आपल्या राजावर जास्त प्रेम करितात हें वर सांग- ण्यांत आलेंच आहे. राजावर प्रेम करणें हें जपानांत आद्य कर्तव्य मानण्यांत येतें. सानयो यानें जपानचा जो उत्कृष्ट इतिहास लिहिला आहे त्यांत त्यानें सिगमोरीची हकीकत फार मार्मिकपणानें दिलेली आहे. सिगमोरीच्या बापानें जेव्हां बंड केलें तेव्हां आपण कोणत्या पक्षास मिळावें असा त्याच्यापुढें प्रश्न येऊन पडला! बापाला जाऊन मिळावें तर राजद्रोह होतो आणि राजपक्ष स्वीकारावा तर पितृद्रोह होतो! अशा कचाट्यांत तो सांपडला! कोणता तरी एक पक्ष तर उचललाच पाहिजे पण तो कोणता स्वीकारावा हें त्याला सुचेना! त्याचें मन द्विधा झालें! "हे देवा, ह्या जगांत निवळ सात्विक प्रेमानें वागणें कठीण दिसतें, अशा संक- टांत मला टाकण्यापेक्षां हे देवा, मी मरण मोठ्या आनं- दानें पतकरीन" अशी त्यानें देवाची प्रार्थना केली; पण अखेरीस पितृभक्तीवर राजभक्तीनेंच ताण केली! सिगमो- रीचें हें एक उदाहरण इतिहासांत लिहिलें आहे, परंतु अ- सल्या तऱ्हेचे प्रसंग कितीतरी जणांवर येऊन गेलेले अस- तील. "प्रेम आणि कर्तव्य" यांचा हा झगडा ह्मणावयाचा. परंतु अशा सर्व प्रसंगीं जपानांतील जवानमर्दांनीं आपली राजनिष्ठाच गाजविलेली आहे. प्रेमाला वश होऊन जपानां- तील जवानमर्दानें राजद्रोह केल्याचें एकही उदाहरण नाहीं. आपल्या राजासाठीं आपलें तनमनधन अर्पण करण्याचा

उपदेश जपानांतील आया आपल्या मुलांना करितात. स्त्रियांनीं आपल्या पोटचे गोळे राजनिष्ठेच्या पायीं वाहिल्याचीं उदाहरणें जपानच्या इतिहासांत पुष्कळ आहेत. आपल्या राजासाठीं, आपल्यावर प्रेम करणाऱ्या राजासाठीं, आपलें पुत्रवत् पालन करणाऱ्या आपल्या राजासाठीं जेथें प्रजा आपले प्राण अर्पण करण्यास तयार असते तेथें राजा देवतुल्य मानला जावा आणि राजेच्छा वेदतुल्य समजण्यांत यावी यांत नवल नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांना मात्र यांतलें इंगित न समजल्यामुळें ते या सर्व प्रकाराला "प्राच्य राष्ट्रांतला जुल्म" समजतात, जणूं काय पाश्चात्य राष्ट्रांनीं जुलमी राजा कसा असतो तो कधीं पाहिलाच नाहीं!

प्राच्य राष्ट्रांतून हल्लीं अगर पूर्वीं जर कोठें खरोखर जुलमाची राज्यपद्धति असेल तर तिचा गौरव करण्याचा माझा हेतु नाहीं, परंतु कित्येक पाश्चात्य ग्रंथकारांनीं मात्र अल्प समजुतीमुळें प्राच्य राष्ट्रांतील सुखावह राज्यपद्धतीला कोठें कोठें नांवें ठेविलीं आहेत त्याचा मी निषेध करितों. जपानांतील मोकाशाची पद्धति जुलमाची होती असें समजणें चुकीचें आहे. प्रजेनें मात्र राजाज्ञा शिरसावंद्य केली पाहिजे आणि राजानें वाटेल तसा जुल्म करावा असा समज जपानांत अगर दुसऱ्या कोणत्याही प्राच्य राष्ट्रांत पूर्वीं नव्हता व हल्लीं नाहीं. राजाची आज्ञा पाळणें हें जसें प्रजेचें कर्तव्य आहे, तसेंच प्रजेचें पुत्रवत् पालन करणें हें राजाचें कर्तव्य आहे. निदान जपानांतील राजे आणि सरदार हा संबंध जाणून होते. आपण राजे आहोंत अथवा सरदार आहोंत ह्मणजे आपल्या प्रजेवर वाटेल तसा जुल्म करण्याचा, त्यांना नागविण्याचा, त्यांना भिकेस लावण्याचा

आपल्यास अधिकार आहे असा समज जपानी राजांचा अथवा उपराजांचा केव्हांही नव्हता. आपल्यावर सर्वस्वीं अवलंबून राहणाऱ्या आपल्या राजनिष्ठ प्रजेचें निरंतर कल्याण करण्यासाठींच ईश्वरानें आपणांस व आपल्या वडिलांस ही गादी दिली आहे अशी पवित्र कल्पना जपानी राजांची असे. ते आपल्या प्रजेचें पुत्रवत् पालन करीत. आणि ते तसें करीत ह्मणूनच त्यांची प्रजा त्यांना देवाप्रमाणें मान देई. सवतीच्या पोरांप्रमाणें प्रजेचा छळ करणारा राजा कोणता व पोटच्या पोरांप्रमाणें तिचें संगोपन करणारा राजा कोणता हें ओळखण्याचें साधन थोडें आहे. एकादी बाई एकाद्या पोराची सख्खी आई आहे कां सावत्र आहे हें ओळखण्याचें जें साधन तेंच राजा कसा आहे हें ओळखण्याचें साधन होय. राजाची प्रजेबरोबर सारखी धुसफुस चालली असली, राजा एक ह्मणत असला व प्रजा दुसरें ह्मणत असली तर समजावें कीं हा राजा जुलमी आहे. निर्बल प्रजा ती काय ! राजा कसाही असला तरी असली निर्बल प्रजा राजाची आज्ञा पाळणारच ! प्रजा राजाची आज्ञा पाळते एवढ्यावर कोणीं जाऊं नये. आपल्या राजाची आज्ञा प्रजा प्रेमानें पाळते का दपटशाहानें, भीतीनें पाळते हें पाहिलें पाहिजे. राजाची चाकरी करण्यांत, राजाची आज्ञा पाळण्यांत, राजाचा गौरव करण्यांत प्रजेला भूषण वाटत असलें ह्मणजे समजावें कीं हा राजा दयाळू आहे. परंतु जेथें दुसरा इलाज नाहीं ह्मणून राजाची सेवा करण्यांत येते, अथवा राजदंडाची भीति वाटून राजाज्ञा पाळण्यांत येते अथवा कांहीं खाजगी नीच हेतु साधावयाचे असतात ह्मणून राजाचा गौरव करण्यांत येतो, तेथें खुशाल अनुमान

काढावें कीं हा राजा जुलमी असून आपल्या प्रजेचा सव-तीच्या पोरांप्रमाणें छळ करीत आहे. इंग्लंडांतील प्रख्यात वक्ता बर्क यानें तरी एका ठिकाणीं हीच कसोटी लाविलेली आहे. पूर्वींचे जपानी लोक इंग्लंडच्या राजाला 'पिशाच्यांचा राजा' ह्मणत; कारण इंग्लंडांतल्या लोकांनीं राजांविरुद्ध बंडें करावीं, राजांना पदच्युत करावें व प्रसंगविशेषीं त्यांना सुळावरही चढवावें; तसेंच फ्रान्सच्या राजाला ते 'गाढवांचा राजा' समजत, कारण त्यानें आपली प्रजा करभाराखालीं इतकी दडपून टाकिली होती! स्पेनच्या राजाला मात्र ते "माणसांचा राजा' मानीत. कारण त्याची प्रजा आपल्या राजाचे हुकूम मोठ्या आनंदानें पाळी! पण ह्या जुन्या कथा आहेत. हल्लींच्या स्थितीला त्या मुळींच लागू पडत नाहींत.

प्रख्यात तत्ववेत्ता आरिस्टाटल याचें मत असें असे कीं अगोदर राज्यव्यवस्था ठरली गेली आणि मग प्रजा ही संज्ञा अस्तित्वांत आली, आणि ह्मणून राज्यव्यवस्थेनें ठरलेले अथवा ती राज्यव्यवस्था ज्याच्या हातांत असते त्या राजानें ठरविलेले नियम प्रजेनें पाळलेच पाहिजेत. हे नियम प्रजेनें कां पाळावेत या संबंधाचें साक्रेटिसाचें मत ह्या ठिकाणीं देण्यासारखें आहे. तो ह्मणतो कीं "ज्या राज्यव्यवस्थेच्या योगानें प्रजेला शिक्षण मिळतें, प्रजा सुखानें राहते, व तिचा उत्कर्ष होतो त्या राज्यव्यवस्थेचे नियम न पाळणें हें प्रजेला कसें बरें योग्य होईल"! असल्या तऱ्हेची विचारसरणी जपानी लोकांना नवीन वाटण्याचें कारण नाहीं; कारण असल्या विचारांचा ओघ त्या देशांत अनादि काळापासून चालत आला आहे. "राज्यव्यवस्था," आणि "कायदे" यांचें राजा हें दृश्य स्वरूप होय अशी जपानी लोकांची

समजूत आहे. ज्या देशांतील लोकांची राजाबद्दल अशी उदात्त कल्पना आहे, तेथील लोक राजाचे निस्सीम भक्त असावे यांत काय आश्चर्य आहे !

राजनिष्ठा हा गुण चिरकाळ टिकणारा नाहीं. एक वेळ अशी येणार आहे कीं जगांतील राजनिष्ठा नाहींशी होऊन जो तो मनुष्य आपल्या मनोदेवतेप्रमाणें वागूं लागेल असें स्पेन्सर साहेबांचें भाकित आहे. परंतु असें व्हावयाचें आहे हें घटकाभर कबूल केलें तरी अजून त्याला किती तरी शतकांचा अवकाश आहे. तेवढ्या वेळांत शेवाळें सांचून सांचून एकाद्या वाळूच्या कणाचा मोठा थोरला खडक बनावयाचा ! इतक्या लांबवरच्या गोष्टी कोणीं पाहिल्या आहेत! परंतु मी ह्मणतों अशी स्थिति फार काळानें नाहीं, लवकरच प्राप्त झाली तरी त्याच्यांत काय बिघडणार आहे ! राजाची आज्ञा काय आहे याचा विचार न करितां लोक आपआपल्या मनोदेवतेप्रमाणें वागण्याला जेव्हां लागतील, इतकें शहाणपण, इतकी सुधारणा, जेव्हां या जगांत अवतरेल त्या वेळीं राजाबद्दल प्रेम लोकांत मुळींच रहावयाचें नाहीं काय? असें होईल असें मला वाटत नाहीं. परंतु या वादांत फारसें तात्पर्य नाहीं आणि ह्मणून तो येथेंच थांबविणें बरें. दुसऱ्या एका अशाच शुष्क वादावरून थोड्या वर्षींमागें जपानांतील विद्वानांत मोठें रण माजून राहिलें होतें. देवाची आज्ञा प्रथम पाळावी का राजाची हा वादाचा विषय होता. कोणी ह्मणत देवाची आणि कोणी ह्मणत राजाची. साऱ्या जपानभर हाच वाद माजून राहिला. पण असें कोणाच्या लक्षांत येईना कीं देव आणि राजा या दोघांच्याही आज्ञा एकाच वेळीं पाळणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे. देवाच्या परी देवाची

आज्ञा पाळली पाहिजे आणि राजाच्या परी त्याला मान दिला पाहिजे. एकाच वेळीं दोन यजमानांची नोकरी करणें अगदीं अशक्य आहे असें नाहीं. याला साक्रेटिसाचें उदाहरण उत्तम आहे. आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जें योग्य वाटलें त्यापासून यत्किंचित्‌ही न ढळतां तितक्याच निष्ठापूर्वक आणि शांत मनानें आपल्या ऐहिक राजाज्ञेप्रमाणें साक्रेटीस वागला नाहीं काय ?

राजाची आज्ञा पाळण्यास आपणांस आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या विरुद्ध आचरण करायास पाहिजे असें नाहीं; कारण राजाची आज्ञा मोडावी असें आपली सदसद्विवेकबुद्धि आपणांस केंव्हांच सांगणार नाहीं. परंतु एकादा राजा मूर्ख निघून त्यानें आपणांस भलतीच आज्ञा केली तर काय करावें असा एक प्रश्न उद्भवतो. अशा वेळीं राजाची खुशामत करणें नीचपणाचें लक्षण होय. राजाची अथवा अधिकाऱ्याची मर्जी संपादन करण्यासाठीं असल्या प्रसंगीं जे होला हो ह्मणतात ते नराधम होत. अशा प्रसंगीं खरा राजमार्ग ह्मटला ह्मणजे राजाशीं युक्तिवाद करून त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न करणें हा होय. शेक्सपिअर कवीचें "किंग लिअर" नाटक ज्यांनीं वाचलें असेल त्यांना इतकेंच सांगावयाचें कीं अशा प्रसंगीं सदरहू नाटकांत केंटनें जसें वर्तन केलें तसें वागणें हें आपलें कर्तव्य होय. परंतु राजाचें मन वळविण्याचा आपल्याकडून शक्य तेवढा प्रयत्न करूनही जर राजा नच ऐकेल तर आपला नाइलाज आहे. आपण मात्र सत्यापासून यत्किंचित्‌ही ढळूं नये, मग राजा समर्थ आहे. तो आपलें काय पाहिजे तें करो! अशा तऱ्हेचे बिकट व आणीबाणीचे प्रसंग अनेक

जपानी जवानमर्दांवर आलेले आहेत. राजाची खात्री करून देण्याची त्यांनीं शिकस्त करावी, आपण जें ह्मणत आहों तें प्रेमपुरस्सर आहे, खरें आहे, सद्धेतुक आहे, राजाचें हित त्यांतच आहे इत्यादि प्रकारांनीं त्यांनीं राजाचें मन वळविण्यास झटावें, आणि इतकें करूनही राजाला द्रव नच आला तर आपले प्राण देऊन ज्यांनीं आपलें ह्मणणें खरें केलें असे अनुकरणीय जवानमर्द जपानांत कित्येक होऊन गेले आहेत! आपल्या नांवाला, आपल्या वाडवडिलांच्या कीर्तीला, आपल्या राष्ट्राला कमीपणा येईल असें वर्तन कधींही करावयाचें नाहीं व राजाची सेवा करण्यासाठींच आपला जन्म आहे तेव्हां ती सेवा करीत असतां देहार्पण करण्याची वेळ आली तरी बेहत्तर आहे, अशा प्रकारच्या उदात्त विचाराची दिशा जेणेंकरून जपानी जवानमर्दांना लागेल अशा प्रकारचें

## तरुणांना शिक्षण

जपानांत मिळत असे.

जपानी जवानमर्दांना पूर्वी जें शिक्षण मिळत असे त्याचें मुख्य धोरण विद्यार्थ्यांना सच्छील बनविण्याकडे फार होतें. एकाद्या विद्यार्थ्याची बुद्धि मंद राहिली तरी पतकरेल, परंतु त्याच्या शीलाबद्दल नांवें ठेवण्यास जागा राहतां कामा नये. उलटपक्षीं एकादा विद्यार्थी फार हुशार आणि विद्वान् असून तो जर नीतिभ्रष्ट निघाला तर त्याच्या नुसत्या विद्वत्तेला जपानी लोक कवडीमोल समजत. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कारकून बनवावयाचें अथवा पोटापुरता पैसा मिळविण्याची कला शिकवावयाची हें त्यांचें धोरण नव्हतें. आपल्या शाळेंतील विद्यार्थ्यांच्या नैतिक आचरणांत दोष काढण्यास जागा राहूं नये अशी जपानांतील पंतोजींची मह-

त्वाकांक्षा असे. सौजन्य हें सच्छीलाचें एक अंग आहे व त्याचा विचार मागें झालाच आहे. विद्वान् मनुष्याला जपानांत मुळींच मान मिळत नसे असें नाहीं; परंतु शहाणपणा, परोपकारबुद्धि, आणि धैर्य या गुणांची लालसा जपानी तरुणांना फार असे. त्यांची नेहमीं गांठ पडली तलवारीशीं! नुसतें शब्दज्ञान घेऊन त्यांना काय करावयाचें होतें? समरांगणीं शत्रूची गांठ पडल्यावर उपयोगी पडण्यासारखा त्या शब्दज्ञानांत जर कांहीं भाग असला तर तिकडे अवश्य त्यांचें लक्ष जात असे. धर्म आणि धर्मशास्त्र हीं त्यांनीं भिक्षुक वर्गावर सोंपविलीं होतीं; परंतु देशकार्यापुढें देहाची मातब्बरी नाहीं असें वाटून अंगीं धैर्य येण्यास आवश्यक तितकें धर्मशिक्षण त्यांना जरूर मिळे. नुसता धर्म चांगला असला ह्मणजे तेवढ्यानेंच मनुष्याचें अगर राष्ट्राचें कल्याण होत नसतें, तर त्या सद्धर्मावर पूर्ण निष्ठा ठेवून तदनुरूप वर्तन करणारीं माणसें पाहिजे असतात. तत्त्वज्ञान आणि वाङ्मय यांची त्यांना मुळींच ओळख नसे असा मात्र कोणीं अर्थ करूं नये. करमणुकीपुरता वाङ्मयाचाही ते अभ्यास करीत आणि सारासार विचार करण्यापुरती अक्कल येण्यास जरूर तेवढीं तत्वज्ञानाचींही पुस्तकें ते वाचीत.

जपानी तरुणांना कोणत्या धोरणावर शिक्षण मिळत असे ही गोष्ट लक्षांत वागविली ह्मणजे त्यांच्या अभ्यासक्रमांत जे विषय त्यांना शिकविण्यांत येत असत त्यांचें वाचकांस आश्चर्य वाटणार नाहीं. त्यांनीं शिकावयाचे मुख्य विषय ह्मटले ह्मणजे, दांडपट्टा, धनुर्विद्या, जिउजुत्सु अथवा यवर, घोड्यावर बसणें, भाला बरची यांचा उपयोग करणें, कवाईत, सैन्यरचना अथवा व्यूहरचना आणि याशिवाय

सुंदर लिपी, नीतिशास्त्र, वाङ्मय आणि इतिहास हे होत. सदरहू विषयांचा देखील महत्त्वाच्या मानानेंच वरील अनुक्रम दिला आहे. त्यांत सुंदर लिपी व जिउज्युत्सु या दोन विषयांचा खुलासा करावासा वाटतो. सुंदर लिपीबद्दल जपानी लोकांना इतकी आस्था वाटण्याचें कारण असें असावें कीं जपानी धुळाक्षरें फार कठीण आहेत; तीं जवळ-जवळ चित्रासारखींच दिसतात आणि तेणेंकरून त्यांच्या ठिकाणीं एक प्रकारचें सौंदर्य आलें आहे. ज्याचा खुलासा करणें अगत्याचें आहे असा दुसरा विषय ह्मणजे जिउज्युत्सु अथवा यवर हा होय. हे दोन्ही शब्द निखालस जपानी आहेत. जिउज्युत्सु ही एक कला आहे. तिचा बोध करून देणारा अजून इंग्रजी भाषेंत शब्द नाहीं, मग तो आमच्या निराश्रित मराठींत कोठून असणार ! जिउज्युत्सु ही काय कला आहे व तिचा उपयोग किती आहे याची कल्पना, सर्व जग—निदान प्राच्य राष्ट्रें तरी जिंकण्याची—नव्हे सुधारण्याची[1]—हाव बाळगणाऱ्या इंग्रजांनाही अजून नाहीं, मग आपल्या संबं-

१ लार्ड कर्झन साहेबांनीं आपल्या "Problems of the Far East" नांवाच्या पुस्तकाची अर्पणपत्रिका लिहिली आहे ती अशी आहे: To those, who believe that the British Empire is, under Providence, the greatest instrument for good that the world has seen and who hold, with the writer, that its work in the far East is not yet accomplished, this Book is inscribed. "ईश्वराच्या कृपेनें इंग्रजांचें साम्राज्य हें जगाचें कल्याण करून सोडण्याचें मोठें थोरलें व अद्वितीय साधन आहे असें ज्यांचें मत आहे व प्राच्य राष्ट्रांतील आपली कामगिरी अजून अपुरी राहिली आहे असें ज्यांना माझ्याप्रमाणें वाटत आहे त्यांना हें पुस्तक अर्पण केलें असे."

धानें तर बोलावयासच नको. आपण निःशस्त्र असतां दुसरा एकादा आपल्यावर चालून आला तर त्याच्या शरीराच्या कोणत्या भागावर कशी दुखापत केली असतां तो आपलें शस्त्र चालविण्यास असमर्थ होऊन आपला बचाव होईल हें जाणण्याची जी कला तिचें नांव जिउजुत्सु होय. जिउजत्सु ह्मणजे कुस्तींतले पेंच मात्र नव्हत. कुस्ती करण्यास शारीरिक बळ तरी लागतें. जिउजुत्सुला त्या बळाचीही अपेक्षा नसते. जिउजुत्सुच्या योगानें प्रतिस्पर्धी मरत नाहीं, तेवढ्यापुरता तो चीत होऊन पडतो. वाचकहो, तुह्मांस वाटत असेल कीं मी आतां अखेरीस ती काय कला आहे हें सांगणार असेन! पण मी कोठून सांगूं ? वरच्यापेक्षां जास्त माहिती परकीयांना देण्याइतके जपानी लोक भोळे असते तर मी-ही तुह्मांला जिउजुत्सु कला साकल्यानें सांगितली असती. पण ते इतके भोळे नाहींत व ही कला अजून परकी लोकांना समजली नाहीं! तुह्मां आह्मांला ती कधीं कळावयाची असली तर इंग्रजांच्या मार्फतचना! पण अजून ती इंग्रजांना तरी कोठें कळली आहे? जपानचा आणि इंग्लंडचा आतां कोठें तह झाला आहे. तेव्हां त्या जपानी लोकांची सुधारणा होऊन त्यांच्यापासून कितीतरी वर्षांनीं ती कला इंग्रजांना प्राप्त होणार! ती कला इंग्रजांना शिकविण्यास जपानी लोक तयार आहेत असें आल्फ्रेड स्टेड साहेब[१] ह्मणतात, पण ते खरोखरच तयार आहेत का नुसतें ह्मणताहेत हें अजून कळावयाचें आहे.

---

१ जपान व इंग्लंड यांचा तह झाल्यानंतर साहेब मजकुरांनीं सन १९०२ सालीं जपानच्या स्तुतिपर "Japan our new ally" असा एक ग्रंथ लिहिला आहे त्याचें पान १७६ पहा.

ज्यांच्या शिक्षणाचें धोरण मुख्यत्वेंकरून लष्करी आहे त्यांना गणितविषय जरूर अवगत असावयास पाहिजे, असें असून वरील यादींत त्या विषयाचा समावेश न केलेला पाहून वाचकांना आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. परंतु याचें एक कारण कदाचित् असें असावें कीं पूर्वी ज्या लढाया होत त्यांत अलिकडच्याप्रमाणें फारशी शिस्त नसल्याकारणानें पूर्वीच्या जवानमर्दांना आंकड्यांच्या माहितीची आवश्यकता वाटली नसावी इतकेंच नव्हे तर त्यांना आंकडे मोजण्याचा, बेरीज व वजाबाकी, गुणाकार व भागाकार करण्याचा मनापासून कंटाळा असे. ह्या आंकड्यांची जरूरी विशेष कोणाला भासते ? द्रव्यवानाला. परंतु जपानी देशभक्तांना तर त्या द्रव्याचा तिटकारा असे. अकिंचन स्थितींत राहण्यांतच त्यांना भूषण वाटे. ज्याला द्रव्यलोभ सुटला त्याच्या हातून कधीं देशसेवा कोणत्या देशांत झाली आहे? "पैसा, पैसा" हाच रात्रंदिवस ज्यांना निदिध्यास लागला आहे त्यांनीं "पैसा पैसा" करीतच मरावयाचें ! आपल्या आयुष्यांतील तीस तीस वर्षें ज्यांनीं पैशाला पैसा जोडण्यामध्यें घालविलीं ते देशभक्तीच्या अथवा परमार्थाच्या कितीही गोष्टी बोलोत, त्यांचें प्रेम आपल्या पैशावरून उडून देशावर अथवा धर्मावर जडणें शक्यच नसतें. कोणालाही काय एक नाद असला तर त्याच्या हातून कांहीं होतें. एकाच वेळीं दोन, तीन नाद साधत नसतात व तसें करण्याचा जे प्रयत्न करितात ते पुष्कळ अंशीं ढोंगी असतात असें समजावें. मी पैसाही मिळवीन, देशसेवाही करीन आणि ईश्वरालाही आळवीन असें जर कोणी ह्मणेल तर त्याला ह्यांतलें कांहींच साधावयाचें नाहीं. "इतर कसली

हाव असली तर पतकरेल परंतु देशभक्तांना द्रव्याची हाव नसावी" अशा अर्थाची जपानांत एक ह्मण आहे. द्रव्याचा अनावर लोभ एकदा मनुष्याला सुटला ह्मणजे शहाण्याचा तो वेडा होतो. हीं सर्व तत्वें जपानी लोकांना पूर्ण माहित होतीं आणि ह्मणूनच विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं द्रव्याचा तिटकारा उत्पन्न करण्याविषयीं त्यांचा प्रयत्न असे. पैशासंबंधानें मुलांनीं गोष्टी करणें हें वाईट शिक्षणाचें दर्शक होय असें जपानांत मानीत व त्याच्या उलट चवली कशाला ह्मणतात व पावली कशाशीं खातात हेंही जर त्याला माहित नसेल तर त्याच्या शिक्षणाविषयीं आईबापांनीं योग्य काळजी घेतली असें ते अनुमान काढीत. सारांश, पूर्वीच्या जपानी तरुणांच्या शिक्षणक्रमांत गणित विषयाचा जो अभाव दिसून येतो त्याचें कारण त्यांना त्या विषयाची जरूर नव्हती. लढायांतून मोठीशी शिस्त असे असेंही नाहीं व पैसा मोजण्याचेंही कारण नव्हतें, तेव्हां मग आंकडेशास्त्राची काय जरूर उरली ? जपानांत पूर्वीच्या काळीं पैशाचा व्यवहार हलक्या लोकांकडे सोंपविण्यांत आला होता. सरकारी खजीन्याचें काम करण्यास देखील उत्तम कुळांतले लोक मिळत नसत. तरुणांनीं फार काटकसरीनें वागावें असा एका जपानी गृहस्थाचा उपदेश आहे खरा, पण त्याचा हेतु काटकसर करून द्रव्यसंचय करावयाचा नसून उधळपट्टीच्या योगानें वाईट व्यसनें जडण्याचा संभव असतो तो टळावा असा आहे. रोमच्या इतिहासाचा ज्यांना परिचय घडला आहे त्यांना ही गोष्ट अवगत असेलच कीं पूर्वी रोममध्यें सुद्धां मुलकी खात्याकडे अथवा फडणीशीचें काम करण्याकडे सहसा थोर लोकांचें मन लागत नसे. याचा

परिणाम असा होई कीं असलीं कामें करण्यास चांगले लोक मिळत नसत. यासाठीं चांगल्या लोकांत हीं कामें करण्याची आवड उत्पन्न व्हावी ह्मणून सरकारांतून त्यांना पदव्यांची लालूच दाखविण्यांत येऊं लागली. पदवीदान हें एक सरकाराजवळ मोहनी अस्त्र असतें! मग तें सरकार जगांतल्या कोणत्याही भागावर व कोणत्याही काळीं राज्य करीत असो. ह्या अस्त्राचा प्रयोग झाल्यावर त्यांतून निसटून जाणारे धैर्यवान् लोक फार विरळा ! हें अस्त्र एकाद्यावर येऊन पडलें नाहीं तेथपर्यंत ठीक असतें; पण त्याचा एकदा का उपयोग झाला कीं मनुष्य कितीही गुणी असो तो चीत झालाच ह्मणून समजावें आणि मग चुगलखोराच्या कामापासून तों थेट दरबारांत बसून पांडित्य करण्यापर्यंत कोणतेंही काम त्याच्याकडून खुशाल आपल्या मनासारखें बजाऊन घ्यावें ! मुलकी खात्यासंबंधानें आवड उत्पन्न करण्याचे कामीं तरी रोमच्या लोकांवर ह्याच अमोघ अस्त्राचा प्रयोग करण्यांत आला. तो प्रयोग वाया गेला नाहीं! रोमन लोकांमध्यें हळू हळू पैशाचें प्रेम उत्पन्न झालें आणि शेवटीं शेवटीं तर तें प्रेम इतकें फोफावलें कीं त्यांतच अखेरीस सर्व राष्ट्राची आहुति पडली! द्रव्यलोभ ज्यांना अनावर झाला आहे अशा राष्ट्रांना हें रोमचें उदाहरण नेहमीं जाचत असतें! जपानी लोक आपल्या तरुणांना पैशापासून जे अलिप्त ठेवीत त्यांतील शहाणपण रोमच्या ह्या उदाहरणावरून दिसून येतें. ते पैसा आणि पैसा मिळविण्याचे धंदे क्षुद्र कां लेखीत हें रोमच्या उदाहरणावरून तरी सर्वांस कळण्यासारखें आहे.

जपानी लोकांना द्रव्याचा अशाप्रकारें तिटकारा वाटत

असल्यामुळें द्रव्याच्या पायीं जे अनर्थ ओढवतात त्यांचा अर्थात त्यांना अनुभव नाहीं. अन्यायानें पैसा मिळविण्याचे कामांत जपानी सरकारी अधिकारी जगांतील इतर सुधारलेल्या राष्ट्रांच्या किती तरी मागें रखडत पडले आहेत याचें तरी कारण हेंच होय. परंतु अलीकडे त्यांच्यावरही सुधारणेचा थोडा थोडा प्रकाश पडूं लागला आहे ही मोठी शोचनीय गोष्ट आहे.

हे सर्व विचार सुचण्याचें कारण गणित विषय होय. पूर्वींच्या तरुणांना गणित विषय जरी शिकविण्यांत येत नसला तरी गणितापासून जें शिक्षण मिळावयाचें तेंच वाङ्मयात्मक व नैतिक विषयांच्या ऊहापोहापासून मिळत असे. विनाकारण भाराभर विषय शिकवून तरुण विद्यार्थ्यांना भांबवून सोडण्यांत अर्थ नसतो. जपानी लोक असें मुळींच करीत नसत. असें करण्याचें त्यांना कारणच नव्हतें. ज्याला पुढें केवळ खर्डे घासावयाचे असतात अथवा देशाच्यासाठीं जवानमर्दाप्रमाणें लढावयाचें असतें त्याला वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र अथवा अर्थशास्त्र इत्यादि निरुपयोगी विषय शिकवून क्षीण करण्याचें महत्पाप जाणून बुजून जपानी सरकार कां ह्मणून करील? ज्यांच्या जवळ भाराभार चिंध्या असून त्यांत एकही धड नसते अशांना जपानांत मुळींच मान नसे. तुटपुंजी माहिती पुष्कळ विषयांची करून घेण्यापेक्षां एकाच विषयांत पारंगत होणें फार चांगलें असें ते समजत. मनुष्यांनीं विद्या कां करावी याचीं बेकननें तीन कारणें दिलीं आहेत: करमणूक, भूषण व सामर्थ्य. जपानी लोक विद्या शिकत ती शेवटच्या कारणामुळें होय. करमणुकीसाठीं अथवा भूषण ह्मणून श्रीमंत

लोकांनीं अथवा राष्ट्रांनीं शिकावें, परंतु पतित लोकांनीं आणि राष्ट्रांनीं काय शिकावयाचें ही गोष्ट त्यांचे स्वाधीन असेल तर जें शिकावयाचें तें आपल्या अंगीं सामर्थ्य येण्यासाठींच शिकलें पाहिजे. विद्या शिकण्याचीं कारणें बेकननें तीनच दिलीं आहेत. काय करील बिचारा! पोट हें चवथें कारण त्याला त्या वेळीं सुचलें नाहीं, यांत त्याच्याकडे काय बोल आहे?

आपल्या स्वाधीन जीं मुलें केलीं आहेत, तीं परीक्षेंत उत्तीर्ण कशीं होतील एवढीच आपणांवर जबाबदारी नसून तीं आपल्या सच्छीलानें आपल्या राष्ट्रास भूषणीभूत कशीं होतील, ह्याचाही भार आपणांवरच आहे. मुलाचें नुसतें डोकें नाहीं तर त्याचें अंत:करणही त्याच्या पालकांनीं आपल्या स्वाधीन केलें आहे, त्याच्या बुद्धीवर व मनावर सुसंस्कार घडविण्याचें काम आपलें आहे असा ज्या राष्ट्रांतील गुरूंचा समज असतो, त्यांनीं आपल्या शिरावर फार महत्वाचा पण पवित्र असा भार घेतलेला असतो. मनुष्य कितीही विद्वान् झाला, त्याची बुद्धि कितीही कुशाग्र झाली तरी जेथपर्यंत त्याच्या अंत:करणावर त्या विद्येपासून उत्कृष्ट संस्कार घडले नाहींत, तेथपर्यंत त्याची ती विद्या राष्ट्राच्या दृष्टीनें निरर्थक होय. मुलगा कितीही विद्वान् निघाला, पण त्याला आपल्या आईची काळजी वाटत नसली, आपल्या आईचें दु:ख पाहून त्याचें अंत:करण जर तिळतिळ तुटत नसलें, तिच्या सेवेंत तो जर तत्पर नसला, तर अशा पोराला प्रसवल्याबद्दल त्या आईला काय भूषण वाटणार आहे? माझ्या "आईबापांनीं मला जन्म दिला, पण सुसंस्कृत असें मन मला माझ्या गुरूनें दिलें," असा विचार करून जपानी विद्यार्थी आ-

पल्या गुरूंचा अतिशय मान ठेवीत. त्यांचे गुरूजी निवळ भाडोत्री नसल्यामुळें त्यांचें आपले गुरूंवर फार प्रेम असे. विद्यार्थ्यांकडून इतका मान व प्रेम संपादन करणारे गुरूही त्याच योग्यतेचे असत. ते स्वतः विद्वान् असून पूर्ण सच्छील असत, देशभक्त असत, धर्मभक्त असत. विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं "स्वदेश आणि स्वधर्म" यांची निस्सीम भक्ति उत्पन्न करण्यास त्यांना कोणाचा बंध नव्हता, इतकेंच नव्हे तर, उलट हेंच त्यांचें काम असे. निराश्रित मुलांचा बापाप्रमाणें ते समाचार घेत आणि उनाड पोरांना सदुपदेशामृत पाजून ते ताळ्यावर आणीत. वर्षाच्या कांठीं नियमित विषय शिकविण्यासाठीं मोबदला ह्मणून कांहीं नियमित पैसा देण्याची अलीकडची सुधारलेली पद्धत पूर्वींच्या जपानी लोकांना ठाऊक नव्हती. दरमहाचा पैसा टाक आणि घे विद्या असा विद्येचा त्यांनीं क्रयविक्रय मांडला नव्हता. पैसा देऊन प्रेम विकत घेतल्याचें जगांत कधीं कोणीं ऐकलें आहे ? ज्ञानाची गोष्ट तशीच आहे. द्रव्याच्या रूपानें ज्ञानाची किंमत करतां येण्यासारखी नाहीं. **श्रीसमर्थ रामदास** स्वामींनीं **श्रीशिवाजी** महाराजांना जो बोध केला, जें ज्ञान करून दिलें त्याची किंमत कोणाला करवेल ? तो बोध अमोल होता. सद्गुरूपासून सच्छिष्याला मिळणाऱ्या ज्ञानाची गोष्ट सर्वत्र व सर्वकाळीं अशीच आहे. अशा रीतीनें सद्गु-रूपासून तल्लीन अंतःकरण करून विद्यार्थी जें ज्ञान मिळ-वितो, त्याची योग्यता पैसा देऊन मिळणाऱ्या हल्लींच्या अवि-द्यात्मक विद्येला कोठून येणार आहे ? जिची कांहीं ठराविक किंमत असेल अशीच वस्तु आपणांस पैसा देऊन मिळते. अशी ठराविक किंमत आत्मज्ञानाची कधीं कोणीं केली

आहे? पैशानें न मोजतां येण्यासारखें तेंच ज्ञान होय. सद्गुरुचरणीं द्रव्य अगर इतर पदार्थ अर्पण करण्याची चाल आहे, पण ते मोबदला ह्मणून मात्र अर्पण होत नसतात. सद्गुरूनाही असल्या नश्वर पदार्थांची अपेक्षा नसते. जपानांतील सद्गुरु कशा प्रकारचे असत, याचें सविस्तर वर्णन करण्याचा या ठिकाणीं हेतु नाहीं, परंतु वरील त्रोटक विवेचनावरूनही जपानांतील पूर्वीची शिक्षणपद्धति आणि आमच्यांतील पूर्वीची शिक्षणपद्धति यांच्यांत किती साम्य आहे, हें वाचकांचे लक्षांत येण्यासारखें आहे. जपानी लोकांना कशा प्रकारचें शिक्षण मिळालें याचें येथवर वर्णन केलें आहे. आणि आह्मांस कशा प्रकारचें शिक्षण मिळत आहे, हें वाचकांचे डोळ्यांपुढें आहे तेव्हां त्या-दोहोंची तुलना करण्याच्या भरीस मी न पडतां तें काम वाचकांवरच सोंपवितों. जपानांतील शिक्षक सदाचरणाचे मूर्तिमंत पुतळे होते, ही तर गोष्ट खरीच, परंतु त्यांच्या ठिकाणीं प्राधान्येंकरून दिसून येण्यासारखा गुण ह्मटला ह्मणजे

## आत्मसंयमन

हा होय. जपानांतील प्रत्येक जवानमर्दाच्या ठिकाणीं हा गुण अवश्य असावा लागे. एकपक्षीं धैर्य, साहस आणि दुसऱ्या पक्षीं शिष्टाचारसंपन्नता, सौजन्य, अशा किंचित् परस्परविरोधी गुणांचा जपानी तरुणांना अभ्यास करावा लागत असे. याचा परिणाम असा झाला कीं, आत्मसंयमन हा जपानांत राष्ट्रीय गुण होऊन बसला. स्वतःला कितीही दुःख झालें असलें तरी तें धैर्यानें गिळून त्यापासून दुसऱ्याला ताप न होईल असें वर्तन करण्यापासून आत्मसंयमनाची संवय लागणें स्वाभाविक आहे. लहानपणापासून आत्मसंयमन

करण्याचा धडा मुलामुलींना जपानांत मिळत असे. कित्येक परकीयांचें मत असें आहे कीं याच्या योगानें लहान मुलामुलींचीं मनें कठोर बनण्याचा संभव आहे. आणि जपानांतील कांहीं चालीरीती त्यांना निर्दयपणाच्या वाटूंही लागल्या आहेत. परकी लोकांचें हें मत चुकीचें आहे. ते जपानाकडे पाहतांना स्वतःचा चष्मा लावतात. जपानी चष्मा लावीत नाहींत, त्यामुळें त्यांच्या दृष्टीला असा विपरीत भास होत असतो. माझें तर मत असें आहे कीं प्राच्य आणि पाश्चात्य राष्ट्रांतील समाजस्थितीचा विचार केला तर असें दिसून येईल कीं आत्मसंयमन हा प्राच्य राष्ट्रांचा विशेष धर्म आहे. आंत थोडें आणि बाहेर फार हा पाश्चात्यांतील विशेष आहे. पण तें कांहींही असो; आत्मसंयमनापासून मनुष्याचें मन कठोर बनण्याच्या ऐवजीं तें कोमल होतें, एवढें मात्र खरें आहे.

आपल्या मनोविकारांची छटा चेहऱ्यावर उमटूं देणें हें बायकांचें काम होय असें जपानी जवानमर्द मानीत. आपल्या चेहऱ्यावरून परक्यास सुखदुःखाची बिलकूल कल्पना न होऊं देणें हेंच खऱ्या जवानमर्दाचें लक्षण होय. आपलें मन इतकें ढिलें सोडून आपले मनोविकार उचंबळूं दिले तर मग धैर्य तें कोठें उरलें? मनावरही ज्याला ताबा ठेवतां येतो तोच खरा बळी होय. आपल्या चिमुकल्या मुलाला पोटाशीं घेऊन त्याच्याशीं लडिवाळपणा करितांना जपानांत कोणी बाप सांपडणार नाहीं! चारचौघांसमक्ष आपल्या भार्येच्या हाताचें किंबहुना गालाचें चुंबन करण्याची पाश्चात्यांची सुधारलेली चाल जपानांत शिरली नाहीं. काय त्यांना आपल्या बायकापोरांचें प्रेम नसतें!

त्यांनाही आपल्या मुलाबाळांचें कौतुक करावेंसें वाटतें, त्यांनाही विरहदु:खाची कल्पना असते, परंतु त्याबरोबर विनय, जनलज्जा, वडिलांचा मान ठेवणें इत्यादि उदात्त सद्गुणांना त्यांनीं धाब्यावर बसविलेलें नसतें. एका जपानी तरुणानें एकदा मोठे खुबीदार उद्गार काढिले होते. "अमेरिकेंतील नवरे चारचौघांमध्यें आपल्या बायकांचें चुंबन करितात आणि एकांतांत त्यांना मारितात, परंतु जपानी नवरे याच्या उलट करितात." या उद्गारांत कांहींच सत्य नाहीं असें सहसा ह्मणतां यावयाचें नाहीं. आपल्या अंत:करणांत मनोविकारांची जरी खळबळ झाली, तरी ती बाहेर दाखवूं नये. सर्व स्थितींत आपण आपलें मन शांत ठेवावें, त्याला उच्छृंखल होऊं देऊं नये.

सन १८९४ सालीं चीन आणि जपान ह्या दोन राष्ट्रांत जेव्हां लढाई जुंपली होती तेव्हां एक जपानी पलटण एका गांवाहून लढाईवर निघणार होती. पलटणींतील लोकांची शेवटची भेट घेण्यास आणि त्यांना आशीर्वाद देण्यास आगगाडी चालू होण्याचे ठिकाणीं हजारों लोक जमले होते. कोणाचे पुत्र, कोणाचे नवरे, कोणाचे मित्र, कोणाचे बंधु वगैरे लढाईवर जात होते, तेव्हां स्वाभाविकपणें स्त्रीपुरुषांचा मोठा मेळा तेथें जमला होता. त्या गांवीं अमेरिकेंतला एक मनुष्य राहत होता. त्यालाही वाटलें आपण आज मौज पाहण्यास जावें. रडारडी, आरडाओरड, शेवटच्या प्रेमाच्या भेटी वगैरे खूप गंमत पहावयास सांपडेल अशी त्याला आशा होती. पण बिचाऱ्याची तेथें जाऊन पूर्ण निराशा झाली. आगगाडीची शीळ झाली—नव्हे—आगगाडी चालू झाली, तरी कोणीं हुर्यो केली नाहीं, रुमाल

फडकविले नाहींत, विजयी व्हा, पुन्हा सुखरूप परत या असा आयांनीं आपल्या मुलांना किंवा पत्नींनीं आपल्या पतींना आमच्या अमेरिकन गृहस्थांना ऐकूं येईल इतक्या मोठ्यानें कोठें आशीर्वादही दिले नाहींत. मग त्याला तेथें काय दिसलें आणि त्यानें काय ऐकिलें? त्याला कांहीं दिसलें नाहीं आणि त्यानें कांहीं ऐकलें नाहीं. दुसऱ्यांना आपलें प्रेम रुमाल उडवून दाखविण्यासाठीं थोडींच तीं माणसें तेथें जमलीं होतीं? त्यांचें प्रेम तिऱ्हाइताला दिसण्यासारखें नव्हतें, ह्मणून तें त्यांच्यांत मुळींच नव्हतें असें मात्र नाहीं. त्यांचें प्रेम ईश्वराला दिसत होतें आणि तें ज्यांच्यावर होतें त्यांना भासत होतें. आयांनीं दिलेले आशीर्वाद ईश्वराला ऐकूं गेले आणि ते मुलांना पावले. हें सर्व कसें झालें याची कल्पना भपक्यावर ज्यांची सारी नजर अशांना होण्यासारखी जरी नसली तरी आपल्याला हें सर्व समजण्यासारखें आहे. भपक्याला भुलून उपयोग नाहीं, किंबहुना खळखळ फार असली तर प्रेमाची नदी उथळ आहे असेंच समजावें. जो भासला बाहेर तोच घरीं. मूल अजारी असलें तर पापणीला पापणी न लावितां जागरणें करणाऱ्या आया प्राच्य राष्ट्रांतच आढळावयाच्या. तें मूल ज्या खोलींत निजलें असेल तिकडे आपल्या वृद्ध वडिलांची नजर चुकवून सतरादा बाप डोकावून जाईल. उलटपक्षीं स्वतः आईची अथवा बापाची अत्यावस्था असली तर मुलाला विनाकारण दुःख होईल ह्मणून त्याला इतकी अत्यावस्था आहे हें तीं कळवावयाचीं देखील नाहींत. जपानच्याच काय पण सर्व हिंदु अगर बुद्ध राष्ट्रांतील कुटुंबांतून अशा प्रकारचीं किती तरी उदाहरणें देतां येतील.

आपलें अंतःकरण प्रेमानें अगर शोकानें कितीही उचंबळत असलें तरी त्या विकाराला जागच्या जागीं दाबून टाकणें, तो बाहेर फुटूं न देणें हा प्राच्य राष्ट्रांचा स्वभाव होऊन बसला आहे. धर्माच्या बाबतींत तरी प्राच्य राष्ट्रांचा हाच अनुभव आहे. थोड्याशा ज्ञानावर पुष्कळ फुशारक्या मारण्याची पाश्चात्यांची चाल सहवासानें आपल्यांमध्यें जरी शिरूं पहात आहे, तरी जपानांत वाटेल त्या लोकांपुढें धर्माच्या बाबतींत आपल्या काय कल्पना आहेत, आपल्याला काय अनुभव येत आहे, आपला योगाभ्यास कसा चालला आहे, वगैरे गोष्टींची कहाणी कोणीही सांगत बसत नाहीं. अलीकडे आपल्या देशांत स्वधर्माकडे बऱ्याच जणांचें लक्ष लागलेलें आहे. हें नवीन वळण कितपत स्थिरावणारें आहे याचा नक्की अंदाज आज करणें चुकीचें होईल. परंतु या बाबतींत जो थोडासा अनुभव येत आहे त्यावरून असें दिसतें कीं "आपल्याला कांहीं साधावें" या विचारापेक्षां "आपल्याला कांहीं साधून आपण त्याचें प्रदर्शन केव्हां करूं" याच विचाराचा पुष्कळ तरुणांवर पगडा बसलेला दिसतो. आपल्या अभ्यासांत पारंगत होण्याची कोणीच वाट पहात नाहीं. थोडासा कांहीं अनुभव येतांच तो दुसऱ्यापुढें ओकून टाकण्याविषयीं जो तो उतावीळ झालेला असतो. वस्तुस्थिति याच्या विपरीत असली तर त्यांत मला आनंद आहे, परंतु मला जी स्थिति दिसते ती तरी उतावीळपणाची दिसते. असें असेल तर तें चांगलें नाहीं. आपल्या धर्माची व धर्मगुरूची आज्ञा याच्या उलट आहे. अशा उतावीळपणानें आपल्याला जें कांहीं साधतें त्याची शक्ति मात्र कमी होत असते. जपानांत असा उतावीळपणा

नाहीं. तो आपल्यामध्येंही नव्हता व यापुढें नसावा. भक्ति-मार्गानें देवाला आळविणाऱ्या एका जपानी तरुणाला कांहीं थोडासा साक्षात्कार झाला; तो आपण लोकांना जाहीर करावा ह्मणून त्याचें अंतःकरण उडूं लागलें, पण त्यानें तसें केलें नाहीं. त्या वेळीं त्यानें आपल्या रोजनिशींत पुढील सुविचार लिहून ठेविला: "प्रेमळ विचारांनीं तुझें अंतःकरण उचंबळून आलें आहे काय? पण थांब, त्या अंतःकरणाला आवरून धर, उतावीळ होऊं नकोस, सुविचाराचें बीज तुझ्या अंतःकरणांत अजून पुष्कळ रुजावयाचें आहे. तें पूर्ण रुजण्याचे पूर्वींच त्याला बाहेर पडूं देऊं नकोस, बोलून त्याला डवचूं नकोस तर अजून एकांतांत शांतपणें त्याला तुझ्याच अंतःकरणांत पुष्कळ दिवस राहूं दे." त्या तरुणाच्या ह्या सुविचारापासून आमच्या तरुणांनीं पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. आपल्या अंतःकरणांत हरएक प्रकरणांसंबंधानें परंतु विशेषतः धर्मासंबंधानें ज्या कल्पना उद्भवतात, त्या भडाभड जर कोणी बोलून दाखवूं लागला तर जपानी लोक असें अनुमान काढितात, कीं त्याच्या त्या कल्पना मनापासून नसतात, व त्या फारशा दृढही नसतात. असा उथळपणा हें थोडेंसें दांभिकपणाचेंच लक्षण होय असें ते समजतात. अशा उथळ अंतःकरणाचा मनुष्य डाळिंबासारखा ह्मणावयाचा. डाळिंबाचें किंचित् तोंड उकलतांच जसें आंत काय आहे तें दिसून येतें तद्वत् असल्या मनुष्याचें जरा तोंड उघडण्याचा अवकाश कीं, लागलींच काय असेल नसेल तें ओकून पडावयाचें. धार्मिक, राजकीय किंवा सामाजिक, कोणतींच महत्वाचीं कामें अशा उथळ माणसांच्या हातून होत नसतात!

आत्मसंयमन करण्याचा प्राच्य राष्ट्रांचा जो विशिष्ट धर्म आहे त्याचें महत्व पाश्चात्यांना न समजून प्राच्य राष्ट्रांचा हा कांहीं तरी तिरपगडेपणा आहे, असेंच त्यांना वाटतें. तथापि आपल्याला जेथपर्यंत तसें वाटावयास लागलें नाहीं, तेथपर्यंत तिऱ्हाइतांना काय वाटतें याची काळजी करावयास नको. एकादा हिंदु अगर जपानी मनुष्य दुःखांत असून आपण त्याच्या समाचारास गेलों, तर रडरडून त्याचे डोळे जरी लाल झाले असले व गालांवरून पाण्याचे ओहोळ गेले असले तरी किंचित् हसतमुख करूनच तो आपल्याला सामोरा येईल. त्याच्या अंतःकरणांत दुःखानें काहूर माजविलेलें असलें, तरी तो बाहेरून दुःख दाखविणार नाहीं. आपण त्याचें सांत्वन करण्यापूर्वींच त्यानें तें स्वतःचें करून घेतलेलें असतें व तो उलट आपलें सांत्वन करूं लागतो आणि आपणांस उलट तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगतो कीं "संसार हा दुःखमूल आहे. समुद्रांत चार धलप्या जशा चार बाजूंनीं येतात, त्या कांहीं काळ एका ठिकाणीं जुळतात व पुन्हां पांगतात, तद्वत् या संसारांतल्या प्राण्यांचें आहे, मरण हें कोणाला चुकत नाहीं, गेल्याचा शोक करणें वृथा आहे, परंतु बायकांना इतका विवेक नसतो." वगैरे.

आपले मनोविकार दाबून ठेवणें जपानांत अशा रीतीनें भाग पडत असल्यामुळें कित्येक वेळां ते मग कवितेच्या रूपानें बाहेर पडत असतात. दहाव्या शतकांत जपानांत एक कवि होऊन गेला. त्यानें ह्मटलें आहे कीं, "जपानांत आणि चीनदेशांतही, कोमल हृदयाच्या मनुष्याला जेव्हां दुःख होतें तेव्हां त्याचें तें दुःख कवितेचें रूप धारण करितें." दहाव्या शतकांत त्याचें झालेलें मत विसाव्या शतकांतील

सद्य:स्थितीशीं तंतोतंत जुळत आहे. दु:खानें विव्हळ झालेल्या किती तरी कवींचीं सुंदर, प्रेमळ व हृदयद्रावक काव्यें जपानांत आहेत. परंतु परभाषेंतील त्या मौक्तिकतुल्य कवितांचें भाषांतर करून त्यांचें सौंदर्य हरण करण्यापेक्षां त्यांना आपल्या मुळच्याच स्थितींत राहूं देणें बरें नव्हे काय?

कितीही दु:ख झालें तरी तें जपानी लोक निमूटपणें सहन करीत. मरणाची देखील त्यांना भीति वाटत नसे. त्यांचा हा शांत स्वभाव पाहून पाश्चात्यांनीं त्यांना कठोर हृदयाचें ठरविलें आहे. परंतु त्यांच्या ठिकाणीं असली शांति येण्याचें कारण त्यांचीं कठोर हृदयें आहेत कां प्रेमळ हृदयें आहेत हें आपल्याला समजण्यास फारसें कठिण जाणार नाहीं. आज हजारों वर्षें आत्मसंयमनाचा धडा त्या राष्ट्राला मिळत असल्यामुळें पाश्चात्यांचा त्यांच्याविषयीं असा गैरसमज झालेला आहे.

दोन चालींमध्यें तर ह्या आत्मसंयमनाचा जपानांत कळस झाला होता. त्यांपैकीं पहिली चाल ह्मटली ह्मणजे त्रिविध तापापासून सोडविणारी

## आत्महत्या

हीं होय. या चालीला जपानांत ह्यारािकिरी ह्मणतात. दुसरी चाल ह्मटली ह्मणजे आपल्यावर, आपल्या वाडवडिलांवर, आपल्या देशावर कोणी अपकार केल्यास त्याबद्दल सूड उगविणें. या सूडबुद्धीबद्दल विचार आपण मागावून करूं, परंतु या दोन्ही चालींबद्दल येथें इतकें सांगून ठेवितों कीं, त्या हल्लीं प्रचारांत नाहींत. अलीकडे जपानांत कायदे-

कानू झाल्यामुळें त्या चाली बंद पडत चालल्या आहेत; व तसें होणें वाजवी आहे. आपल्यावर अपकार करणारास जर कायद्यानें शासन होऊं लागलें आहे, तर स्वत: त्याचा सूड उगविण्याचें प्रयोजनच उरत नाहीं. यापुढें आतां आपल्या पतीवर अपकार करणारांचा सूड स्त्रियांनीं उगविल्याच्या गोष्टी आपणांस ऐकूं येणार नाहींत. नीति व न्याय यांच्याविरुद्ध आचरण करणारांस शिक्षा करण्याचें काम आतां व्यक्तीकडे राहिलें नाहीं, त्याचा भार पुढें कायदेकानू यांनीं उचलिला आहे. असें आहे तरी देखील अजून कधीं कधीं आत्मघाताच्या व खाजगी रीतीनें सूड उगविल्याच्या गोष्टी जपानांत ऐकूं येतात. परंतु कायद्याचा प्रतिबंध झाल्यामुळें असले प्रकार हळू हळू नाहींसे होत जाणार आहेत. मग आतां प्रश्न असा उरतो कीं ज्या चाली यापुढें कायद्यानें बंद करण्यांत आल्या आहेत त्यांबद्दल इतकी वाटाघाट कशास पाहिजे? असें त्या चालींत आतां महत्व काय उरलें आहे? त्या चालींत अजून देखील पुष्कळ महत्व आहे. जुन्या कथा जाणण्याची जी मनुष्याला इच्छा असते ती तृप्त होते हें तर आहेच, पण याशिवाय ज्या शिक्षणाच्या योगानें जपानी लोकांना सद्य:स्थिति प्राप्त झाली आहे त्या शिक्षणाचें धोरण कशा प्रकारचें होतें हें असल्या विवेचनावरून आपणांस समजणार आहे. याच कारणासाठीं ह्या चाली हल्लीं जरी बंद पडल्या असल्या, तरी त्यांचें थोडक्यांत विवेचन करण्याचा माझा विचार आहे.

आत्मघात करण्याच्या चालीबद्दल आपण प्रथम विचार करूं. कायद्यानें कितीही प्रतिबंध केला तरी ही चाल

कानू झाल्यामुळें त्या चाली बंद पडत चालल्या आहेत; व तसें होणें वाजवी आहे. आपल्यावर अपकार करणारास जर कायद्यानें शासन होऊं लागलें आहे, तर स्वतः त्याचा सूड उगविण्याचें प्रयोजनच उरत नाहीं. यापुढें आतां आपल्या पतीवर अपकार करणारांचा सूड स्त्रियांनीं उगविल्याच्या गोष्टी आपणांस ऐकूं येणार नाहींत. नीति व न्याय यांच्याविरुद्ध आचरण करणारांस शिक्षा करण्याचें काम आतां व्यक्तीकडे राहिलें नाहीं, त्याचा भार पुढें कायदेकानू यांनीं उचलिला आहे. असें आहे तरी देखील अजून कधीं कधीं आत्मघाताच्या व खाजगी रीतीनें सूड उगविल्याच्या गोष्टी जपानांत ऐकूं येतात. परंतु कायद्याचा प्रतिबंध झाल्यामुळें असले प्रकार हळू हळू नाहींसे होत जाणार आहेत. मग आतां प्रश्न असा उरतो कीं ज्या चाली यापुढें कायद्यानें बंद करण्यांत आल्या आहेत त्यांबद्दल इतकी वाटाघाट कशास पाहिजे? असें त्या चालींत आतां महत्व काय उरलें आहे? त्या चालींत अजून देखील पुष्कळ महत्व आहे. जुन्या कथा जाणण्याची जी मनुष्याला इच्छा असते ती तृप्त होते हें तर आहेच, पण याशिवाय ज्या शिक्षणाच्या योगानें जपानी लोकांना सद्यःस्थिति प्राप्त झाली आहे त्या शिक्षणाचें धोरण कशा प्रकारचें होतें हें असल्या विवेचनावरून आपणांस समजणार आहे. याच कारणासाठीं ह्या चाली हल्लीं जरी बंद पडल्या असल्या, तरी त्यांचें थोडक्यांत विवेचन करण्याचा माझा विचार आहे.

आत्मघात करण्याच्या चालीबद्दल आपण प्रथम विचार करूं. कायद्यानें कितीही प्रतिबंध केला तरी ही चाल

सर्वांशीं बंद होणें शक्य वाटत नाहीं. उलटपक्षीं आत्मघात करण्याची प्रवृत्ति सर्व जगभर पसरत आहे. थोडक्या वेळांत व फारसा त्रास न पडतां आत्मघात करण्याच्या नवीन नवीन युक्त्या निघत आहेत. आत्मघात करून घेणाऱ्याच्या मनाच्या स्थितीवरून आत्मघाताचे आपण दोन प्रकार कल्पूं. एक रागाच्या आवेशांत, वेडाच्या भरांत किंवा दुःखाच्या असह्य वेदनांमुळें होत असलेला आत्मघात, आणि दुसरा जाणूनबुजून, कीर्तीला बट्टा लावून घेण्यापेक्षां जीव देणें बरें असा शांतपणें विचार करून जो आत्मघात करावयाचा तो. पहिल्या प्रकाराला जपानी जवानमर्द क्षुद्र लेखीत. राग, वेड, किंवा दुःख यांचा वेग सहन न होऊन आत्मघात करणें हें भित्रेपणाचें काम होय. जपानी तरुणांच्या हातून तसलें काम कधीं झालें नाहीं. असें करणें त्यांच्या शीलाच्या विरुद्ध होतें. जपानी जवानमर्दांच्या वर्तनाचे जे कांहीं नियम ठरल्यासारखे झाले होते त्यांच्याविरुद्ध असला आत्मघात होय. आपल्यावर कितीही संकटें येऊन पडोत, दुःखाचे डोंगर आपणावर कोसळोत, त्या सर्वांना शांतपणें पाठ देऊन त्यांतून आपण आपल्या कल्याणाचा मार्ग काढिला पाहिजे, अशा प्रकारचें ज्या तरुणांना शिक्षण मिळत असे, त्यांच्या हातून संकटांना गांगरून गेल्यामुळें आत्मघात कधीं व्हावयाचा नाहीं. लढाईच्या प्रसंगीं कांहीं काळ सारखें अपयश येत असलेलें पाहून जपानी तरुण कचरत

---

१. सन १८९० पासून तों सन १८९४ पर्यंत जपानांत आत्महत्या केलेल्यांचे आंकडे मिळाले आहेत त्यावरून दरसाल जपानांत ४६०६ पुरुष व ३००० बायका आत्महत्या करितात असें दिसतें.
Chamber's Encyclopædia, Vol. VI p. 286.

नसे. डोंगरांतून, दऱ्यांतून भूक, तान्ह यांनीं व्याकुळ होऊन पळ काढावा लागला तरी तो धीर सोडीत नसे. अजून आपली वेळ येईल, अजून आपले लोक एकत्र होतील, ईश्वरानें माझी बुद्धि शाबूत ठेवावी, अजून मी या संकटांतून मार्ग काढीन अशी त्याला उमेद वाटे. त्याच्या धैर्याचें थोडक्यांत वर्णन करावयाचें ह्मणजे मुद्राराक्षस नाटकांतील चाणक्या-प्रमाणें त्याला वाटे कीं:—

ये याताः किमपि प्रधार्य हृदये पूर्वं गता एव ते
ये तिष्ठन्ति भवन्तु तेपि गमने कामं प्रकामोद्यमाः ।
एका केवलमेव साधनविधौ सेनाशतेभ्योधिका
नन्दोन्मूलनदृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तु मा गान्मम ॥

कितीही दुर्घट प्रसंग आला तरी जपानी जवानमर्द धीर सोडीत नसत. कारण मेनशीअसनें त्यांना शिकवून ठेविलें होतें कीं, "एकाद्या मनुष्याचें किंवा राष्ट्राचें कल्याण करण्याचा ज्या वेळीं ईश्वराचा संकेत असतो त्यावेळीं प्रथम त्या मनु-ष्याची किंवा राष्ट्राची परीक्षा पाहण्यासाठीं त्यावर तो संकटें पाठवीत असतो. दारिद्र्य, रोग, दुष्काळ इत्यादि संकटांखालीं तो किंवा तें राष्ट्र कचरतें कीं काय याची ईश्वर प्रथम परीक्षा पाहत असतो. अंगीं अचाट धैर्य येण्याचे हे उपायच आहेत." इतक्यांतूनही त्या मनुष्यानें किंवा राष्ट्रानें मोठ्या नेटानें आपला मार्ग काढला ह्मणजे समजावें कीं त्याच्या अभ्युदयाचे दिवस जवळ आले आहेत. परंतु त्या संकटांमुळें भेदरून जाऊन, हताश होऊन, कांहीं हालचाल न करितां तो नुसता हातपाय पसरून पडला ह्मणजे मग ईश्वरही त्याच्याकडे दुर्लक्ष करितो. ईश्वर जें जें कांहीं करीत आहे तें तें आपल्या कल्याण्यासाठींच असतें, आपण अदूरदृष्टी

असल्यामुळें तें कल्याण कसें व्हावयाचें हें आपणांस दिसत नाहीं इतकेंच काय तें, असा ईश्वरावर दृढ विश्वास ठेऊन तो जसे दिवस दाखवील त्यांतच समाधानानें ईश्वराच्या इच्छेनुरूप वर्तन करणें व आपला प्रयत्न न सोडणें यांतच मनुष्याचें अखेर हित असतें. असा प्रयत्न करीत असतां मरण आलें तरी हरकत नाहीं, परंतु संकटापुढें टिकाव न लागून आपण होऊन मरणाला प्रवृत्त होणें हा भित्रेपणा होय! सर टामस ब्रौन या इंग्रजी ग्रंथकर्त्यानें एके ठिकाणीं अगदीं हुबेहुब असाच अभिप्राय प्रगट केला आहे. तो ह्मणतो, देशकार्य करीत असतां, "मरणाला तुच्छ लेखणें हें शूर पुरुषाचें लक्षण होय; परंतु जेव्हां मरणापेक्षां जगण्यांतच हालअपेष्टा जास्त असतात अशा वेळीं जीवावर उदार न होतां जगणें यांत खरें धैर्य आहे."

हाराकिरी ह्मणजे स्वतःचें बलिदान करणें होय. हें बलिदान करण्याचा जपानांत विशिष्ट प्रकार असे. पोटांत शस्त्र खुपसून आंतडी बाहेर काढण्यास हाराकिरी ह्मणत. आपण होऊन आंतडी बाहेर काढणें ह्मणजे किती अघोर कर्म हें, असें आपल्यासारख्या तिऱ्हाइतांना वाटणें साहजिक आहे! परंतु जपानांत हाराकिरीचा प्रकार एकवार सार्वत्रिक असल्यामुळें त्यांत त्यांना अघोर असें कांहींच वाटत नाहीं. उलट हाराकिरीची त्यांना आठवण झाली ह्मणजे त्यांच्या मनांत धैर्य, निष्ठा, प्रेम यांची कल्पना उभी राहते, कारण त्यांच्यामध्यें हाराकिरीचे जे प्रकार घडत ते नवराबायकोच्या भांडणावरून होत नसत, तर देशकार्याचे कामीं अपकीर्ति संपादन करून जगण्यापेक्षां मरण बरें असें वाटून ते हाराकिरी करण्यास प्रवृत्त होत. हाराकिरी करितांना वाटेल

त्या रीतीनें आपल्या स्वतःचा प्राणघात न करितां पोटच फाडून बलिदान करण्याचें कारण आहे. शारीरिक शास्त्राबद्दल पूर्वी ज्या कल्पना असत त्यावरून "प्रेम आणि आत्मा" यांचें स्थान पोटांत आहे असें मानण्यांत येत असे. ही कल्पना फक्त जपानी लोकांचीच होती* असें नाहीं, तर इतर राष्ट्रांतील लोकांची देखील अशीच कल्पना असली पाहिजे अशाबद्दल दाखले आहेत; परंतु त्याच्याशीं या ठिकाणीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. आपल्यांत देखील एकवार हाच समज असावा असें वाटतें. "त्याच्या पोटांत दया माया नाहीं" असें आपण ह्मणतों, यावरून दयेचें ठिकाण पोटांत आहे, असाच अर्थ ध्वनित होतो.

कोणत्याही कारणामुळें कां होईना, आत्मघात करण्याची जपानांत जी चाल असे तिचें मी सर्वस्वी समर्थन करितों असें कोणीं समजूं नये. परंतु आत्मघात करण्यांत देखील जपानी लोकांची अब्रूची चाड व इंद्रियदमन करण्याची शक्ति जी दिसून येते त्याबद्दल आपल्याला कौतुक वाटणें साहजिक आहे. "मान आणि सत्ता" हीं नाहींशीं झाल्यावरही जगावेंसें वाटणारीं माणसें कसलीं? ज्याला जगांत मान नाहीं असा मनुष्य अथवा देश आत्मघात करून मेला तर बिचारा सुटला ह्मणावयाचा! परंतु कितीही हीन, दीन स्थिति प्राप्त होऊन ज्याला निर्लज्जपणें जगावेंसें वाटतें त्याची गणना पशुकोटींतच केली पाहिजे. जगांत कोठें मान उरला नाहीं ह्मणजे नैसर्गिक रीतीनें मरण येईपर्यंत वाट

---

* "When honour is lost, 'tis a relief to die;
Death is but a sure retreat from infamy."
GARTH.

पाहण्यास जपानी जवानमर्दांना अवकाश नसे. अशा वेळीं हाराकिरी करून आपला शेवट करून घेण्यास ते उतावीळ होत. जपानी लोकांच्या ह्या मानी स्वभावापासून पुष्कळ शिकण्यासारखें आहे. जपानांतील हाराकिरीबद्दल एक अक्षरही न काढितां जपानचें राष्ट्र मोठें कां, या विषयावर लिहिलेला निबंध अपुरा होईल. केटो, ब्रूटस, पेट्रोनिअस अथवा विषाचा पेला घेऊन प्राण देणारा साक्रेटीस यांच्याबद्दल जर पाश्चात्यांना व त्यांच्या शिक्षणावरून आपल्याला कौतुक वाटतें तर तेंच कौतुक जपानी जवानमर्दांबद्दल वाटण्यास कोणता प्रत्यवाय आहे? एकाद्यानें आत्महत्या केली ह्मणजे आपल्याला अलीकडे पट्कन जी कल्पना होते ती कांहीं तरी घरगुती कलहाची अथवा कौटुंबिक संकटाची. परंतु आपली ही नेहमींची कल्पना क्षणभर बाजूस ठेऊन जपानांतील हाराकिरीचा आपण विचार केला ह्मणजे जपानी लोकांच्या मानी स्वभावाचें आपणांस कौतुक वाटल्यावांचून राहणार नाहीं. आपल्याच हातानें घात करणें यास जर आत्मघात ह्मणावयाचें असेल तर मग साक्रेटिसानें आत्मघात केला असें कां ह्मणूं नये? विषाचा पेला आपण होऊन तो प्याला! पण नव्हे, साक्रेटिसानें आत्महत्या केली असें कोणी ह्मणत नाहीं. सत्याची बाजू त्यानें सोडून दिली असती तर त्यालाही जगतां आलें असतें! परंतु आपल्या मताच्या सत्यतेसाठीं मरणाची देखील त्यानें पर्वा केली नाहीं!

'आत्महत्या' हा शब्द उच्चारितांच आपली जी कल्पना होते तसलीच कल्पना 'हाराकिरी' बद्दल करणें वाजवी होणार नाहीं ही गोष्ट वरील विवेचनावरून वाचकांच्या ल-

क्षांत येईल. हाराकिरीचा प्रकार पूर्वी कायदेशीर मानिला जात असे. हातून घडलेल्या घोर पातकांचें प्रायश्चित्त जपानी लढवय्ये हाराकिरी करून घेत. अपमानाचें परिमार्जन हाराकिरीपासून होत असे. अंतःकरणाची निष्ठा, भक्ति अगर प्रेम हाराकिरी व्यक्त करीत असे. फांशीची शिक्षा जशी हल्लींच्या कायद्यानें सांगितली आहे त्याप्रमाणें पूर्वी हाराकिरीची शिक्षा देण्यांत येत असे. हाराकिरीची शिक्षा अमलांत आणतांना एकंदर देखावा मोठा गंभीर दिसत असे. हाराकिरी करणाराला आपलें मन शांत ठेऊन एकंदर चित्तवृत्ती आंवरून धराव्या लागत. हाराकिरी करणें भूषणावह मानलें जात असल्यामुळें कित्येक वेळां अविचारी तरुणांच्या हातून अतिरेक होत असे. क्षुल्लक कारणावरून देखील हाराकिरी करण्यास ते प्रवृत्त होत. हाराकिरी करणारे नेहमींच चांगल्या वर्तनाचे असत असें नव्हे. एकीकडे नाना तऱ्हेचे ढंग करून वरून भस्माचे पट्टे ओढणारे जसे ढोंगी लोक आपल्यांत क्वचित् आढळतात तद्वत् हाराकिरी करून आपल्या दुर्वर्तनाला झांकून टाकण्याचा प्रयत्न करणारे जपानांतही कांहीं तरुण होते, परंतु अशांची संख्या अपवादात्मकच ह्मणावयाची.

हाराकिरीबद्दल आरंभीं आपला जितका प्रतिकूल ग्रह होतो, तितका तो होण्याला खरोखर कारण नाहीं हें एकंदर विवेचनावरून सिद्ध होत असेल तर हाराकिरीबद्दल वाचकांची मी यथार्थ कल्पना करून दिल्यासारखें होणार आहे. आत्मसंयमनाची पराकाष्ठा दुसऱ्या एका चालींत झाल्याचें वर ह्मटलें आहे, ती चाल

उगविण्याची होय. या चालीबद्दल फारसा विस्तार करणें नको, कारण तिचा प्रचार कोणत्याना कोणत्या तरी रूपानें सार्वत्रिक होता व आहे. सुधारलेल्या राष्ट्रांतून अजून देखील ज्या आपण द्वन्द्वयुद्धाच्या गोष्टी ऐकतों त्या ह्याच सूडबुद्धीचा परिणाम होत. ज्यांचें सारें लक्ष परमार्थाकडे लागलें आहे अशांचे ठिकाणीं सूडबुद्धि असणें कदाचित् गौणपणाचें असेल, परंतु ह्या जगांत आपण व आपल्यामागून आपल्या मुलाबाळांनीं जगावें अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांचा असल्या जागृतीपासून फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं. ऐहिक जीवनकलहांत एकादें विशिष्ट राष्ट्र जीवंत राहील का नाश पावेल असा मला जर कोणीं प्रश्न केला तर मी उलट असा सवाल करीन कीं त्या राष्ट्रांतील लोकांत सूडबुद्धि कितपत वास करीत आहे, तें मला सांगा ह्मणजे मी आपल्या प्रश्नाचें उत्तर देईन. दुसऱ्यानें आपल्यावर अपकार केल्याचें पाहून ज्या राष्ट्राच्या अंगाचा दाह झाला नाहीं असें राष्ट्र मोठेपणा पावल्याचें जगाच्या इतिहासांत कोठें उदाहरण आहे? "दिधलें दुःख परानें उसनें फेडूं नयेचि सोसावें" ह्या तत्वाचा अंगीकार करून कधीं कोणाचें भागलें आहे? "एका गालांत मारली असतां दुसरा गाल पुढें करावा" ह्या खिस्ताच्या उपदेशानुरूप दुनियेंतील कोणतें खिस्ती राष्ट्र आचरण ठेवीत आहे? अपकाराची फेड उपकारानें करावी असा उपदेश जपानांत काय व आमच्या देशांत काय पुष्कळ साधुसंतांनीं केला आहे, परंतु

देवद्रोही नितुके कुत्ते, मारूनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते, यदर्थीं संशय नाहीं ॥

असा न्याय शिकवून "पूर्वज हांसती" अशी भीति घालणारे **श्री रामदास स्वामी** जसे आपल्या इकडे एकटेच होऊन गेले तद्वत् जपानांत देखील "जशास तशाचा" धडा शिकविणारा एकटा **कनफ्युशी**असच होता! जगांत अतिशय सुंदर गोष्ट कोणती असा **ओसिरिसनें** प्रश्न विचारल्यावर "आईबापांवर अपकार करणाराचा सूड उगविणेंही होय" असें **होरसनें** उत्तर दिल्याचें आपण वाचतों. त्या उत्तरांत जपानीलोक आईबापांच्याबरोबर आपल्या "राजाचें" नांव व इंग्रज लोक "देशाचें" नांव घालून सुधारणा करतील. आह्मांला पहिलेंच उत्तर सुचणार नाहीं, तर आह्मी त्यांत आणखी सुधारणा ती कोठून करणार? सूड उगविण्यांत देखील कांहींसा न्याय होत असतो. सूड उगविणारा आपल्या मनाशीं विचार करीत असतो व सूड उगविणें न्यायाचें आहे असें ठरल्यावरच तो आपलें इष्ट कार्य करण्यास पुढें सरसावतो. तो आपल्याशीं ह्मणतो, "माझ्या वडिलाचा त्या दुष्टानें खून करावा काय? ज्यानें असलें घोर कृत्य केलें त्यानें मोठेंच पातक केलें आहे. पाप करणें ईश्वराच्या घरीं रुजू नाहीं. माझ्या बापाला, तो जीवंत असता तर, असलें कृत्य करणें कधीं आवडलें नसतें. असलें पाप करणारास त्याच्या कर्माबद्दल पूर्ण प्रायश्चित्त मिळालें पाहिजे अशीच परमेश्वराची व माझ्या बापाची इच्छा असणार. त्यांची इच्छा तृप्त करणें मला भाग आहे. माझ्या बापाचा खून करण्यास ज्याचा हात पुढें सरसावला त्याचें डोकें, मी जर आपल्या आईबापांच्या पोटचा आहें

तर, माझ्या हातानें घडापासून वेगळें झालेंच पाहिजे. मी जर असें न करीन तर ईश्वराचे घरीं मला थारा मिळणार नाहीं." वरील तर्कवाद साधा व पोरकट आहे पण त्यांत पापभीरूपणा, न्याय, वडिलांबद्दल सन्मानबुद्धि व ईश्वरावर निष्ठा हीं स्पष्ट दिसून येत आहेत. समीकरणाचीं उदाहरणें करितांनां दोन्ही बाजूंच्या रकमा जशा बरोबर असाव्या लागतात तद्वत् वरील न्याय आहे. डोक्याला डोकें घेतल्या-वांचून न्याय बरोबर झाला असें ह्मणतां यावयाचें नाहीं.

सूडबुद्धि सर्वांत असूं शकेल, पण सूड उगविण्याचें सर्वांनाच साधतें असें मात्र नाहीं. अपकार करणारा बलवान् असला ह्मणजे दुर्बलाला मूग गिळून रहाणेंच भाग पडतें. आपले दिवस येण्याची तो वाट पहात असतो. "ईश्वरा, तुझ्या घरीं कसा मुळींच न्याय नाहीं." अशी तो ईश्वराची करुणा भाकीत असतो. "देवा, दुष्टांचा संहार करण्यासाठीं व सुष्टांचें संरक्षण करण्यासाठीं मी अवतार घेईन असें जें तूं आह्मांस वचन दिलें आहेस तें तूं केव्हां पाळणार, आमचा अंत किती पाहणार, आह्मी अपमान कोठवर सोसावे, आमचे आणखी कोणते हाल होण्याचे राहिले आहेत" अशा रीतीनें तो रात्रंदिवस देवाला आळ-वीत असतो. ह्या जगांत कोठें न्याय मिळेनासा झाला ह्मणजे मग मनुष्याला ईश्वराची आठवण होऊन त्यापाशीं तो न्याय मागत असतो. न्याय मागणारांचे असे पुष्कळ अर्ज देवाच्या दरबारीं येऊन पडले ह्मणजे त्याला त्या अर्जांना उत्तर देणें अखेरीस भाग पडतें, आणि ते अर्ज सप्रमाण, मुद्देसूद, परमेश्वरनिष्ठापूर्वक लिहिले असल्यामुळें देवाला अर्जदारांचें मागणें कबूल करावें लागतें. मात्र ऐहिक राजे

ज्याप्रमाणें एकव्या दुकव्याच्या अर्जाचा विचार करीत नाहींत त्याचप्रमाणें परमेश्वर देखील एकव्यादुकव्यानें धांवा केल्यास धांवून येत नाहीं. सरकारच्या कोर्टांत न्याय मिळेनासा झाला ह्मणजे जपानी जवानमर्द आपली फिर्याद सूडबुद्धीकडे नेतात. जपानांत जे ४७ रोनिन होऊन गेले त्यांच्या पुढाऱ्याला फांशीं दिल्यावर त्या एकनिष्ठ अनुयायांनीं त्यांना खुलें असें फक्त एकच सूडबुद्धीचें दरबार होतें तिकडे दाद मागितली. तिकडे त्यांची दाद लागली पण त्यांना स्वतःला फांशीं जावें लागलें! सरकारच्या न्यायमंदिरांत जरी त्यांना गुन्हेगार ठरविण्यांत आलें तरी सामान्य लोकांच्या दृष्टीला ते गुन्हेगार वाटले नाहींत. आपल्या पुढाऱ्याचा शिरच्छेद करणारांचा त्याच्या अनुयायांनीं योग्य सूड उगविलेला पाहून सामान्य लोकांना त्यांची सहानुभूति वाटून राजरोस जरी नाहीं, तरी प्रत्येकानें अंतःकरणपूर्वक परमेश्वरापाशीं त्यांच्या कल्याणासाठीं प्रार्थना केली, आणि ह्मणूनच त्या ४७ रोनिनांची आठवण अजून लोकांना अगदीं ताजी आहे.

सूड उगविण्याकडे जपानी तरुणांचा नैसर्गिक ओढा असे, परंतु त्यांत एक महत्वाची गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. तिच्यावांचून जपानी तरुणांच्या सूडबुद्धीचें स्वरूप वाचकांना दिसावें तितकें मनोहर दिसणार नाहीं. सूड उगविणें जपानी तरुणांना रास्त वाटे, पण वाटेल त्यावर केलेल्या अपकाराचा सूड उगविणें भूषणावह मानलें जात नसे. स्वतःवर अगर नोकर चाकर माणसांवर अथवा आपल्यापेक्षां कमी योग्यतेच्या माणसावर कोणीं अपकार केला तर त्याचा सूड उगवून प्रतिकार करणें जपानांत

थोरपणाचें मानलें जात नसे. स्वतःवर अगर स्वतःच्या बायकापोरांवर कोणीं अपकार केला तर तो सहन करण्यांतच जपानांत मोठेपणा मानीत. आपल्याहून जे श्रेष्ठ असतील, जे वरिष्ठ असतील, त्यांच्याबद्दलच सूड उगवावा अशी जपानी लोकांची समजूत होती. आपल्या देशावर अपकार करणारांचा सूड उगविण्याचा जर कोणीं प्रयत्न केला तर त्याबद्दल जपानी लोकांना पूर्ण सहानुभूति वाटे, याचें कारण तरी त्यांची वरील समजूत हीच होय.

जपानी तरुणांच्या एकंदर वर्तनावरून व विशेषतः वर ज्या दोन विषयांचा ह्मणजे "आत्महत्या व सूड" यांचा विचार झाला आहे त्यावरून वाचकांस समजण्यास फारसें कठिण पडणार नाहीं कीं जपानी तरुणांच्या एकंदर आयुष्यक्रमांत त्यांना तलवारीशीं प्रसंग फार पडत असे. जपानी तरुणांना

## तलवार जीव कीं प्राण

वाटत असे. ज्याच्या हातीं तलवार त्याच्या हातीं सत्ता हा न्याय जपानीलोक जाणून होते. आपल्या इकडे मुलगा पांच वर्षांचा झाला ह्मणजे खेळण्यासाठीं कां होईना पण ज्याप्रमाणें बाप त्याला पाटी आणि दगडी लेखणी घेऊन देतो तद्वत् पांच वर्षांच्या जपानी पोराच्या हातीं बोथट पण खरीखुरी तलवार पडते. पाटीवर रेघा ओढण्यास आपला मुलगा जसा इकडे शिकूं लागतो तसा तिकडे तो तलवार वापरण्यास शिकतो. सात वर्षांचें आपलें मूल बगलेंत एक फाटकेंसें दप्तर व त्यांत एकादें फाटकें पुस्तक व कांहीं रद्दी कागद घेऊन जसें बाहेर पडतें तसें तिकडचें मूल कमरेला तलवार लटकविल्यावांचून घराचा उंबरठा ओलां-

डित नाहीं. सरासरी मुलगा पंधरा वर्षांचा झाला ह्मणजे बोथट धारेची तलवार टाकून पाणी दिलेली तलवार तो वापरूं लागतो, आणि मग रिकाम्या न्हाव्याप्रमाणें ती तलवार झाडावर काय आणि दगडावर काय सारखी चालवूं लागतो. आपल्या हातीं तीक्ष्ण धारेचें शस्त्र आहे याचें त्याला भूषण वाटत असतें. अंगांत शिपायाचा काळा डगला चढविल्याबरोबर एकादा फाटका मनुष्य देखील मग छाती वर काढून चालूं लागतो, तद्वत् हातीं शस्त्र बाळगणाऱ्या जपानी जवानमर्दाच्या ठिकाणीं साहजिकपणें ताठा उत्पन्न होऊन आपल्यावर मोठी थोरली जबाबदारी येऊन पडल्यासारखें त्याला वाटूं लागतें. त्याच्या हातांत तलवार असते पण ती तलवार त्याच्या मनांत स्वराजनिष्ठा आणि अब्रूची चाड उत्पन्न करिते. हातांतल्या तलवारीचा मनाशीं काय संबंध आहे किंवा हातांत नुसती तलवार पडतांच स्वराजनिष्ठादि मनोविकार कसे जागृत होतात वगैरे प्रकार आह्मां निःशस्त्र लोकांना काय समजणार आहेत ? पण असें होत असेल खास असें अनुमान काढण्यास आपल्याला आधार आहे. हातांत नुसती वेताची छडी पडली तर मुलगा आपण स्वतः पंतोजीचा आव घालून मारून खांबावर सपासपा ओढीत सुटतो हें जर आपण पाहतों आणि अनुभवतों तर शस्त्रें बाळगणारांच्या मनाची स्थिति वर दिल्याप्रमाणें होत असेल याबद्दल शंका घ्यावयास नको. एक तलवार पुरेशी नाहीं वाटूनच कीं काय कोण जाणे पण पुढें पुढें एकीच्या जागीं दोन तलवारी होतात; त्यांपैकीं एक मोठी व दुसरी लहान असावयाची. आपल्या इकडे देशभक्त ओळखण्याची खूण जशी त्याच्या हातां-

तली बारिक छडी तद्वत् जपानी जवानमर्दाची खूण त्याच्या तलवारीवरून पटे. तो घरीं असला तर अभ्यासाच्या खोलींत किंवा दिवाणखान्यांत प्रमुख ठिकाणीं त्या तलवारी शोभायमान झालेल्या असतात; रात्रींच्या त्या त्याच्या उशाशीं पहारा करितात. सारांश, तलवार ही जपानी जवानाची खरी सहचारिणी असते. तिच्यापासून तो दूर कधीं सांपडावयाचा नाहीं. नेहमींच्या सहवासामुळें त्याचें तिच्यावर प्रेमही तसेंच जडलेलें असतें. तीही त्याच्या इतकी उपयोगीं पडते कीं त्याच्या मनांत स्वाभाविकपणें तिच्याविषयीं पूज्यभाव उत्पन्न होतो, व तो तिची पूजा करूं लागतो. जुन्या तलवारी मोठ्या प्रेमानें, कौतुकानें, व अभिमानानें जपानी जवानमर्द संभाळून ठेवितात व त्यांना पूज्यस्थानीं ठेऊन त्यांची पूजा करितात. हत्यार, मग तें किती का हलकें असेना, त्याबद्दल त्यांच्या मनांत योग्य पूज्यभाव वसत असतो. आपल्या हत्याराचा कोणीं उपमर्द केला तर तो प्रत्यक्ष आपलाच उपमर्द झाला असें त्यांना वाटतें. निष्काळजीनें हत्यार ओलांडणें ते महत्पाप समजतात. वरील हकीकतीवरून आपल्या इकडेही एकवार हत्याराचें इतकेंच महत्व होतें याची वाचकांस आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. हत्याराचें आपल्यासही एकवार इतकें महत्व होतें याची आह्मां निःशस्त्र लोकांना साक्ष पटावी ह्मणून अजून आमच्यांत कांहीं चालीरीती अवशिष्ट राहिल्या आहेत. मूल जन्मास आल्यावर त्याच्या पांचव्या आणि सहाव्या दिवशीं हत्याराची पूजा करण्याची चाल आमच्यांत आहे. जन्मास आलेल्या त्या मुलाचें सारें आयुष्य त्याच हत्याराबरोबर जावयाचें असतें असेंच ही चाल सूचित करीत नाहीं

काय ? मुलाला तें शस्त्र पुढें यशदायक होवो ह्मणूनच बाप त्या शस्त्राची पूजा करीत नाहीं काय ? तलवार ही जशी जपानी जवानमर्दाची सहचारिणी होती तशीच ती एकवेळ जवानमर्द मराठेभाईची होती, परंतु आमच्या दुर्दैवानें आमचा काळ बदलला जाऊन आमच्या हातांतली तलवार सुटून तिच्या जागीं पुस्तक आलें आणि खरेंखुरें शस्त्र आमच्या प्रभूनें आह्मांजवळ न ठेविल्यामुळें विळा, कोयता, अगर तोही नसला तर चाकू, कातरी यांची पूजा आमच्या पांचवी सहावीला करण्याचा आह्मांवर प्रसंग आला आहे! जपानी जवानमर्दाला मात्र ईश्वराच्या कृपेनें त्याच्या सहचारिणीचा वियोग अजून घडला नाहीं, व त्यांचें परस्परांवरील प्रेम आज तागाईत कायम आहे.

प्रेमाची वस्तु ह्मटली ह्मणजे तिला नटविण्याकडे मनुष्याचें लक्ष साहजिक लागतें. कामकाज संपून वेळ सांपडला ह्मणजे मनुष्य जसा आपल्या प्रेमाच्या वस्तूकडे वळतो तद्वत् राष्ट्राचें लक्ष शांततेच्या काळीं आपल्या प्रिय वस्तूकडे लागतें. त्याप्रमाणें तलवारीला नाना प्रकारांनीं सजविण्याकडे जपानी राष्ट्राचें हल्लीं लक्ष लागलेलें आहे, परंतु जपानी जवानमर्दानें आपल्या तलवारीला कितीही नटविलें तरी प्रसंगीं तिच्या धारेचाच उपयोग करावयाचा असतो आणि ह्मणून तलवारीची धार पाहून, तिचें पाणी व लवचिकपणा पाहून त्याच्या मनाला जितका आनंद होतो तितका आनंद बाह्य भूषणांचा होत नाहीं. आमच्या इकडे ज्या कांहीं नामधारी राजांजवळ तलवारी राहिल्या आहेत त्यांना त्यांच्या धारेशीं कांहींच करावयाचें नसतें, त्यामुळें त्यांचें सारें लक्ष बाह्य भूषणांनींच वेधलेलें असतें; व आतां प्राचीन

हत्यारांवर त्यांचें प्रेम किती राहिलें आहे हें प्रत्यक्ष **श्रीशिवाजी महाराजांची** पराक्रमी **भवानी** तलवार **इंग्लंडांत** जाऊन राहिली आहे यावरून दिसतच आहे.

आमच्या इकडे ज्या कोणापाशीं तलवारी शिल्लक राहिल्या आहेत त्या जशा केवळ शोभेचे पदार्थ होऊन बसल्या आहेत तशासारखा प्रकार जपानांत झाला नाहीं हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळें हातांत शस्त्र असलें आणि त्याचा उपयोग करण्याची मुभा असली ह्मणजे त्याचा दुरुपयोग होण्याची भीति असते. आणि मग हा दुरुपयोग कोणाच्या मानेवर होईल याचा कांहींच नेम राहत नाहीं. तलवारीला पाणी कितपत आहे हें पाहण्यासाठीं सहज ती रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या कुत्र्याच्या मानेवर पडावयाची, परंतु हत्याराचा असा दुरुपयोग जपानी जवानमर्दांच्या हातून सहसा होत नसे. हत्याराचा योग्य उपयोग करण्यास जें आत्मसंयमन लागतें तेंच त्याचा दुरुपयोग टाळण्यास आवश्यक असतें. प्रसंग नसतां निरपराधी प्राण्यावर तलवार चालविणें भागुबाईपणाचें काम आहे असें जपानी जवानमर्द मानीत. हत्याराचा योग्य उपयोग करण्याचे प्रसंग वारंवार येत नसतात व ते जेव्हां येतात तेव्हां शहाणा मनुष्य ते वायां जाऊं देत नाहीं. जे खरे धीर, गंभीर, उदात्त लोक असतात त्यांच्या हातांत शस्त्र असलें तरी त्याचा दुरुपयोग होण्याची भीति नसते. निरपराधी प्राण्याच्या रक्तानें ते आपलें हत्यार कधींही विटाळीत नाहींत. "आपल्या शांत वृत्तीनें दुसऱ्याला लाजवून त्याला वठणीस आणितां येतें." "रक्तपाताशिवाय मिळालेला विजय तोच खरा विजय होय." वगैरे जपानी जवानमर्दांत ज्या ह्मणी प्रचलित आहेत त्यांवरून त्यांची

शांतताप्रीति व्यक्त होत आहे. तरी पण इतकी गोष्ट खरी कीं जपानी जवानमर्द जितके शांतताप्रिय आहेत, तितकीच प्रीति प्रसंग पडला ह्मणजे लढायांविषयीं त्यांच्यांत आढळते. जपानच्या इतिहासांत एक काळ तर असा येऊन गेला कीं नायकांच्या ठिकाणीं देखील वीरश्रीचा संचार झाला होता. या ठिकाणीं

## स्त्रियांची योग्यता

व त्यांना मिळणारें शिक्षण या विषयाकडे वळणें अप्रासंगिक होणार नाहीं. जगांत असे कित्येक पदार्थ असतात कीं त्यांची यथार्थ कल्पना होण्यास फार कठिण जातें. एकच पदार्थ पण तो निरनिराळ्या लोकांना निरनिराळ्या प्रकारचा भासत असतो. स्त्रीजाति ह्याच वर्गांतील होय असें ह्मणण्यास हरकत नाहीं; कारण ह्या स्त्रियांची कल्पना अगदीं बरोबर अशी कोणाला झाली आहे? कोणाला त्यांचे ठिकाणीं "अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता। अशौचं निर्दयत्वं च स्त्रीणां दोषाः स्वभावजाः" ॥ वगैरे दोष दिसतात तर कित्येकांनीं "न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते। गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते" ॥ अशा प्रकारें स्त्रियांना गौरविलेलें आढळतें. ह्मणजे सारांश काय कीं स्त्रियांची खरी योग्यता दोन्ही प्रकारच्या लोकांना कळलेली नसते. यांत पुरुषांचा फारसा दोष नाहीं. स्त्रियांचीं मनें नैसर्गिकच इतकीं खोल असतात कीं सामान्यपणें वरवर विचार करणारांचा त्यांच्या विषयींचा तर्क हटकून चुकलाच पाहिजे. चीन देशांत तर असा समज आहे कीं ब्रह्म जसें जवळ जवळ अज्ञेय आहे त्याचप्रमाणें स्त्रिया देखील अज्ञेय आहेत. जपानांत मात्र स्त्रियांच्या संबंधानें ज्या कांहीं कल्पना रूढ आहेत त्यांवरून चीन देशाप्रमाणें जपानांत स्त्रियांना

अज्ञेय समजण्यांत आलें होतें असें दिसत नाहीं. जपानांत पुरुषांबरोबर स्त्रियांच्या अंगीं देखील वीरश्रीचा संचार होऊं लागला होता असें मी जें वर ह्मटलें आहे तो सामान्य नियम नव्हे. स्त्रियांनीं हातांत केरसुणी घेणें हाच जपानांत काय आणि चिनांत काय सामान्य नियम होता. त्यांनीं हातांत तलवारी वागविल्या त्या अपवादादाखल होत. घरगुती कामकाजांत स्त्रियांनीं दक्ष असावें हेंच जपानांतील स्त्रीशिक्षणाचें मुख्य अंग होतें. स्त्रियांच्या अंगीं वीरश्रीचा संचार होत होता असें मी ह्मणतों आणि घरगुती कामाकाजांत दक्ष असणें हेंच त्यांच्या स्त्रीशिक्षणाचें मुख्य धोरण होतें असेंही मीच ह्मणतों तेव्हां या परस्परविरुद्ध विचारांचा मेळ कसा बसवावा असा वाचकांस साहजिक प्रश्न उत्पन्न होईल. परंतु वरील दोन्ही विधानें यथार्थ आहेत हें थोड्याशा विचारांतीं वाचकांस आढळून येईल.

जपानांत पुरुषांना पूर्वी जें शिक्षण मिळत असे त्याचा मुख्य हेतु त्यांना स्वदेशाचे आधारस्तंभ बनविण्याचा असल्यामुळें त्यांचे ठायीं ज्या गुणांचा विकास होई त्यांचा कांहींना कांहीं तरी अप्रत्यक्ष परिणाम स्त्रियांवरही घडत असे. एकाद्या स्त्रीनें हातीं तलवार घेऊन पुरुषांना लाज वाटावी अशीं अचाट शौर्याचीं कामें केलीं तर जपानांतील जवानमर्द त्या स्त्रीचे मोठ्या आनंदानें पोवाडे गात. अचाट शौर्याबद्दल स्त्रियांची तारिफ होतांच त्यांना आपल्या अंगीं पुरुषांना साजतील असे गुण असावेत असें वाटूं लागणें व त्याप्रमाणें त्यांनीं प्रयत्न सुरू करणें अगदीं स्वाभाविक होतें. शस्त्रें कशीं वापरावीं व प्रसंग पडल्यास त्यांच्या योगानें आपलें संरक्षण कसें करावें याचें शिक्षण तरुण मुलींना मिळूं लागलें.

तथापि स्त्रियांना असलें शिक्षण देण्यांत त्यांना लढायांवर पाठविण्याचा हेतु नसून त्या शिक्षणाचें धोरण दोन प्रकारचें होतें. एक व्यक्तीपुरतें व दुसरें कुटुंबापुरतें. देशांत अंदाधुंदी चालू असली ह्मणजे आपली स्वतःची अब्रू वांचविण्याची जबाबदारी पुष्कळ वेळां स्त्रियांवर येऊन पडते. स्वदेशासाठीं अथवा आपल्या राजासाठीं नवरा समरांगणीं लढत असला ह्मणजे घरीं बायकोला स्वतःच आपलें संरक्षण करावें लागे. अशा वेळीं, तिला जर शस्त्रास्त्रांचें प्राथमिक शिक्षण मिळालेलें असलें, तर तिला स्वतःचा बचाव करितां येणें शक्य आहे. जपानांत मुली वयांत आल्या ह्मणजे बहुतकरून एक लहानसा खंजीर आपल्याजवळ नेहमीं बाळगीत. कोणाही स्त्रीवर केव्हांही येऊं नये असा वाईट प्रसंग आला तर त्या खंजिराचा उपयोग दोन प्रकारांनीं त्यांना होत असे. साधल्यास तो खंजीर अबलांचा छळ करणाऱ्याच्या छातींत भोंसकला जाई; परंतु असा प्रकार क्वचित् घडत असे. अब्रू बचाविण्याचे इतर सर्व मार्ग खुंटले तर त्या खंजिराचा उपयोग जपानी स्त्रिया आपल्यावरच करून आपला प्राण देत. देशांत अंदाधुंदी चालू असली ह्मणजे असले प्रसंग स्त्रियांवर येणें साहजिक होतें. आणि ह्मणूनच ऐन वेळेवर उपयोगीं पडणारा आपला मित्र समजून जपानी स्त्रिया आपल्याजवळ खंजीर बाळगीत. अशा दुष्ट प्रसंगीं त्या शस्त्राचा प्रयोग कसा करावा हेंही त्या शिकून ठेवीत असत. हत्यारानें आत्मघात करण्याचें काम सोपें नाहीं. तें वाटेल त्याला साधण्यासारखें नसतें. स्वतःच्या मानेवर कोणत्या भागावर हत्यार चालविलें असतां हटकून प्राण जाईल याचें ज्याला ज्ञान नसतें तो बहुतकरून फसतो. मानेच्या भलत्याच

भागावर वार झाला तर धड प्राणही जात नाहीं व अब्रूचेंही रक्षण होत नाहीं. यासाठीं नेमकी कोणत्या भागावर जखम केली असतां प्राण जाईल याचें शिक्षण जपानी स्त्रियांना मिळत असे. अशा प्रसंगीं अब्रू बचावण्यासाठीं स्वतःचे दोन्ही पाय खालपासून वरपर्यंत नवारीनें गच्च बांधून टाकून स्त्रियांनीं प्राणत्याग केल्याचीं उदाहरणें जपानच्या इतिहासांत पुष्कळ आहेत. या ठिकाणीं वाचकांस एक गोष्ट सांगून ठेवणें अगत्याचें वाटतें. पातिव्रत्याची जपानी स्त्रियांना फारशी मातब्बरी वाटत नाहीं, असा पुष्कळ पाश्चात्य ख्रिस्ती लेखकांचा समज असल्याचें दिसतें; परंतु हा त्यांचा समज निखालस चुकीचा आहे हें विश्वसनीय माहितीवरून नमूद करण्यास मला आनंद वाटत आहे. जपानांतील स्नान करण्याच्या पद्धतीपासून ख्रिस्ती लेखकांचा हा गैरसमज झालेला असावा किंवा स्वतःचें नाक नकटें असलें ह्मणजे सर्वांचेंच नाक तसें आहे असें प्रतिपादन करण्याची हांव सुटते ह्मणून कदाचित् ते असलीं असत्य विधानें करीत असतील. त्यांचा हा समज कोणत्याही कारणामुळें झालेला असो, तो चुकीचा आहे इतकीच गोष्ट मुख्य आहे. अल्पस्वल्प शस्त्राचा उपयोग कसा करावा याचें जें शिक्षण जपानी स्त्रियांना मिळत असे त्यापासून त्यांच्यापुरता कसा फायदा होत होता हें वरील विवेचनावरून वाचकांचे लक्षांत येईल. या शिक्षणापासून एकंदर कुटुंबाचाही फायदा होत असे. कारण स्वतःच आईला शस्त्राचें थोडेंसें ज्ञान झालेलें असलें ह्मणजे आपल्या मुलांच्या ठिकाणीं लहानपणींच ती शस्त्रांची प्रीति उत्पन्न करिते, व भलल्या सलल्या उपायांनीं आपल्या इकडे आया मुलांना भित्रे बनविण्यास जशा कारण होतात तशा

जपानी स्त्रिया होत नाहींत. हाही फायदा कांहीं लहान-सहान नाहीं.

पुरुषांचे अंगीं जे गुण असावयाचे तेच स्त्रियांचे ठिकाणीं आणण्याविषयीं जपानांतील स्त्रीशिक्षणाचें सारें धोरण होतें असा जर वरील विवेचनावरून वाचकांचा ग्रह होत असेल तर मी केलेलें विवेचन सदोष आहे. वाचकांना तसा बोध व्हावा असा माझा हेतु नाहीं, कारण खरा प्रकार तसा नाहीं. स्त्रियांच्या ठिकाणीं शोभा आणणारे दुसरे कित्येक गुण आहेत त्यांकडेही जपानांत दुर्लक्ष होत नसे. गायन, नर्तन, आणि त्याचप्रमाणें देशांतील वाङ्मयाचें वाचन ह्याही गोष्टी जपानी स्त्रियांना शिकविण्यांत येत असत. जपानी वाङ्मयापैकीं कांहीं सुंदर काव्यांचें कर्तृत्व स्त्रियांकडे आहे. जपानच्या वाङ्मयाच्या इतिहासांत स्त्रियांचा हात बराच असल्याचें दिसून येतें. जपानांतील स्त्रियांना नर्तन आणि गायन ह्या गोष्टी शिकविण्यांत येत होत्या हें ऐकून दुसरा उद्योग न उरल्यामुळें नाना तऱ्हेचे ढंग करण्यांत प्रतिष्ठा मानणारा जो वर्ग आमच्यांत निर्माण झाला आहे त्यांना आनंद वाटेल; परंतु ह्या कला शिकविण्यांत जपानी लोकांचा हेतु काय होता तो ऐकून त्यांचा किंचित् विरस होणार आहे. गायन किंवा नर्तन ह्या कला आहेत म्हणून जपानी स्त्रियांना शिकविण्यांत येत नसत. तर त्यांच्या योगानें अंतःकरण निर्मळ, शुद्ध व प्रेमयुक्त होऊन ईश्वराला एकाग्र मनानें आळविण्यास सोपें जातें म्हणून जपानी स्त्रिया त्या कलांचा अभ्यास करीत. गाण्याच्या योगानें मन एकाग्र होतें. कारण एकाग्र मन झाल्याशिवाय सुसंगत असे आलाप निघणारच नाहींत. तरुण मुलांना शिक्षण देण्याचें

मुख्य धोरण जसें त्यांना विद्वान् बनविण्यापेक्षां नीतिमान् करण्याकडे विशेष होतें तद्वत् स्त्रियांना शिक्षण देण्याचा हेतु त्यांना घरगुती कामांत तरबेज करून त्यांचें लक्ष सन्मार्गाकडे लावावें हाच होता. गायन आणि नर्तन त्यांना शिकवीत, परंतु वरील हेतु साधण्यास आवश्यक इतपतच शिकवीत; त्यांच्या योगानें स्त्रियांच्या ठिकाणीं दंभ व फाजिलपणा यांचा उद्भव होण्याइतकें सदरहू कलांचें त्यांना शिक्षण मिळत नसे. पर्शियांतील एका राजपुत्रानें इंग्लंडांत गेल्यावर जें उत्तर दिलें होतें तसलेंच उत्तर जपानी मनुष्यानेंही दिलें असतें. इंग्रज लोकांत नाचण्याचा अतिरेक झाल्याचें वाचकांस माहीतच आहे. त्यांच्यांत मोठमोठ्या प्रसंगीं स्त्री आणि पुरुष एकत्र होऊन धांगडधिंगा घालीत असतात. असें करण्यांत त्यांना मुळींच असभ्यपणा अथवा संकोच वाटत नाहीं. कितीही दर्जाचा मनुष्य असो, असला समारंभ सहकुटुंब साजरा करण्यास तो मागें पुढें पहावयाचा नाहीं. अशा समारंभांतील मौज पाहण्यास एकदां लंडन शहरांत एक पर्शियाचा राजपुत्र गेला होता. त्याला तेथील मंडळींपैकीं एका रंगेल गृहस्थांनीं आपणही नाचण्याला यावें असा आग्रह केला. त्यावर त्या राजपुत्रानें आमच्या देशांत असलें मनोरंजनाचें काम करण्यासाठीं एक निराळाच स्त्रीवर्ग आहे असें सांगून त्यानें नाचण्याचें आभारपूर्वक नाकारलें. सारांश, जपानी स्त्रियांना जें शिक्षण देण्यांत येई तें त्यांनीं नवऱ्याच्या डोक्यावर बसण्यास शिकावें अथवा नट्टापट्टा करून चार चौघांत मिरवावें ह्मणून नव्हे. घरगुती उपयोग हेंच त्यांच्या शिक्षणाचें सारें धोरण होतें*.

* "Domesticity guided their education."
DR. INAZO NITOBE.

गृहकृत्यें आटोपण्यास आवश्यक असलेंच शिक्षण त्यांना मिळत असे. मुलांमध्यें शारीरिक शिक्षणाची आवड उत्पन्न करणें, वेडावांकडा प्रसंग आल्यास स्वतःची अब्रू वचावणें इत्यादि कृत्यें घरगुती कामांपैकींच होत आणि ह्मणून तीं उत्तम रीतीनें करितां येण्यासाठीं त्यांना हत्यारांचें थोडेंसें ज्ञानही करून देण्यांत येत असे. परंतु हत्यारांचें ज्ञान असो किंवा गायननर्तनादि कलांचा अभ्यास असो, सर्व शिक्षणाचा मुख्य हेतु स्त्रियांना गृहकृत्यें चांगल्या रीतीनें उरकतां यावीं हाच होता ही गोष्ट निर्विवाद आहे. त्यामुळें जपानांतील स्त्रिया कितीही विद्वान् झाल्या तरी त्यांची चूल कधीं सुटत नसे. आपल्या कुळाला समाजांत बट्टा लागूं नये व कोणत्याही प्रकारचा कमीपणा येऊं नये ह्मणून त्या फार जपत व तसाच प्रसंग पडला तर प्राणही खर्चीं घालण्यास त्या तयार होत. स्त्रीशिक्षणाचें हें धोरण कोणीकडे व समाज आपल्याला नांवें ठेवील तरच आपण मिळविली असला ग्रह ज्या शिक्षणापासून होतो त्याचें धोरण कोणीकडे! ज्या शिक्षणापासून स्त्रियांच्या ठिकाणीं दंभ, फाजिलपणा, अचरटपणा, वृथा अभिमान, नट्टापट्टा करून मिरविण्याची हांव, काबाडकष्ट करण्याचा कंटाळा, कुलाचारांना धाब्यावर बसविण्याची आवड हीं उत्पन्न होतात, तें कसलें शिक्षण! ज्या समाजांत अन्य समाजांतील स्त्रीपुरुषांच्या देखरेखीखालीं असल्या तऱ्हेचें शिक्षण मिळत आहे तो समाज असल्या नीच स्त्रीशिक्षणापासून उन्नत होणार आहे अशी सभांतून फुशारकी मिरविणारे निखालस फसले जात आहेत असें ह्मणण्यास हरकत वाटत नाहीं. जपानांतील स्त्रीशिक्षणापासून मुली स्वार्थत्यागाचा बोध

घेत. मुली बापासाठीं, बायका नवऱ्यांसाठीं व आया मुलांसाठीं स्वतःच्या सुखावर पाणी सोडण्यास तयार असत. अगदीं लहानपणापासून स्वार्थत्यागाचा धडा त्यांना मिळत असे. जपानांतील स्त्रिया मूर्तिमंत स्वार्थत्याग होत असा त्यांचा लौकिक आहे. आमरण स्वार्थत्याग करणें हाच जपानी स्त्रियांचा विशेष होय. स्त्रियांना आह्मी गुलामांप्रमाणें वागवितों असा पाश्चात्यांचा आह्मांवरच तेवढा आरोप आहे असें नाहीं, तर जपानी लोकांवरही ते केव्हां केव्हां हाच आरोप करितात. पाश्चात्यांना आमच्या चालीरीतींचें ज्ञान नसतें ह्मणूनच ते असले आरोप आणीत असतात. जपानी स्त्रियांच्या अंगचा स्वार्थत्याग पाहून ही गुलामगिरी आहे असें पाश्चात्यांना वाटणें साहजिक आहे; परंतु आमच्यापैकींही कित्येक शहाण्यांना जेव्हां तसेंच वाटतें, तेव्हां पाश्चात्यांनाच तेवढें कां हंसावें ! हा आरोप सर्वथैव मिथ्या आहे. तो अज्ञानमूलक आहे. स्वतःच्या सुखदुःखाकडे न पाहतां बायको नवऱ्याची सेवा करिते एवढ्यावरून तिला गुलाम ह्मणावयाचें काय? स्वतःच्या इच्छेकडे न पाहतां दुसऱ्याच्या उपयोगीं पडणें याचा अर्थ जर गुलामगिरी असेल तर जपानी स्त्रिया आणि आमच्या स्त्रिया गुलाम आहेत असें पाश्चात्यांनीं खुशाल ह्मणावें. आमच्या दृष्टीला यांत औदार्यच दिसतें. असली गुलामगिरी फक्त स्त्रियांनींच पतकरली आहे असें नाहीं. **श्रीछत्रपति शिवाजी** महाराजही गुलामच होते, कारण स्वतःच्या सुखदुःखाची पर्वा न करितां त्यांनीं देशसेवा केली! स्वतःच्या सुखदुःखाबद्दल बेफिकीर राहून दुसऱ्याचें कल्याण करण्याबद्दल मनुष्य जेव्हां प्रेमामुळें किंवा भक्तीमुळें उन्मुक होतो तेव्हां त्याला

गुलाम ह्मणणाऱ्या पाश्चात्यांची कल्पना कांहीं विचित्र असली पाहिजे!

आपल्या देशासाठीं व राजासाठीं मनुष्यानें मोठ्या आनंदानें सर्वस्वावर पाणी सोडण्यांत जितकें भूषण आहे तितकेंच भूषण स्त्रीनें आपल्या घरासाठीं व घरांतील माणसांसाठीं स्वतःच्या सुखावर पाणी सोडण्यांत आहे. एकंदर जीवितयात्रा हें एक प्रकारचें कोडें आहे. स्वार्थत्यागाच्या किल्लीशिवाय तें कोणास उकलतां येणार नाहीं, मग त्या यात्रेचा हेतु ईश्वर साध्य करण्याचा असो, देशसेवा करण्याचा असो अथवा कुटुंबांतील माणसांचें केवळ पोट भरण्याचा असो. स्वार्थत्यागावांचून मनुष्याला जशी देशसेवा साधावयाची नाहीं तद्वत् स्वार्थत्याग करण्याची इच्छा नसली तर स्त्रीच्यानेंही संसार योग्य प्रकारें थाटला जाणार नाहीं. स्वार्थत्याग करून देशाच्या अथवा राजाच्या उपयोगीं पडणारा नवरा जर गुलाम असेल तर त्याच्यासाठीं सर्वस्व अर्पण करणाऱ्या त्याच्या बायकोसही गुलाम ह्मणतां येईल. कोणत्याही कामासाठीं कां होईना प्रेम असल्यावांचून कोणाच्यानेंही स्वार्थत्याग झाला नाहीं व होणार नाहीं आणि मग जेथें प्रेम आहे तेथें गुलामगिरीला थारा कसा मिळणार? स्त्रियांनीं स्वार्थत्याग करावयाचा ह्मणजे नवऱ्यांनीं मात्र त्यांना वाटेल तसें वागवावें अथवा जपानी लोक वागवीत असत असा माझा ह्मणण्याचा मुळींच अर्थ नाहीं. माझ्या एकंदर लिहिण्याचा आशय इतकाच आहे कीं जपानांतील स्त्रियांना काय आणि पुरुषांना काय जें शिक्षण देण्यांत येत असे तें स्वार्थत्यागाच्या पायावर उभारलेलें होतें. जपानांतील स्त्रीशिक्षणाचें हें धोरण बदलल्यावांचून अमेरिकेंतील एका स-

द्गृहस्थाची इच्छा सफळ होऊन त्याच्या डोळ्याचें पारणें फि-टण्याचा संभव नाहीं ! पाश्चात्य शिक्षण मिळाल्यापासून आं-धळे झालेले कित्येक लोक स्त्रियांची कींव येऊन आमच्यां-तील रूढीचें बंड केव्हां मोडेल ह्मणून जसे उतावीळ झाले आहेत तसलाच उताविळपणा जपानी स्त्रियांना गुलाम स-मजणाऱ्या एका अमेरिकेंतील सद्गृहस्थाला वाटून "ईश्वर करो आणि जपानांतील सर्व स्त्रिया प्राचीन चालीरीतींवि-रुद्ध बंड करोत" अशी आपली पवित्र इच्छा त्यानें प्रकट केली ! जपानांतील स्त्रीशिक्षणाचें धोरण पूर्वींप्रमाणेंच जोंप-र्यंत कायम आहे तोंपर्यंत विचाऱ्याची इच्छा सफळ हो-ण्याचा संभव नाहीं, तरी पण असली दुष्ट इच्छा प्रकट क-रण्यापूर्वी असल्या बंडांनीं स्त्रियांची स्थिति सुधारेल किंवा कसें याचा त्या सद्गृहस्थानें विचार केला होता काय? जवळ जवळ तसलीच इच्छा करणाऱ्या आमच्यांतील समाजसुधा-रकांनीं याच प्रश्नाचा विचार करावयास नको काय? बंड करून सुखकर राज्यक्रान्ति घडल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत आहेत, परंतु बंड करून हितकारक समाजक्रान्ति घडल्याचें एकही उदाहरण नाहीं. स्त्रियांनीं जुन्या चालीरी-तींविरुद्ध बंड केलें तर कदाचित् जो फायदा होईल असें सुधारकांना वाटतें त्याच्या दसपट नुकसान इतर रीतीनें होणार नाहीं काय? असलीं सामाजिक बंडें प्राच्य राष्ट्रांत पूर्वीं कधीं झालीं नाहींत व पुढें होण्याचा संभव नाहीं हें आपलें मोठें भाग्यच आहे ! रोममधल्या स्त्रियांनीं असल्या प्रकारचें बंड केल्याचें इतिहासांत नमूद आहे; परंतु त्या बंड उर्फ सुधारणेपासून कोणत्याही प्रकारचा धरबंध न उर-ल्यामुळें सांगणाराला आणि ऐकणाराला लाज वाटावी अशा

प्रकारचीं अनन्वित नीतिभ्रष्ट कृत्यें रोममध्यें स्त्रियांच्या हातून घडल्याची कोणास माहिती नाहीं? समाजसुधारणा घडवून आणण्यास बंडावांचून दुसरे साधे पण गुणकारी उपायच नाहींत काय? बंड केल्यावांचून जी सुधारणा होईल तीच दृढमूल होणार आहे. जुन्यांतून नवीन निघालें तर तें कोणाच्या डोळ्यांत सलत नाहीं आणि फार वेळ टिकतें. कोणत्याही समाजांत सुधारणा ही आवश्यक असून ती बंड केल्यावांचून होईल तरच श्रेयस्कर होणार आहे. सदरहू अमेरिकेंतील गृहस्थानें जपानी स्त्रियांची स्थिति सुधारण्यास त्यांनीं बंड करावें अशी सूचना करावी इतकी जपानी स्त्रियांची निकृष्ट स्थिति खचित झाली नव्हती.

कोणत्याही देशांत काय आमच्यासारख्या नाना जाती नसल्या तरी निरनिराळे धंदे व हुद्दे असतात. तसेंच अधिकाराच्या व पैशाच्या योगानें मनुष्या—मनुष्यांत फरक पडूं शकतो. अर्थात् कोणत्याही समाजांत सर्व स्त्रियांची योग्यता सारखी असणें शक्य नसतें. तेव्हां एकाद्या देशांतील स्त्रियांचा विचार करावयाचा ह्मणजे तो सामान्यपणेंच केला पाहिजे. त्या देशांतील विशिष्ट वर्ग घेऊन तेवढ्यावरून एकंदर स्त्रियांची परीक्षा करणें वाजवी होणार नाहीं. अशा रीतीनें विचार केला तर जपानांतील स्त्रियांची योग्यता पूर्वीं कमी नव्हती व हल्लींही नाहीं. त्यांना पुरुषांच्या इतके हक्क मात्र केव्हांच नव्हते. स्त्रीपुरुषांची समान स्थिति केव्हां समजावयाची याविषयीं सर्व देशांतील लोकांची एकवाक्यता होणें शक्य नाहीं. स्त्रियांना तंतोतंत पुरुषांइतके हक्क असावे असें प्रतिपादन करणारांनीं प्रथम पुरुषापुरुषांना तरी सारखे हक्क आहेत काय याचा विचार

करायास नको काय? एकीकडे जगांत उघडपणें काळा आणि गोरा असा भेद पुरुषांत मानण्यांत येत असतां स्त्रियांच्या पुरतीच काकुळती करणारे लोक भोळे नव्हत काय? शिवाय स्त्री आणि पुरुष यांचे समसमान हक्क आहेत याचा अर्थ तरी काय करावयाचा? कोणच्या बाबतींतले हक्क? त्यांच्यांत ईश्वरानेंच जे मानसिक व शारीरिक फरक निर्माण करून ठेविले आहेत त्यांची व्यवस्था काय करावयाची? ईश्वरनिर्मित हे फरक लक्षांत घेतल्यावांचून समाजांत व्यवस्था राहणें शक्य आहे काय? सोनें आणि रुपें यांची परस्पर योग्यता एक वेळ ठरवितां येईल, परंतु स्त्री आणि पुरुष यांची योग्यता मोजण्याचें असें एकादें माप आहे काय ? तें कसें असूं शकेल! त्यांच्यांत ईश्वरानेंच जे फरक करून ठेविले आहेत ते नाहींसे करणें हें मनुष्याचें काम नव्हे. तसा प्रयत्न करण्याच्या भरीस जर एकादा समाज पडेल तर अखेरीस त्याची फजिती झाल्यावांचून कधीं राहणार नाहीं. असल्या वेडगळ समजुती जपानी लोकांच्या डोक्यांत कोणी ही भरविल्या नव्हत्या. स्त्री आणि पुरुष यांचीं कामें वेगळालीं, अर्थात् त्यांची योग्यताही वेगळाली, अशी समजूत जपानी लोकांची असल्यामुळें त्यांचे हक्क समसमान आहेत असा भ्रामक प्रश्नच जपानांत केव्हां उद्भवला नव्हता. घर आणि घराशिवाय बाकीचें जग असे संसाराचे दोन भाग कल्पिले तर जपानांत एका भागावर स्त्रीचें व दुसऱ्या भागावर पुरुषाचें पूर्ण स्वामित्व होतें. आपापला अधिकार सोडून स्त्री आणि पुरुष एकमेकांच्या कारभारांत ढवळाढवळ करीत नसत. बायको अगर आई या नात्यानें घरांतील कारभाराची पूर्ण मालकी स्त्रीकडे असे

आणि तसा तिचा मान राखण्यांत येई. पुरुष लढायांवर गेले ह्मणजे घरांतील सर्व कारभार स्त्रिया आटोपीत. मुलाबाळांना शिक्षण देणें व प्रसंग पडल्यास त्यांचें संरक्षण करणें याचा भार त्यांच्यावर पडे. स्त्रियांना थोडेसें लष्करी शिक्षण देण्यांत येत असे असें जें मीं वर ह्मटलें आहे त्याचा उपयोग त्यांना अशा वेळीं होई.

तिऱ्हाईत राष्ट्रांच्या चालीरीतींची स्वतःस यथार्थ माहिती नसल्यामुळें कांहीं चालीरीतींचा अर्थ न समजून त्यांवर आपलीच कांहीं तरी कल्पना बसवून शहाणपणाच्या घमेंडींत दुसऱ्यास नांवें ठेवण्याची खोड पाश्चात्य ग्रन्थकारांना फार जडलेली आहे. जपानांत स्वतःच्या बायकोचा उल्लेख करितांना मनुष्य एखादवेळेस "माझी गांवढळ बायको" असें ह्मणतो. हे शब्द एकाद्या पाश्चात्य मनुष्याच्या कानावर पडले कीं त्यांत काय प्रेम आहे याचा विचार न करितां, लागलीच तो अनुमान ठोकून देतो कीं जपानांत पुरुष स्त्रियांनां मुळींच मान देत नाहींत! असल्या अर्धवट शहाण्यांना उत्तर द्यावयाचें ह्मणजे इतकेंच कीं तुह्मी प्रेमांत आलां ह्मणजे स्वतःच्या बापास मूर्ख ह्मणतां, मुलास डुक्कर ह्मणतां, किंवा स्वतःस भ्रांतिवट *समजतां, परंतु तेवढ्यावरून तुह्मी वडिलांचा मान ठेवित नाहीं, मुलांचा तिटकारा करितां व तुह्मास स्वाभिमान तो कसा ठाऊक नाहीं असें जर कोणी प्रतिपादूं लागेल तर तें यथार्थ होईल काय? खरोखर विचार केला तर असें आढळून

---

* 'My foolish father;'
'My Swinish Son;'
"My awkward self."

येईल कीं जपानांत अथवा हिंदुस्थानांत देखील नवराबाय-कोंत जें प्रेम दिसून येतें तसलें प्रेम पाश्चात्य राष्ट्रांत पाहूं गेल्यास सांपडावयाचें नाहीं. ह्याला पहिलें प्रमाण असें पहा कीं प्राच्य राष्ट्रांतून "नवरा आणि बायको" मिळून एकच व्यक्ति होते असें समजतात, परंतु तेंच पाश्चात्य राष्ट्रांत नवऱ्याचे हक्क वेगळे आणि स्त्रीचे वेगळे; त्यांचें एकमेकांशीं सुरळित चालत असतें तोंपर्यंत काय वाटेल तसला पोरकट आणि बाष्कळ असा लडिवाळपणा ते करितील पण तिऱ्हाइतांनीं तेवढ्यावरून त्यांच्या परस्परांवरील प्रेमाचें अनुमान काढणें चुकीचें होईल. जरा त्यांच्यांत बेबनाव होऊं द्या ह्मणजे त्यांच्यांत कसें गर्दभप्रेम सुरू होतें याची मौज मोठी पहाण्यासारखी व पाहण्यास न मिळाली तर निदान वर्तमानपत्रांतून वाचण्यासारखी असते. शब्दांनीं प्रेम व्यक्त करण्यांत मात्र पाश्चात्य लोक कोणाला हार जाणार नाहींत. घरांत कितीका लाथाळी चालेना, परंतु बाहेर बोलतांना "माझी सुंदर स्त्री" फार काय "माझा सुंदर मी" च, "माझें मनमोहक* दिल" इत्यादि रीतींनीं स्वतःच्या स्त्रीचा उल्लेख करण्यांत ते कधीं कसूर करावयाचे नाहींत! असो; हें थोडेंसें विषयांतर झालें परंतु ओघास आलें ह्मणून करावें लागलें.

पुरुष स्त्रियांना मान कितपत देतात यावरून पाश्चात्य राष्ट्रांत स्त्रियांची योग्यता ठरवितात. असल्या बाह्य प्रकारावरून स्त्रियांची योग्यता जपानांत केव्हांच ठरविण्यांत आली

* 'My good wife;'
'My bright self;'
'My lovely disposition.'

नाहीं. कारण जें बाहेरून दिसतें तशी नेहमींच आंतून स्थिति असते असा नियम नाहीं. राजाला प्रजा मान देते एवढ्यावरून राजा दयाळू व प्रजा राजनिष्ठ आहे असें अनुमान काढणें चुकीचें होईल. कदाचित् राजा बलाढ्य व प्रजा दुबळी असेल आणि ह्मणून प्रजा राजाला मान देत असेल! तेव्हां पुरुष स्त्रियांना मान देत एवढ्यावरूनच केवळ स्त्रियांच्या योग्यतेचें अनुमान काढणें बरोबर होणार नाहीं. अमेरिकेंत तरी निदान एक वेळ अशी होती कीं पुरुषांना बायकाच मिळत नव्हत्या. बरीचशी किंमत देऊन इंग्लंडांतून त्यांना बायका मागवाव्या लागत. तेव्हां अमेरिकेंत स्त्रियांना जो मान मिळत आहे त्याचें मूळ कारण कदाचित् स्त्रियांची दुर्मिळता असेल, असें कोणीं नाहीं ह्मणावें? सारांश, असल्या बाह्य साधनावरून परीक्षा करणें वाजवी होणार नाहीं. जपानांतील तरुणांच्या एकंदर वर्तनक्रमाच्या मुळाशीं कर्तव्याची उदात्त कल्पना होती. तिचा उल्लेख मागें एका ठिकाणीं[1] झालेलाच आहे. त्या ठिकाणीं जे पांच संबंध सांगितले होते त्यांपैकीं "राजा आणि प्रजा" यांच्या कर्तव्याविषयींचें विवेचन स्वतंत्रपणें करण्यांत आलें आहे. इतर संबंधांविषयीं प्रसंगोपात्त उल्लेख झालेले आहेत. जपानी जवानमर्दांच्या शिक्षणक्रमांत राजनिष्ठेची जितकी योग्यता मानली जात असे तितकी योग्यता दुसऱ्या कोणत्याही संबंधाला देण्यांत येत नसे. अशा प्रकारें जपानी जवानमर्दांना जें विशिष्ट शिक्षण मिळत असे त्या

## शिक्षणाचा राष्ट्रावर परिणाम

कितपत झाला आहे याचा आपण आतां विचार करूं.

---

१ मागील पान १७.

पूर्वी जपानांतील तरुणांना कशा प्रकारचें शिक्षण मिळत असे, याची कल्पना येथवर झालेल्या विवेचनावरून वाचकांस होणार आहे. त्या शिक्षणाचा सर्वांगांनीं विचार जरी मजकडून झाला नाहीं तरी पण शिक्षणाच्या ठळक ठळक अंगांचा निर्देश करण्यास मी चुकलों नाहीं असें वाटतें. अगदीं प्रथमपासूनच हें शिक्षण जपानांत सार्वत्रिक झालें होतें असें नाहीं. लढाया मारणें हाच ज्यांचा धंदा अशाच लोकांना प्रथम हें शिक्षण मिळालें. परंतु सूर्योदय होण्याचे वेळीं प्रथम सूर्याचीं किरणें जशीं पर्वताच्या उंच शिखरावर पडतात आणि मग तेथून उतरत उतरत तीं सर्व प्रदेश व्यापतात, तद्वत् या ज्ञानसूर्याचा प्रकार जपानांत झाला. हळू हळू ह्या शिक्षणाचा प्रसार सर्व जपानभर झाला. आतांपर्यंत ज्या तत्वांचा विचार करण्याचा मीं प्रयत्न केला आहे तीं सर्व तत्वें ओघाओघानें जपानांतील सर्व लोकांच्या हाडामासांत खिळून गेलीं. दुर्गुणांपेक्षां सद्गुण कांहीं कमी सांसर्गिक असतात असें नाहीं. दोन बाटलीवाले प्रथम एकाद्या गांवांत सोडून दिले ह्मणजे दहापांच वर्षांत आपल्या कळपांत पांच पन्नास माणसें ते ओढून आणितात. त्याचप्रमाणें सद्गुणी मनुष्याचेंही आहे. मात्र सद्गुणी मनुष्याचा सहवास इतरांना घडला पाहिजे. गांवांत ग्रन्थियुक्त सन्निपाताचा आजार सुरू झाला ह्मणजे रोगी मनुष्याला इतरांपासून अलिप्त ठेवण्याची जशी योजना करण्यांत येते त्याप्रमाणें शहाणीं माणसें विद्वत्तेच्या डौलावर आपल्या इतर अडाणी जातिबांधवांचा तिरस्कार करून जर त्यांच्यापासून अलग राहूं लागतील अथवा त्यांनीं अलगच रहावें अशी जर कोणाकडून योजना करण्यांत येत असेल तर असल्या

शहाण्या माणसाचें शहाणपण त्यांच्याचपाशीं राहून त्याचा इतरांस उपयोग होत नाहीं.

जपानला आज जो मोठेपणा प्राप्त झाला आहे त्याचें कारण जपानच्या जवानमर्दांना पूर्वी मिळालेलें शिक्षण होय. ह्या जवानमर्दांची संख्या फार मोठी होती असें नाहीं, परंतु त्यांच्या हातून शौर्याचीं, देशभक्तीचीं, राजनिष्ठेचीं, औदार्याचीं वगैरे जीं कृत्यें घडलीं त्यांचा परिमल सर्व जपानभर पसरला जाऊन वरील सद्गुणांचा संचार सर्व जपानच्या राष्ट्रांत झाला. नाटकगृहें, गोष्टी सांगणारांचे अड्डे, व्याख्यानमंदिरें, सार्वजनिक महोत्सव, कादंबऱ्या, वगैरे जीं करमणुकीच्या द्वारानें ज्ञानप्रसार करण्याचीं साधनें आहेत त्या सर्वांतून जपानच्या जवानमर्दांच्याच गोष्टी गोवलेल्या होत्या. सारा दिवस आपल्या शेतांत राबून शेतकरी लोक घरीं येऊन आपल्या पोराबाळांना भोंवतालीं घेऊन जेव्हां शेकोटी पेटवून बसतात, तेव्हां फाजिल व अचकट विचकट लावण्या ह्मणण्याऐवजीं त्यांच्या भाषणाचा ओघ बहुतकरून एकाद्या देशभक्ताचे गोडवे गाण्याकडे वळलेला असतो, आणि त्यांची ती प्रजा, त्यांच्या राष्ट्राचे ते भावी आधारस्तंभ मोठ्या कौतुकानें पण एकाग्रमनानें त्या गोष्टी ऐकत असतात! शेकोटी विझण्याची वेळ जसजशी जवळ येते तसतसें त्यांना वाईट वाटूं लागतें. अखेरीस ती शेकोटी विझते, परंतु त्यांच्या अंतःकरणांत जो अभिमानज्योतीनें पेट घेतलेला असतो तो जास्तच भडकत जातो. गप्पागोष्टी होऊन मोठालीं माणसें निद्रावश होतात तरी देखील ह्या बाळांना त्या त्या दिवसाच्या गोष्टींतील देशभक्तांचाच ध्यास लागून राहतो. सरकारी कचेऱ्यांतील

कारकून मंडळी संध्याकाळच्या प्रहरीं आपापलीं धोतरें झटकून बाहेर पडली ह्मणजे अमुक साहेब मजकडे पाहून हांसला आणि तमुक साहेब मला असें ह्मणाला असल्या फुशारकीच्या गोष्टी अथवा गांवांतील घाणेरड्या बातम्या यांच्यांत वेळ न दवडतां स्वदेशाच्या इतिहासांत जीं असंख्य मानवरत्नें चमकून राहिलीं आहेत त्यांच्या चरित्रांतील हृदयंगम कथानकांनीं आपली वाणी पवित्र करीत असतात. जपानांतील प्रौढ विद्यार्थ्यांच्या संबंधानें तर बोलावयासच नको. आपल्या पतित देशांत देखील विद्यार्थी दशेंत जितका अभिमान वाटत असतो त्याचा पुढें एक दाहावा हिस्सा राहत नाहीं हें जर आपण पाहत आहोंत तर जपानच्या सारख्या स्वतंत्र, वैभवसंपन्न देशांतील विद्यार्थी ह्मणजे केवळ अभिमानाच्या मूर्तीच असतील यांत नवल वाटण्यासारखें काय आहे? फार काय सांगावें, पण जपानांतील लहान पोर लुटुलुटु चालूं बोलूं लागतें न लागतें तोंच कावळ्या चिमण्यांच्या निरर्थक गोष्टी सांगण्यास न शिकतां शूर पुरुषांच्या गोष्टी आपल्या बोबड्या, परंतु प्रेमळ शब्दांनीं आपल्या धाकट्या भावंडाला सांगूं लागतें. ज्या देशांत स्वदेशाभिमानाचें असलें बाळकडू मिळत आलेलें आहे त्यानें परक्याचें जूं आज पंचवीसशें वर्षांत केव्हांही मानेवर वागविलें नाहीं यांत काय नवल आहे? कौतुक हा कांहीं अजब मनोविकार आहे. ज्या राष्ट्रांतील तरुणांना आपल्या पूर्वजांचें कौतुक वाटेनासें झालें असेल, ज्यांना स्वतःच्या पराक्रमी पूर्वजांत व इतर देशांतील पराक्रमी पूर्वजांत कांहींच फरक दिसत नसेल, जे स्वतःस व स्वतःच्या पूर्वजांस मूर्ख समजण्यास शिकले असतील, असलें राष्ट्र

मृत्युपंथाला लागलें आहे ह्मणून समजावें. आधीं दुसऱ्यांच्या कृतीचें कौतुक वाटतें आणि मग तसली कृति आपल्या हातून घडते, हा प्रमाणसिद्ध न्याय आहे. जपानच्या लोकांना आपल्या पराक्रमी पूर्वजांचें अतिशय कौतुक आणि अभिमान वाटतो. कोणत्याही धंद्यांतला मनुष्य असो, तो शिक्षित असो अथवा अशिक्षित असो, शाळेंत पंतोजी असो अथवा व्यापार करणारा असो, त्याला पूर्वजाभिमान हा असावयाचाच. जपानच्या आजच्या मानसिक, नैतिक, राजकीय आणि फार काय पण औद्योगिक उत्कर्षास हेंच शिक्षण प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणें कारणीभूत झालेलें आहे.

अनेक थोर पुरुष राष्ट्राच्या उत्कर्षाचें निदान ठरवून तदनुरूप आमरण प्रयत्न करण्यास जेव्हां सिद्ध होतात, तेव्हांच राष्ट्राचा उत्कर्ष होत असतो. व्यक्तिव्यक्तींत चुरस लागण्यानेंच राष्ट्रोन्नति होत असते. परंतु ही चुरस आपण पोट कसें भरूं एवढ्याच पुरती मात्र नसतां समाजाचे आपण पुढारी होऊन त्यांना सन्मार्गाला कसे लावूं अशी असली पाहिजे. जपानचा हल्लींचा उत्कर्ष असल्याच प्रयत्नाचा व चुरशीचा परिणाम आहे. जपानी जवानमर्दांना जें शिक्षण मिळालें तें अनेक मार्गांनीं झिरपत राष्ट्रांतील सर्व दर्ज्यांच्या व धंद्यांच्या लोकांपर्यंत जाऊन पोंचलें. एकाद्या देशांत जशी एकादी भयंकर रोगाची सांथ प्रथम प्रमुख शहरीं सुरू व्हावी व तेथून ती हळूहळू आंत आंत जाऊन तिनें सर्व देश ग्रासून टाकावा आणि मग मरणाची कोणालाच कांहीं पर्वा वाटूं नये, तद्वत् जें शिक्षण जपानांत प्रथम एका विशिष्ट पण प्रमुख वर्गाला मिळालें तें फैलावत जातां जातां सर्व राष्ट्राला जाऊन भिडलें आणि त्याच्या

योगानें देशसेवेपुढें मरणाची कोणालाच कांहीं किंमत वाटे-नाशी झाली. "मनोविकारांना प्रक्षुब्ध करून मनुष्याला सन्मार्गाला लावण्याचें जें शास्त्र" त्याचें नांव धर्म. ही मॅथ्यु आरनोल्डनें धर्माची केलेली व्याख्या जर खरी असेल तर जपानात जें शिक्षण पूर्वी मिळत होतें तेंच जपानचा धर्म होय असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां प्रश्न इतकाच आहे कीं जपानच्या राष्ट्रावर पूर्वीच्या शिक्षणपद्धतीपासून जे सुपरिणाम घडले आहेत ते चिरकाल टिकण्यासारखे आहेत किंवा कसे? मॅथ्यु आरनोल्डच्या व्याख्येप्रमाणें ज्या शिक्षणाला मीं जपानचा धर्म ह्मटलें आहे, तो

## धर्म कायम आहे

कां पाश्चात्य सुधारणेच्या प्रवाहांत तो वाहवला गेला, असा प्रश्न आहे.

पाश्चात्य सुधारणेचें किंचित् वारें लागून जपानची पूर्वीची शिक्षणपद्धति अथवा ज्याला मी जपानचा धर्म ह्मणतों तो धर्म जर डगमगूं लागण्यासारखा अस्थिर असता तर त्याचे एवढे गोडवे गाण्याचें आपणांला आज काय प्रयोजन उरलें असतें! धर्म हें राष्ट्राचें जीवन आहे. जसे धक्के बसतील तसे हेलकावे खाणारा जर एखाद्या राष्ट्राचा धर्म असेल तर असलें राष्ट्र किती काळ टिकणार आहे! धर्माचा पाया भक्कम असल्यावर एकादे वेळेस परिस्थिति बदलल्यामुळें तो धर्म कांहीं काळ लोपल्यासारखा होईल, परंतु तो समूळ कधींही नाहींसा होणार नाहीं. जपानांतील वर दिलेल्या शिक्षणपद्धतीचीं ऊर्फ धर्माचीं पाळेंमुळें इतकीं खोल गेलीं आहेत कीं पाश्चात्य सुधारणेच्या वावटळीनें तो धर्म खिळखिळित होणें शक्य नाहीं. प्रत्येक राष्ट्रांतील लोकांत कांहीं

विशिष्ट गुणावगुण असतात. ते गुण अथवा अवगुण अनेक शतकांच्या अभ्यासानें त्या त्या लोकांत नदींतील एकाद्या खडकाप्रमाणें पूर्णपणें जडलेले असतात. अनेक शतकें जेव्हां त्या खडकावरून सारखें पाणी वहावें तेव्हां कोठें त्याच्यावरील कांहीं भाग झिजतो. हाच न्याय प्रत्येक राष्ट्रांतील लोकांच्या विशिष्ट गुणावगुणाला लागू पडतो. ते गुण असले तर पांच पन्नास वर्षांत त्यांचा सर्वस्वी लोप होणार नाहीं. ते अवगुण असले तरी तितक्या अवधींत नाहींसे होणें शक्य नाहीं. अर्थात् पांच सात शतकभर जपानांतील तरुणांना जें शिक्षण आंगवळणीं पडलेलें आहे तें पांच पन्नास वर्षांत नाहींसें होण्याइतकें लेचेंपेचें नाहीं.

लढवय्या जवानमर्दांचा जपानांत पूर्वीं एक स्वतंत्र वर्गच होता. मोकाशाची पद्धत जशी संपुष्टांत आली तसा सदरहू वर्ग नाहींसा झाला, परंतु त्यांना जें शिक्षण मिळालेलें होतें त्याचे परिणाम अजूनपर्यंत जपानवर स्पष्ट घडत आहेत यांत शंका नाहीं. त्या शिक्षणापासून जपानला जें एक विशिष्ट वळण मिळालें होतें तें आजतागाईत कायम आहे. तें शिक्षण जपानला सारखें सातशें वर्षें मिळत होतें, तेव्हां त्या अवधींत तें त्यांच्याशीं अगदीं एकजीव व्हावें हें स्वाभाविक आहे. शंभर वर्षांत तीन पिढ्या सरासरी होतात अशी कल्पना करून सन १६२७ पासून सन १९०२ अखेर पर्यंत आपल्या प्रत्येकाचे किती पूर्वज होऊन गेले याचा जर हिशोब केला तर असें आढळून येईल कीं सन १६२७ पासून आतांपर्यंत होऊन गेलेल्या निदान सात आठशें आईबापांचें रक्त आपल्या प्रत्येकाच्या हाडामासांत खेळत आहे. आणि जपानच्या तरुणांना तर सुमारें आठशें वर्षें वर

दिलेल्या धोरणानें शिक्षण मिळत होतें, ह्मणजे आज जपानच्या प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या शरीरांत सदरहू शिक्षण मिळालेल्या सरासरी $२^{२४}$ ह्मणजे अजमासें दीड दोन कोट माणसांचें रक्त खेळत आहे. तेव्हां असल्या शिक्षणाचे परिणाम मोकाशाची पद्धत बंद होऊन अजून पुरीं पन्नासही वर्षें झालीं नाहींत तोंच नाहींसे कसे होणार ? आज मित्तीला देखील त्याच शिक्षणाचा पगडा नकळत पण खात्रीनें जपानी लोकांच्या मनावर बसल्याचें दिसून येतें. जपानच्या आजच्या मोठेपणास जे कांहीं थोडे फार देशभक्त कारण झाले आहेत त्यांपैकीं **यो**शिडा **शो**इन हा एक होऊन गेला. अमुक मार्गानें आपण गेलों असतां देशाचें हित खात्रीनें होणार आहे अशी एकदा खात्री झाल्यावर मग कोणाचीही भीति न बाळगतां व कसल्याही संकटाची पर्वा न करितां त्या मार्गाचा स्वीकार करण्यास जें धैर्य लागतें तें **यो**शिडाच्या अंगीं पूर्णपणें वसत होतें. देशकार्याच्या पायीं बिचाऱ्यास फांशीं जावें लागलें. त्याच्या अगोदरच त्यानें खालील आशयाची कविता केली होती: "मी पूर्णपणें जाणून होतों कीं मीं स्वीकारलेला मार्ग धोक्याचा आहे, त्याच्या पायीं मला मरणही येईल, परंतु माझ्या वाडवडिलांपासून जें शिक्षण मला मिळालें होतें तें मला स्वदेशसेवा केल्यावांचून स्वस्थ बसूं देईना." हें शिक्षण अमुक प्रकारचें होतें असें कोठें कोणीं लिहून ठेवलेलें नव्हतें, परंतु बापापासून मुलाला अशा क्रमानें तें आजपर्यंत एकंदर राष्ट्राला मिळत आलें आहे.

रॅनसम साहेबानें जपानवर एक पुस्तक लिहिलें आहे; त्यांत तो ह्मणतो कीं "आज एका जपानचे तीन जपान

झाले आहेत: जुनें जपान जें अजून घुटमळतच आहे; नवें जपान जें अजून जन्मास यावयाचें आहे, पण ज्याची प्राणप्रतिष्ठा झाली आहे; आणि जुना जन्म टाकून नवीन जन्म घेणारें जपान, जें आज आपला मार्ग मोठ्या अडचणींतून काढीत आहे व अखेरीस कोणत्या पंथाला लागणार आहे याचा कांहींच निर्णय करितां येत नाहीं. जपानच्या आजच्या स्थितीवरून रॅनसम साहेबांनीं केलेले विभाग पुष्कळ अंशीं खरे आहेत, परंतु त्यांतल्या पहिल्या विभागासंबंधानें त्यांचें ह्मणणें सर्वथैव बरोबर नाहीं. जुनें जपान अजून घुटमळतच आहे इतकेंच नव्हे तर तें केव्हांच नाहींसें होणारें नाहीं. कारण ज्याला जुनें जपान ह्मणून रॅनसम साहेब ह्मणतात तें नाहींसें होऊन नवीन जपान उदयास यावयाचें आहे असा प्रकार नसून जुन्यांतूनच नवीन जपान निघणार आहे. ज्या शिक्षणाचा अंतर्भाव रॅनसम साहेबांनीं जुन्या जपानांत केला आहे तेंच शिक्षण नवीन जपानला मोठेपणाचा मार्ग दाखवीत आहे. ज्या मुत्सद्यांच्या शहाणपणाच्या जोरावर जपानचें राष्ट्र जीर्णोद्धाराच्या तुफानांतून सुरक्षित पैलथडीस लागलें त्या सर्व मुत्सद्यांना जुन्या नैतिक शिक्षणावांचून अन्य शिक्षण मिळालेलें

---

१ जपानांत बाराव्या शतकापासून तों सन १८६७ पर्यंत जे बादशहा होऊन गेले ते नुसते नामधारी होते. राज्याचीं मुख्य सूत्रें त्यांच्या प्रधानांच्या हातीं होतीं. त्या प्रधानांना शोगन म्हणत. हे प्रधान जरी राज्यकारभार पहात तरी त्यांनीं गादीवरील पुरुषांचा केव्हांही उपमर्द करूं नये. त्यांना बादशहाकडून प्रधानकीचीं वस्त्रें मिळत. सन १८६७ सालीं ही प्रधानाची जागा रद्द करून बादशहानें सर्व अधिकार आपल्याकडे घेतला. याच प्रसंगास ‘जीर्णोद्धार’ म्हटलें आहे.

नव्हतें. मी आरवतों ह्मणून सूर्य उगवतो अशी फुशारकी जशी कोंबडा मिरवितो त्याप्रमाणें जगांत कोठें कांहीं चांगलें झालें तर तो आपल्याच पांढऱ्या पायाचा पुण्यप्रताप होय असा डौल घालण्याची खोड ख्रिस्ती पाद्री लोकांना लागलेली आहे. जपानच्या उत्कर्षाचा व ह्या पाद्र्यांच्या पायाचा कांहीं अर्थाअर्थी तरी संबंध आहे बरें ? परंतु जपानला आज जो मोठेपणा प्राप्त झाला आहे त्यास कारण आह्मीच ह्मणून कांहीं पाद्री आव घालीत असतात. दुष्काळ, दारिद्र्य, रोग, पोटास अन्न नसल्यामुळें करावें लागणारें धर्मांतर, शेतांत पेरण्यास बीं नसल्यामुळें शेताच्या कांठावर बसून शेतकऱ्यास ढाळावे लागणारे अश्रु, आपापले धंदे बुडाले आणि पोट भरण्यास तर साधन उरलें नाहीं ह्मणून साळी, कोष्टी, वगैरे कारागिरांच्या हाताला खडी फोडून येणारे फोड इत्यादि इत्यादि प्रकारांनीं हिंदुस्थानची जी सारखी भरभराट होत आहे तो सगळा आमचा प्रभाव आहे असा डौल जर हे पाद्री मिरवूं लागतील तर त्यांत कांहीं तरी सत्य आहे ह्मणून कबूल करावें लागेल. चीन देशांत अस्वस्थता आणि बंडाळी सुरू होऊन गिधाडाप्रमाणें पाश्चात्य राष्ट्रें त्या देशावर तुटून पडलीं हा आमचाच पायगुण होता असें ह्या पाद्र्यांचें ह्मणणें असेल तर तें कोणीतरी खरें मानील, परंतु जपानच्या मोठेपणाचें श्रेय देखील आह्मांलाच आहे असला हक्क सांगण्यास ह्या पाद्र्यांनीं तयार व्हावें ह्यापेक्षां जास्त को-

---

* Speer: Missions and Politics in Asia, Lecture IV P. P. 189–192.

Dennis: Christian Missions and Social Progress, Vol. I P. 32, Vol. II P. 70.

डगेपणा अथवा लुब्रेपणा कोणाला करितां येईल असें मला वाटत नाहीं. नाना तऱ्हेचीं आमिषें दाखवून आजपर्यंत आपण किती लोकांना आपल्या कळपांत ओढून आणून त्यांची व त्यांच्या बांधवांची ताडातोड केली याबद्दल वाटेल तर त्यांनीं वल्गना कराव्या, परंतु एकाद्या देशाच्या राजकीय उत्कर्षाचा प्रश्न असल्यावर ह्या पाद्र्यांनीं मध्यें तोंड घालून आपणांकडे नसतें महत्त्व घ्यावें ही मोठ्या शरमेची गोष्ट आहे. खरा प्रकार असा आहे कीं जपानच्या सुखदुःखाला सर्वस्वी त्याचेंच आजपर्यंतचें शिक्षण कारण झालें आहे. त्याच्या आजच्या सुस्थितीबद्दलचें सर्व श्रेय केवळ त्याच्या शिक्षणपद्धतीकडे आहे. इंग्लंडसारख्या बलाढ्य राष्ट्राला ज्याच्या हातांत हात घालून जाण्यास भूषण वाटलें त्या जपानला ज्या थोड्या फार देशभक्तांच्या निरपेक्ष व निस्सीम देशसेवेमुळें आज इतकें महत्त्व आलें आहे त्यांचीं चरित्रें पहा. **साकुमा, सेगो, ओकुबो, किडो** आणि यांशिवाय हल्लीं विद्यमान असलेले **इटो, ओकुमा, इटगाकी** वगैरे मुत्सद्यांचीं चरित्रें पाहिलीं असतां आपली अशी खात्री होते कीं त्यांच्या अंगीं देशसेवेचें इतकें वारें संचरण्यास त्यांना वाडवडिलांपासून स्वदेशाभिमानाचें व स्वराजनिष्ठेचें जें शिक्षण मिळत आलें तेंच कारण होय.

जगांतील प्रमुख राष्ट्रांत जपानची गणना होऊं लागली आहे ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. जपानच्या स्थितींत असल्या प्रकारचें विलक्षण रूपांतर होण्यास अर्थात् अनेक प्रवर्त्तक कारणें साह्यभूत झालीं असतील, परंतु त्या सर्वांत श्रेष्ठ कारण पाहूं गेल्यास तें निःसंशय त्यांचें शिक्षण होय. जपाननें ज्या वेळीं आपल्या देशांत परकी लोकांना व्या-

पाराची मुभा दिली, हरएक बाबतींत नवीन नवीन सुधारणा केल्या, पाश्चात्य राज्यपद्धति, पाश्चात्य शास्त्रें यांच्या अभ्यासास सुरवात केली त्या वेळीं त्यांच्या मनांतला हेतु आपल्या देशांत पुष्कळ संपत्ति बाहेरून यावी किंवा आपली शक्ति वाढून दुसऱ्या राष्ट्रांच्या माना मुरगळण्याचें आपल्याला सामर्थ्य यावें हा नव्हता, अथवा पाश्चात्यांच्या मोहक चालीरीति पाहून हुरळून त्यांनीं डोळे झांकून पाश्चात्यांचें अनुकरण आरंभिलें नव्हतें. दुसऱ्या राष्ट्रांनीं आपणाकडे क्षुद्र दृष्टीनें पहावें हें जपानच्या राष्ट्राला सहन होईना. दुसऱ्यांपेक्षां आपण कमी नाहीं अशी चाड वाटून जपानच्या हातून राष्ट्रोन्नतीचीं कामें झालीं. पैसा, व्यापार वगैरे गोष्टी अनुषंगिक ह्मणून राजकीय राष्ट्रोन्नतीबरोबर जपानांत आल्या हा भाग वेगळा. जपानचा गेल्या चाळीस पन्नास वर्षांचा इतिहास जो वाचून पाहील त्याच्या नजरेस ही गोष्ट आल्यावांचून राहणार नाहीं. प्राचीन शिक्षणापासून जपानी लोकांच्या ठिकाणीं जें सौजन्य आलें आहे त्याचा पुन्हा उल्लेख करावयास नको. जपानचे लोक दिसण्यांत ठेंगू आहेत परंतु त्यांच्या अंगीं जें विलक्षण धैर्य आहे, जी सहनशीलता आहे, आणि जो पराक्रम आहे त्यांचा अनुभव चीनबरोबर झालेल्या लढाईचे वेळीं सर्वांस आलेला आहे. जगाच्या पाठीवर जपानपेक्षां जास्त स्वदेशाभिमानी आणि स्वराजनिष्ठ दुसरें राष्ट्र नाहीं ही जी गोष्ट पाश्चात्यांना कबूल करावी लागत आहे त्याचें सर्व श्रेय जपानच्या जवानमर्दांना आजपर्यंत मिळत आलेल्या शिक्षणाकडे आहे.

सर्वांगसुंदर अशी कोणतीच शिक्षणपद्धति सांपडा-

वयाची नाहीं. जपानच्या तरुणांना जें शिक्षण मिळालें त्यापासून त्यांच्या मनावर जसे अनेक इष्ट परिणाम घडले आहेत तसेच कांहीं अनिष्टही घडल्याचें दिसून येतें. गूढ तत्त्वज्ञानाचा विचार जपानी लोक कधीं करावयाचे नाहींत. त्यांना ती संवयच नाहीं. त्यांच्या प्राचीन शिक्षणक्रमांत अध्यात्मविद्येला अवकाशच नव्हता. आधुनिक शास्त्रामध्यें ते पारंगत होतील किंवा निदान दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या मागें राहणार नाहींत, परंतु मानसशास्त्राचा प्रश्न निघाला ह्मणजे तेथें त्यांची मति कुंठित होते. त्याचप्रमाणें जपानी लोकांना अभ्रूची चाड विलक्षण आहे खरी, परंतु तीबरोबर त्यांच्या स्वभावांत किंचित् फाजिल अधीरपणा आला आहे. एकाद्या मनुष्याला स्वतःच्या मोठेपणाची फाजिल कल्पना असली ह्मणजे जरा कोणी कांहीं बोललें अथवा केलें तरी त्यांत आपला अपमान करण्याचा तर त्याचा हेतु नसेलना अशी पदोपदीं त्याला शंका येत असते. व्यवहारांत अशीं माणसें आपण पुष्कळ पाहतों. तेव्हां राष्ट्रावरही तसलाच परिणाम घडत असेल याचें नवल करावयास नको. जपानी लोकांना स्वतःच्या मोठेपणाचा किंचित् गर्व वाटत असतो, याचें कारण तरी बहुधा त्यांची अभ्रूची चाडच असावी. जपानांतील एकाद्या शहरांतून आपण चाललों तर आपणांस कांहीं तरुण लोक दिसतात. त्यांनीं आपले केस मागें मोकळे सोडले असतात, अंगांत वेडींवांकडीं कुडतीं घातलेलीं असतात, हातांत बारीक वेताच्या छड्या अगर पुस्तकें घेतलीं असतात, व रस्त्यानें जातांना त्यांच्या मुद्रेवर एकंदर जगाबद्दल बेफिकिरपणाची छटा दिसत असते. हे जपानांतील विद्यार्थी होत! त्यांना स्वर्ग दोनच बोटें उरलेला

असतो. "आपण कोण" याबद्दल त्यांच्या कांहीं विलक्षण कल्पना असतात. मनोराज्यांमध्यें ते अगदीं गर्क होऊन गेलेले असतात. त्यांच्या पाणीदार डोळ्यांवरून त्यांची महत्वाकांक्षा दिसत असते. ज्ञान संपादण्यासाठीं ते हापापलेले असतात. दारिद्र्यामुळें त्यांचें धैर्य खचत तर नाहींच पण उलटें दुणावतें. स्वदेशसेवेपुढें त्यांना ऐहिक सुखाची कांहींच किंमत वाटत नाहीं. स्वदेशाभिमान आणि स्वराजनिष्ठा यांनीं त्यांचीं अंतःकरणें भरून गेलेलीं असतात. राष्ट्राच्या मोठेपणाचा बोजा आपणांवर येऊन पडला आहे असें त्यांना वाटत असतें. सारांश उत्तररामचरितांत कुशाला पाहून रामानें जें ह्मटलें आहे

दृष्टिस्तृणीकृतजगत्रयसत्त्वसारा
धीरोद्धता नमयतीव गतिर्धरित्रीम् ।
कौमारकेऽपि गिरिवद्गुरुतां दधानो
वीरो रसः किमयमैत्युत दर्प एव ॥

याप्रमाणें त्यांची स्थिति झालेली असते. त्यांच्या अंगीं जे गुण अथवा अवगुण आपणांस दिसून येतात ते त्यांच्या वाडवडिलांना मिळालेल्या व त्यांना किंचित् फरक करून मिळत असलेल्या शिक्षणाचे परिणाम होत. स्वतंत्र देशांतील हवा किती उत्साहकारक असते पहा! जपानांतील विद्यार्थी विद्यापीठांतून बाहेर पडला ह्मणजे आतां स्वदेशासाठीं मी काय करूं आणि काय नाहीं असें त्याला होऊन जातें; का सैन्यांत शिरूं का आरमारांत शिरूं, का नाना तऱ्हेचे कारखाने काढून परदेशांतील संपत्ति माझ्या देशांत आणून ओतूं, का पाश्चात्य राष्ट्रांतून सफरी करून जें जें ह्मणून उत्तम दिसेल तें तें माझ्या देशांत आणून सांठवूं! जपानां-

तील विद्यार्थ्यांचें किती मनोरम चित्र हें! पण तें जितकें मनोरम आहे तितकेंच तें मला उद्वेगकारक वाटतें, कारण त्यावर माझी दृष्टि स्थिरावते न स्थिरावते तोंच ती माझ्या देशांतील विद्यार्थ्यांच्या चित्राकडे वळते. कोण ही भयंकर तफावत आणि याला कारण कोण! तिकडे विद्यार्थी विद्या-पीठांतून बाहेर पडला ह्मणजे त्याच्या पराक्रमाला मार्ग खुला होतो, त्याची दृष्टि फांकते आणि आतां हें करूं का तें करूं ह्मणून तो भांबावून जातो. आणि आमच्या इकडला पदवी-धर मुंबईस पराक्रम गाजवून आपल्या गांवीं गेला ह्मणजे तो अर्धा मरणोन्मुख झालेला असतो, आतां कुटुंबाचें पोट कसें भरूं ही त्याला विवंचना लागते, पुस्तकांचें गांठोडें बांधून ठेवितो आणि हातांत लेखणी घेऊन "मेहेरबान क-लेक्टर साहेब बहादुर"—असा अर्ज लिहिण्यास आरंभ करितो! हें उदासीनतेचें चित्र पाहून ज्याला स्वस्थ बसवेल, जो आपल्याच सुखांत मग्न राहील, ज्याचें अंतःकरण दुः-खानें करपणार नाहीं आणि ज्याच्या दृष्टीसमोर देशाच्या भावी स्थितीचें भयानक चित्र उभें राहून डोळ्याला पाणी येणार नाहीं अशा वाचकाच्या हातीं हें पुस्तक पडूं नये एवढीच माझी परमेश्वरास प्रार्थना आहे.

जपानच्या जवानमर्दांना मिळालेल्या शिक्षणाचे परिणाम फार खोल गेले आहेत व अजूनही नकळत पण खात्रीनें लोकांवर घडत आहेत हें मीं वर सांगितलेंच आहे. पूर्वींच्या शिक्षणाची त्यांना आठवण करून दिली ह्मणजे अजून त्यांच्या अंतःकरणांत खळबळ होते व त्यांचीं मनें प्रक्षुब्ध होतात, आणि असें कां होतें हें त्यांचें त्यांनाच समजत नाहीं. एकदां एका शाळेंतील विद्यार्थ्यांनीं कट केला कीं

आपल्या शास्त्रीय विषयावरील पंतोजीला बरोबर शिकवितां येत नाहीं तेव्हां तो पंतोजी बदलून दुसऱ्याची नेमणूक होईपर्यंत शाळेंत जावयाचें नाहीं. विद्यार्थ्यांचें कांहीं केल्या समाधान होईना. तेव्हां मुख्य अध्यापकानें त्यांना दोनच साधे प्रश्न केले, परंतु त्याबरोबर त्यांच्या अंतःकरणांत परंपरेनें सांठविलेल्या अभिमानानें उचल खाल्ली आणि त्यांचा कट मोडला. तो मुख्य अध्यापक त्यांना ह्मणाला, "तुमच्या पंतोजीचें वर्तन निष्कलंक आहे कीं नाहीं? जर असेल तर त्याचा तुह्मी असा उपमर्द करणें योग्य होणार नाहीं. तो एकाद्या विषयांत कच्चा आहे काय? जर असेल तर जो बोलून चालून कच्चा आहे त्यास घालवून देण्यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं." एवढ्यावरून त्या मुलांचें समाधान झालें आणि तीं दुसऱ्या दिवसापासून नियमित शाळेंत येऊं लागलीं. सारांश, अजून देखील जपानी लोकांच्या अंतःकरणाला जाऊन भिडेल अशा बेतानें त्यांना पूर्व शिक्षणाची आठवण करून दिली तर त्यांच्यापासून पुष्कळ कार्य करून घेतां येण्यासारखें आहे. आमच्या इकडील तऱ्हा मात्र कांहीं विपरीत आहे. पूर्वजांना नांवें ठेवून, पूर्वज मूर्ख होते, त्यांना कांहीं अकला नव्हत्या अशी समजूत करून, पूर्वींची शिक्षणपद्धति, पूर्वींचे कुलाचार, देशाचार, रीतरिवाज हे सर्व मूर्खपणाचे बाजार होत अशी परक्यांच्या आपमतलबी कानमंत्रावरून कल्पना करून घेऊन नंतर सुधारणा करावयाची हा आमचा मार्ग! ह्या मार्गानें जाऊन एकादें राष्ट्र सुधारल्याचें जगाचे इतिहासांत कोणाला कोठें उदाहरण सांपडलें आहे काय? आफ्रिकेंतील जे रानटी लोक आहेत त्यांना पूर्वजांची आठवण करून देऊन त्यांच्यापासून देखील

चांगलीं कामें करून घेतां येतील, मग ज्या आह्मां महाराष्ट्रीयांच्या सुदैवानें आमचे पूर्वज खरोखरच असे थोर होऊन गेले कीं त्यांचा आह्मांस अभिमान वाटून त्यांचे वंशज ह्मणवून घेण्यास आह्मीं लाजावें त्या आह्मां महाराष्ट्रीयांची पूर्वजांविषयींची स्मृति आणि प्राचीन सुखकर आचारविचारांविषयीं प्रेम कायम ठेवण्यांत आमच्या राष्ट्राचें किती हित होणार आहे याचा विचार समंजस वाचकांनींच करावा.

प्रस्तुतचा विषय येथें संपून पुस्तक समाप्त होतें तर मला फार आनंद झाला असता. परंतु ज्या विषयाच्या विवेचनास मीं सुरवात केली, तो शेवटास नेल्यावांचून मध्येंच सोडतां येत नाहीं. जपानांत जवानमर्दांना जें शिक्षण सरासरी आठशें वर्षें मिळालें तें वायां गेलें नसून त्याचे परिणाम अजून राष्ट्रावर घडत आहेत हें मीं वर सप्रमाण दाखविलेंच आहे, परंतु आतां प्रश्न असा आहे कीं जपानचें

## पुढें काय होणार?

सदरहू शिक्षणाच्या जोरावर जपान किती वर्षें लोटणार? पूर्वीच्या शिक्षणपद्धतीला मूठमाती मिळून जपानाला कांहीं निराळेंच स्वरूप तर प्राप्त होण्याचा संभव नाहींना? वगैरे अनेक प्रश्न उद्भवतात, परंतु त्यांचीं उत्तरें जितकीं समाधानकारक मिळावीं असें आपणांस वाटतें तितकीं तीं देण्याचें माझ्या नशिबीं नाहीं, याबद्दल अति वाईट वाटतें. जितकीं शुभकारक चिन्हें दिसावयास पाहिजेत तितकीं दिसत नाहींत आणि ह्मणून अखेर परिणाम काय होणार आहे याबद्दल मन साशंक होतें. नुसतीं चिन्हेंच दिसताहेत असें नाहीं तर पूर्वीचें जपान तेंच हें आजचें जपान, का हा कोणी निराळाच देश आहे अशी शंका येण्यासारखें जपा-

नचें रूपांतर जेणेंकरून होईल अशीं कारणें आणि महाकारणें घडत आहेत. ही माझी शंका माझ्याजवळच राहिली तर फार समाधानाची गोष्ट आहे. सदरहु शंका वृथा व्हावी हीच माझी इच्छा आहे. कढत दुधानें तोंड पोळलेलें मांजर ताकही मग फुंकून पिऊं लागतें. त्याप्रमाणें कदाचित् आह्मी पोळलेलों असल्याकारणानें आह्मांला भलत्याच शंका येत असतील.

युरोपांतील जवानमर्दांना ज्या तऱ्हेचें शिक्षण मिळत होतें त्याच तऱ्हेचें शिक्षण थोड्या फार फरकानें जपानांतील लढवय्यांना मिळत असल्यामुळें, इतिहासाची पुनरावृत्ति होते हें जर खरें असेल, तर युरोपांत सदरहु शिक्षणाचा जो शेवट झाला तसलाच शेवट जपानांतील शिक्षणाचा होण्याचा संभव आहे असें अनुमान काढण्यास आधार आहे. ज्या कारणांमुळें युरोपांतील जवानमर्दुमकीचा अंत झाला तींच कारणें जपानांतही घडूं लागलीं आहेत. परंतु युरोपांत जरी पूर्वींची शिक्षणपद्धति लयास गेली तरी तिची जागा लागलीच ख्रिस्ती धर्मानें पटकावली, आणि त्या धर्माच्या द्वारें युरोपांतील तरुणांना शिक्षण मिळूं लागलें. जपानांत त्या शिक्षणाची जागा कोणास मिळणार हा अजून प्रश्न आहे. आज मित्तीला तरी निदान जपानचे डोळे फांकले गेले आहेत. शिंटो पंथासारखे जुने पंथ यापुढें आपणास उपयोगीं पडणार नाहींत असें त्यांना वाटूं लागलें आहे. हल्लीं जी लष्करी पद्धत आहे तींत आणि पूर्वींच्या पद्धतींत उघड उघड महदंतर पडलें आहे. चीन देशांतील जुन्या तत्त्वज्ञान्यांची जागा बेंथम आणि मिल हे पटकावूं पहात आहेत. केवळ ऐहिक उन्नतीकडे जपानचें हल्लीं सर्व लक्ष लागलेलें

दिसतें. लोकसत्तात्मक राज्यपद्धतीवर त्यांचें प्रेम हळूहळू बसत चालल्यामुळें कोणत्याही एका विशिष्ट वर्गाबद्दल त्यांना निराळी काळजी वाटेनाशी झाली आहे. पूर्वीं जपानांत जें शिक्षण मिळत होतें तें एकदेशी होतें. तें सर्वांनाच मिळत होतें असें नाहीं. सर्व लोक सारख्या योग्यतेचे, सर्वांचे हक्क सारखे, अधिकार सारखे, अशी जेथें प्रवृत्ति होऊं लागली आहे तेथें जुन्या एकदेशी शिक्षणपद्धतीची यापुढें फार दिवस डाळ शिजेल असें वाटत नाहीं. सार्वजनिक संस्था, व्यापारी धोरण, पैसा, स्थानिक स्वराज्यें, इत्यादिकांवर पाश्चात्यांप्रमाणें जपानचें मन बसूं लागलें आहे, तेव्हां अशा स्थितींत पूर्वींचे लढवय्यांना साजणारें व लष्करी धोरणानें मिळणारें शिक्षण किती टिकाव धरील याबद्दल मनाला फार शंका वाटते. न्यायप्रीति, धैर्य, स्वराजनिष्ठा, आणि अब्रू या चार खांबांवर उभारलेली स्वराज्याची इमारत यापुढें वाक्छल करणारे कायदेपंडित आणि रांगडी घिसविस घालणारे मुत्सद्दी यांचे हवालीं होणार आहे. लढवय्यांच्या धंद्यापेक्षां जपानचें लक्ष अलीकडे इतर औद्योगिक गोष्टींनीं वेधलें आहे. आपमतलबी पाश्चात्य राष्ट्रांचा संबंध घडल्यापासून त्यांचे डोळे फांकून गेले आहेत. सर्व जगांत लवकरच शांतता नांदूं लागणार असें त्यांना वाटूं लागलें आहे. पाश्चात्य राष्ट्रांनीं स्वतःचें धोरण बदललें आहे असें मुळींच नाहीं, परंतु जपानवर मात्र त्यांनीं मोहनी टाकून जपानला असें वाटावयास लावलें आहे कीं शांतता राखून आपला व्यापार वाढविण्यांत जी मौज आहे, ती मौज परमुलखांवर गिधाडांप्रमाणें तुटून पडून त्याचे लचके तोडण्यांत नाहीं. पाश्चात्य राष्ट्रें जपानी लो-

कांना असें शिकवूं लागलीं आहेत कीं "बाबांनो, नुसत्या लष्करी धोरणावर राज्य किती दिवस चालणार? स्पार्टाचा इतिहास वाचा, रोमच्या इतिहासाकडे लक्ष पुरवा आणि बोध घ्या. आमच्यापासून अलग राहूं नका, नुसत्या लढण्यानें मनुष्यपणा येत नसतो, खरी माणुसकी दुसऱ्यांवर प्रेम करण्यांत आहे, तेव्हां तुह्मी आतां आमच्यावर प्रेम करूं लागा. **शिंटो, मेनशीअस,** आणि **वान यंग मिंग** यांनीं हेंच सांगितलें आहे, परंतु तिकडे लक्ष न देतां तुह्मी भलत्याच मार्गाला लागलां आहांत." जपानची सामाजिक स्थिति हल्लीं इतकी बदललेली आहे कीं अशा स्थितींत पूर्वीच्या लष्करी धोरणानें वागणें जपानला शक्यच नाहीं. लष्करी धोरणानें जपानी लोकांना आजपर्यंत जें शिक्षण मिळत आलें व त्यापासून त्यांच्या ठिकाणीं ज्या अमोल सद्गुणांचा उद्भव झाला तें शिक्षण व ते सद्गुण अशा स्थितींत कालांतरानें नाहींसे होणार असा पुष्कळ संभव दिसत आहे याबद्दल मनाला उद्वेग वाटणें साहजिक आहे. आतां तें शिक्षण आणि सद्गुण अमुकच वेळेला नाहींसे होतील असा कालनिर्णय करितां येणार नाहीं; परंतु सन १८७० सालीं ज्या वेळीं बादशहाच्या हुकमानें मोकाशाची पद्धत बंद करण्यांत आली त्याच वेळीं पूर्वींच्या शिक्षणपद्धतीच्या नाड्या आंखडल्या गेल्या असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पूर्वींच्या शिक्षणपद्धतीवर दुसरा घाव पांच वर्षांनीं नंतर पडला. जी तलवार हातीं असली ह्मणजे स्वाभाविकपणें स्वदेशाभिमान, धाडस, पराक्रम करण्याची हौस, स्वदेशसेवा करण्याचें प्रेम इत्यादि मनोविकार मनुष्याच्या अंतःकरणांत उद्भवतात ती तलवार कोणींही रस्त्यानें जातां येतां वापरूं नये असा

सरकारी हुकूम सन १८७५ सालीं फर्माविण्यांत आला. अर्थात् जपानच्या रस्त्यांतून जेथें पूर्वीं लढवय्ये जवानमर्द दिसत होते तेथें पुढें तोंडानें वटवट करणारे चार्वाकवादी लोक, आणि हातानें बोटें घालून नफानुकसानीचा हिशोब करणारे द्रव्यलोभी लोक झळकूं लागले. जपानला असली सुस्थिति आल्याबद्दल पाश्चात्य लोक आणि विशेषतः इंग्रज लोक जपानची स्तुति गाऊं लागले आहेत. इंग्लंडचा आणि जपानचा तह झाल्यापासून तर या स्तुतीला सारखी भरती येत चालली आहे. "अत्यादरः शंकनीयः" ह्मणतात आणि त्यांतल्यात्यांत इंग्रजांनीं अत्यादर केला तर कोणालाही शंका येईल. तेव्हां जपाननें या स्तुतीला भुलून जातां कामा नये. चीन देशाबरोबर लढाई करून जपाननें जो विजय संपादन केला तेव्हांपासून जपानकडे पाश्चात्यांचें लक्ष लागूं लागलें. आपल्या लष्करांत आणि आरमारांत तुह्मीं सुधारणा केल्या आणि तुमच्या बंदुका आणि तोफा नवीन तऱ्हेच्या होत्या ह्मणून तुह्मांस जय आला असें पाश्चात्य लोक जपानला सांगूं लागले. परंतु ह्या ह्मणण्यांत सत्याचा अंश फार थोडा आहे. वाद्य कितीही चांगलें असलें परंतु वाजविणाराच्या अंतःकरणांत त्याबद्दल प्रेम नसलें तर त्या वाद्यांतून कधीं तरी सुस्वर आवाज निघतील काय? नुसत्या बंदुकांनींच जर लढाया जिंकतां येत्या तर काय न होतें? हातांत कितीही उत्तम शस्त्रें येऊन पडलीं तरी अंतःकरणांत जर

१ तहानंतर आलफ्रेडस्टेड साहेबानें जपानवर लिहिलेलें पुस्तक उत्तम आहे, परंतु त्यांनीं ठिकठिकाणीं जपानचा सारखा स्तुतिपाठ केला आहे.

अंगीकृत कार्याबद्दल प्रेम, उत्साह, निष्ठा, कळकळ हीं नसतील तर तीं उत्तम हत्यारेंच निरुपयोगी होतात, परंतु उलटपक्षीं वरील मनोवृत्तींनीं अंतःकरण जर उचंबळत असेल तर नुसत्या काठ्या अगर धोंडे पाहिजे तें काम करूं शकतील. आपले पूर्वीं शत्रू असलेले परंतु आतां भाऊबंद झालेले बोअर लोक जे इंग्रजांबरोबर तीन वर्षें लढत राहिले ते काय त्यांच्या हातांत उत्तम शस्त्रें होतीं ह्मणून? नव्हे, तसें खात्रीनें नव्हे. इतके दिवस टिकाव धरण्यास कारण त्यांचें स्वदेशावरील निरपेक्ष प्रेम हेंच होय. अभिमानशून्य लोकांच्या हातांत कितीही उत्तम तोफा आणि बंदुका दिल्या तरी त्यांचा कांहींएक उपयोग नाहीं. ते तोफांचे गोळे कांहीं आपोआप शत्रूंवर जाऊन पडत नाहींत किंवा बंदुका देखील आपोआप सुटत नाहींत. कितीही उत्तम प्रकारचें तुमचें लष्करी शिक्षण असलें तरी त्याच्या योगानें भ्याडाचे अंगांत कांहीं शौर्य चढणार नाहीं किंवा अंतःकरणांत प्रेमाच्या उकळ्या फुटणार नाहींत. जपानी लोकांनीं पूर्ण लक्षांत वाळगावें कीं त्यांच्या यशाचें कारण त्यांचें पूर्वजांवरील प्रेम, त्यांची स्वराजनिष्ठा, त्यांची अब्रूची चाड, सारांश, त्यांना चीनदेशाबरोबर लढून जो विजय प्राप्त झाला त्याचें कारण त्यांना आजपर्यंत मिळत असलेलें लष्करी बाण्याचें शिक्षण होय! अर्थात् तें पूर्वींचेंच धोरण कायम ठेवण्यांत जपानचा फायदा आहे अशी माझी अल्प समजूत आहे. स्थित्यंतरानुरूप आवश्यक ते फेरफार करणें योग्य आहे आणि जपान त्याप्रमाणें ते करीतही आहे, परंतु जपाननें काय आणि कोणीही काय नेहमीं लक्षांत वाळगावयाचें ह्मणून इतकेंच कीं स्वतःच्या देशाचाराचा, कुलाचाराचा, वस्तुस्थितीचा

विचार न करतां बाहेरच्या सुधारणा बळेंच अंगाला चिकटविण्याचा प्रयत्न केला तर त्या चिकटल्या जात नाहींतच, परंतु उलट समाज विस्खलित होऊन जगांत आपलें हंसें मात्र होतें. जुन्यांतूनच जें नवीन निघेल तेंच चिरकाल टिकेल. राष्ट्रोन्नतीचीं बीजें जीं मुळचीं आपल्या अंगांत असतात त्यांचेंच पोषण झालें पाहिजे; तीं परमुलखांतून साता समुद्रांपलीकडून आणून कार्यभाग होत नसतो.

जपानचें पूर्वीचें स्वरूप अजिबात पालटलें जाऊन अनपेक्षित असें निराळेंच स्वरूप जपानला प्राप्त होतें कीं काय अशी भीति वाटण्याच्या आणखी एका कारणाचा उल्लेख करावयाचा राहिला आहे. तें कारण फार बलवत्तर आहे व त्याबद्दल वेळेवरच जपाननें सावधगिरी न घेतली तर जपानच्या हल्लींच्या ऐहिक वैभवाचा आह्मांस हेवा वाटण्याचें कांहींच कारण उरणार नाहीं. शिंटो पंथाचे जपानांत कांहीं अनुयायी आहेत, परंतु जपानचा मुख्य धर्म ह्मटला ह्मणजे बुद्ध होय. सुदैवाची अथवा दुर्दैवाची स्थिति अशी आहे कीं जपानांत कोणत्याही धर्माला राजाश्रय नाहीं. वास्तविक असें कां असावें हें समजत नाहीं. देशाचा जीर्णोद्धार करण्याचे वेळीं सर्वांचीं मनें आपलींशीं करून घेण्यासाठीं कोणत्याही धर्माला आश्रय न देणें बरें असें जपानी मुत्सद्यांना वाटलें असेल, परंतु आतां पूर्वीच्या गादीचा जीर्णोद्धार होऊन देशास उन्नत अवस्था प्राप्त झाल्यानंतरही जपानसरकारानें धर्माच्या बाबतींत उदासीन रहाणें श्रेयस्कर होणार नाहीं असें मला वाटतें. जपानच्या धार्मिक औदासीन्याचा आजच असा परिणाम झाला आहे कीं जपानच्या चार कोट प्रजेपैकीं आज मित्तीला लाख दीड लाख लोकांनीं ख्रिस्ती

धर्माचा स्वीकार केलेला आहे व ही वाढ यापुढें फार झपाट्यानें होत जाणार आहे अशी पाद्र्यांना आशा आहे. धर्मांतराचा हा ओघ असाच कांहीं काळ चालला आणि त्याला प्रतिबंध करण्याचा सरकारानें आणि लोकांनीं कांहींच प्रयत्न न केला तर एक दिवस असा येईल कीं जपानांत ख्रिस्ती धर्म मुख्य होऊन बसेल. आह्मां महाराष्ट्रीयांना धर्म हें राष्ट्राचें जीवन वाटतें आणि तो जाऊन जपानची कितीही उन्नति झाली तरी त्यांत आमच्या दृष्टीला स्पृहणीय कांहींच दिसणार नाहीं. शिवाय हिंदुस्थानांत आह्मांस असा अनुभव आलेला आहे कीं जो आपल्या धर्माला आंचवतो तो स्वदेशाभिमानालाही मुकतो! असा जर अनिष्ट परिणाम जपानांत घडूं लागला तर खचित तें जपानच्या राष्ट्राला घातक झाल्यावांचून राहणार नाहीं. माझी समजूत अशी आहे कीं जपानांत जशी राजकीय उन्नति झाली तशी धार्मिक उन्नतीची वेळ आतां आली आहे. अनेक वर्षांच्या अनास्थेमुळें बुद्ध धर्माचें खरें स्वरूप जपानी लोकांच्या लक्षांतून गेल्यामुळें ख्रिस्ती धर्मासारख्या अप्रबुद्ध धर्माला जपानी लोक बळी पडूं लागले असावे. स्वधर्माचा आस्थापूर्वक अभ्यास करणें हाच असली अनिष्ट स्थिति टाळण्याचा उपाय आहे. व या प्रश्नाकडे जपान सरकारचें जरी नाहीं तरी जपानच्या लोकांचें लक्ष लागत चाललें आहे असें जपानांत लवकरच जी धर्मपरिषद् भरणार आहे तीवरून अनुमान काढण्यास जागा आहे. बुद्ध धर्माचा उगम आमच्याच देशांत झाला आहे ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. आमच्या सनातन आर्यधर्मापासून बुद्धधर्म फारसा भिन्न नाहीं. सनातन आर्यधर्मासारखा मनुष्याच्या आ-

त्यास शांति देणारा दुसरा धर्म नाहीं ही गोष्ट पुष्कळ लोकांना कबूल करावी लागत आहे. आमच्या जगद्गुरूंनीं वादांत बुद्धधर्माचा पराभव केलेला आहे. अशा तऱ्हेच्या सनातन आर्यधर्माची जपानी लोकांना ओळख होईल अशी जर कांहीं तजवीज करण्यांत येईल तर त्यापासून जपानचा फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं. ख्रिस्तीधर्माला आज जपानचे लोक भुलत आहेत याचें कारण त्यांच्या नजरेस अजून आर्यधर्माचीं उदात्त तत्त्वें पडलीं नाहींत हें होय. परंतु एकवार त्यांना त्या तत्त्वांची ओळख झाली ह्मणजे ते हिरा टाकून गारगोटी हातीं घेणार नाहींत अथवा ज्ञानतृष्णा भागविणारें वेदांतजल टाकून ते मृगजलाच्या पाठीमागें लागणार नाहींत. जेणेंकरून जपानी लोकांच्या मनाला शांति वाटेल अशा धर्माची त्यांना आह्मी ओळख करून दिल्यानंतर त्याच्या मोबदला तें आह्मांस कांहींच देणार नाहींत हें संभवत नाहीं. जपानी लोक कृतघ्न खास नाहींत.

आर्यधर्मतत्त्वांच्या परिशीलनानें बुद्ध धर्माचें स्वरूप उज्वल झाल्यावर त्यापासून जपानच्या राष्ट्राला अधिकतर बळकटी येणार आहे. जपानी लोकांना वाडवडिलांपासून जें लष्करी बाण्याचें शिक्षण मिळत आलें आहे त्याला पोषक असाच बुद्ध धर्म होईल. असें झालें ह्मणजे जपानचें पूर्वीचें स्वरूप अजिबात नाहींसें न होतां जुन्यांतूनच निघणारें नवीन जपान,अधिक बलवान्, अधिक तेजवान् आणि अधिक श्रीमान् झाल्यावांचून राहणार नाहीं. असें झालें तर ज्या प्राचीन लष्करी तऱ्हेच्या शिक्षणाचा त्यांना इतका अभिमान वाटत आहे त्याला ते सर्वस्वी कधींही आंचव-

णार नाहींत. या पुस्तकाचा आरंभ चेरी नांवाच्या फुलांपासून केला आहे व शेवटही त्याच फुलांत करूं. तें फूल वाऱ्याची एकादी जरा मोठी झुळुक आली तर उडून जाऊन जसें दाही दिशांला मिळतें परंतु त्याचा परिमल मात्र सर्वांना उपभोगावयास सांपडतो तद्वत् जुन्या तऱ्हेच्या शिक्षणपद्धतीप्रमाणें जरी जपानला यापुढें शिक्षण न मिळालें तरी देखील त्यांना स्वधर्माच्या उज्ज्वल स्वरूपाची ओळख पटली ह्मणजे त्यांच्या प्राचीन शिक्षणाचे परिणाम यावच्चंद्रदिवाकरौ जपानच्या उत्कर्षास कारणीभूत होऊन राहतील. असें झालें तरच जपानचा सर्व जगभर जयजयकार होणार आहे. ईश्वर करो आणि तसें होवो!

REFBK-0000112

समाप्त.

क्र. ११२

# सत्कार्योत्तेजक सभा—धुळें.

| | |
|---|---|
| शिवचरित्र व जन्मोत्सव .... .... | ०६ |
| रामचरित्र .... ... .... .... | ०३०६ |
| आपण कोण? .... .... .... | ०२ |
| शिवगीत (उत्सवाकरितां) .... .... | ००९ |
| जपानच्या बादशहाचा उपदेश .... | ००३ |
| जपानची मर्दुमकी .... .... .... | ०१२ |

याशिवाय टपालखर्च पडेल. सदरहू पुस्तकें खालील ठिकाणीं मिळतील.

चिटणीस,

**स. सभा, धुळें.**